
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
लातूर | सोमवार, २२ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २९२ | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आपल्याला संपूर्ण हिंदू समाज जागृत करणारे विषय घेऊन समाजात जावे लागेल. यासाठी संपूर्ण देशभर आम्ही काही कार्यक्रम घेतले. या कार्यक्रमांचा उपयोग आपण आपल्या संघटनेसाठी केला तर ते अडचणीचे ठरत नाही, उलट ते उपयुक्त ठरतात.
**- मोरोपंत पिंगळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह



तिथीनुसार आज
श्रीनृसिंह सरस्वती जयंती

## महत्त्वाचे

### रेल्वेचा प्रवास महागला

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने २६ डिसेंबर २०२५ पासून रेल्वे भाड्यात बदल जाहीर केले आहेत. याचा परिणाम कमी अंतराच्या प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर होणार नाही. मात्र, लांब पल्ल्याचा प्रवास महाग होणार आहे. नवीन रेल्वे भाडे रचनेनुसार, २१५ किलोमीटरपर्यंतच्या प्रवासासाठी सामान्य श्रेणीच्या भाड्यात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. याचा अर्थ असा की सध्या दररोज कमी अंतराच्या प्रवाशांना काही प्रमाणात दिलासा मिळेल. तथापि, २१५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरासाठी भाडेवाढ लागू होईल. नवीन प्रणालीनुसार, २१५ किलोमीटरपेक्षा जास्त अंतरासाठी, सामान्य श्रेणीत प्रति किलोमीटर अतिरिक्त १ पैसे आकारले जातील. दरम्यान, मेल/एक्सप्रेस गाड्यांच्या नॉन-एसी आणि एसी दोन्ही वर्गांमध्ये भाडे २ पैसे प्रति किलोमीटरने वाढवण्यात आले आहे. याचा अर्थ असा की लांब पल्ल्याच्या प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अतिरिक्त भार सहन करावा लागेल. उदाहरणार्थ, नॉन-एसी मेल/एक्सप्रेस ट्रेनने ५०० किलोमीटर प्रवास करणाऱ्या प्रवाशाला अंदाजे १० रुपये जास्त द्यावे लागतील. ■

# भाजपाच ‘धुरंधर’

- राज्यात ठरला पहिल्या क्रमांकाचा पक्ष
- महाविकास आघाडीचा धुव्वा
- शिंदे-अजित दादांच्या पक्षांचीही चांगली कामगिरी



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीला अभूतपूर्व असे यश मिळाले. या यशाबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. यावेळी उपस्थित महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अन्य नेते

**◆ मुंबई, २१ डिसेंबर**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये अभूतपूर्व यश मिळविल्यानंतर नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकांमध्ये डोळे दिपवणारे यश प्राप्त करीत भारतीय जनता पार्टी सर्वांत मोठा पक्ष आणि राजकारणातील ‘धुरंधर’ ठरला आहे.

शिवसेना दुसऱ्या तर राष्ट्रवादी काँग्रेस तिसऱ्या क्रमांकावर राहिले. महाविकास आघाडीला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. काँग्रेसने कसाबसा दुहेरी आकडा गाठला पण उबाठा आणि शरद पवार गटाला तर दारुण पराभवाचा सामना करावा लागला. बहुतांश ठिकाणी सर्वच पक्ष स्वतंत्र लढले असले तरी महायुती आणि महाविकास आघाडी, असा विचार करता भाजपाच्या नेतृत्वातील महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत, महाराष्ट्रात आपलंच वर्चस्व असल्याचे दाखवून दिले आहे.

राज्यातील एकूण २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक २ डिसेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यात २० डिसेंबर रोजी पार पडली होती. त्यानंतर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी पार पडली. निकालाअंती या निवडणुकांमध्ये महायुतीने आपले वर्चस्व प्रस्थापित केल्याचे स्पष्ट झाले. नगरपरिषदांच्या एकूण निकालात भाजप नंबर वन पक्ष ठरला असून एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनीही या निवडणुकीत चांगली कामगिरी केली असल्याचे आकडेवारी पाहिली तर ठळकपणे दिसून येते.

सकाळी दहा वाजता मतमोजणीला प्रारंभ झाल्यानंतर पहिल्या दोन तासांतच निकालाचे चित्र स्पष्ट झाले. अगदी सुरुवातीपासूनच भाजपाने घेतलेली आघाडी शेवटपर्यंत कायम राहिली. राज्याच्या सर्वच जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश प्राप्त केले. मराठवाडा आणि कोकण हे एकसंध शिवसेनेचे बालेकिल्ले होते. या भागांमध्येही भाजपाने मुसंडी मारली. मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात भाजपा प्रथम क्रमांकाचा पक्ष ठरला.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

### महाराष्ट्र

| पक्ष | नगराध्यक्ष | सदस्य |
|---|---|---|
| भाजपा | ११७ | ३३२५ |
| शिवसेना | ५३ | ६९५ |
| राकाँ. | ३७ | ३११ |
| काँग्रेस | २८ | १३१ |
| उबाठा | ०९ | ३७८ |
| राकाँ शप | ०७ | १५३ |
| अन्य | ३७ | १४० |

### आता लक्ष्य मुंबई : चव्हाण

महायुतीला निर्णायक जनादेश मिळाला असून, विरोधकांच्या ‘खोट्या प्रचाराला’ मतदारांनी नाकारल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण म्हणाले. तर, आता पुढचे लक्ष्य मुंबई आणि इतर महानगरपालिका असल्याचेही ते म्हणाले. ■

### महाविकास आघाडीसाठी अस्तित्वाची लढाई

लोकसभा निवडणुकीनंतर आत्मविश्वास वाढलेल्या महाविकास आघाडीला विधानसभेतील दारुण पराभवानंतर खचलेला आत्मविश्वास पुन्हा निर्माण करण्याची संधी या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत होती. मात्र, मविआला यातदेखील फार काही करून दाखवता आले नाही. आणि आता तर महानगर पालिकांच्या निवडणुकीत मविआमध्ये फूट पडली असल्याने मविआसाठी ही अस्तित्वाची लढाई ठरणार आहे. ■

### शिवसेनेचीही मुसंडी

**उद्धव ठाकरे यांच्याकडून शिवसेना हिसकावून घेतल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात या पक्षाने प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविल्या. भाजपानंतर शिवसेनेने सर्वाधिक जागा जिंकल्या. एवढेच नव्हे तर काही ठिकाणी भाजपाला टक्कर देत विजय मिळविला. कोकणात शिवसेना सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष ठरला तर पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर राहिला.** ■

### उबाठा आणि पवार गटाचा मोठा पराभव

**या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. दोन्ही पक्ष दुहेरी आकडाही गाठू शकले नाहीत. उबाठाला ९ तर शरद पवार गटाला अवघ्या ७ जागा मिळाल्या.** ■

### राष्ट्रवादी काँग्रेसने दाखविला दम

**अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ३७ जागा जिंकत तिसऱ्या क्रमांकावर राहिला. पश्चिम महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसने १४ जागा मिळविल्या असल्या तरी विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्रात या पक्षाला दुहेरी आकडा गाठता आला नाही.** ■

### काँग्रेसला विदर्भाचा ‘हात’

**काँग्रेसचे २८ नगराध्यक्ष निवडून आले आहेत. यापैकी एकट्या विदर्भात २० पेक्षा जास्त नगराध्यक्ष विजयी झाले आहेत. पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्र हे कधीकाळी काँग्रेसचे बालेकिल्ले असायचे. मात्र, काँग्रेसची स्थिती एवढी खालावली की उत्तर महाराष्ट्रात ५ तर पश्चिम महाराष्ट्रात अवघ्या तीन जागा मिळाल्या. मराठवाड्यात चार जागांवर समाधान मानावे लागले.** ■

# निकाल नगरपरिषदांचा

| एकूण नगरपरिषद | भाजपा | शिवसेना | राष्ट्रवादी | |
|---|---|---|---|---|
| | १२० | ५७ | ३७ | |
| २८८ / २८८ | काँग्रेस | उबाठा | राकाँ शप | इतर |
| | ३० | १० | १० | २४ |

| एकूण नगरसेवक | भाजपा | शिवसेना | राष्ट्रवादी | |
|---|---|---|---|---|
| | ३,३२५ | ६९५ | ३३१ | |
| ६८५९ / ६८५९ | काँग्रेस | उबाठा | राकाँ शप | इतर |
| | १३१ | ३७८ | १५३ | १४० |

| एकूण नगराध्यक्ष | भाजपा | शिवसेना | राष्ट्रवादी | |
|---|---|---|---|---|
| | ११७ | ५३ | ३७ | |
| २८८ / २८८ | काँग्रेस | उबाठा | राकाँ शप | इतर |
| | २८ | ०९ | ०७ | ३७ |



# सोलापूर जिल्ह्यात ‘महायुती’चाच डंका!

**भाजपा ४, शिवसेना ३, आघाडी ३ तर शिवसेना उबाठा व राष्ट्रवादीला प्रत्येकी १ जागा**

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि.२१ डिसेंबर-**

महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या निवडणुका पार पडल्या. यात सोलापूर जिल्ह्यातील एकूण १२ नगरपालिकांचाही समावेश होता. रविवार, २१ डिसेंबर रोजी मतमोजणी झाली. सोलापूर जिल्ह्यात ‘महायुती’चाच डंका असल्याचे स्पष्ट झाले. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला ४, शिवसेना शिंदे गटाला ३, आघाडीला ३ आणि शिवसेना उबाठा व राष्ट्रवादीला प्रत्येकी १ जागा मिळाले.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट, मैंदर्गी, अनगर आणि बार्शी या चार नगरपालिकांवर भाजपचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत. दुधनी येथे शिवेसना शिंदे सेना, पंढरपूर येथे तीर्थक्षेत्र विकास आघाडी, सांगोला येथे शिवसेना शिंदे सेना, कुर्डुवाडी येथे शिवसेना उबाठा, करमाळा येथे स्थानिक आघाडी, मोहोळ येथे शिवसेना शिंदे गट, अकलूज येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नगराध्यक्ष निवडून आलेले आहेत.

नगरपालिका निवडणुकांमुळे जवळपास गेल्या महिन्यापासून जिल्ह्याचे राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री, सत्ताधारी, विरोधी पक्षाचे आमदार-खासदार, माजी आमदार, राज्याच्या वरिष्ठ नेत्यांनी या निवडणुकीत जीव तोडून प्रचार केला-सभा गाजविल्या. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या, एकमेकांची उणी-दुणी काढली. आश्वासनांचा पाऊसही पाडण्यात आला.

मंगळवेढा नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे आमदार समाधान आवताडे यांना रोखण्यात तीर्थक्षेत्र विकास आघाडीला यश आले आहे. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या सुनंदा बबनराव आवताडे यांना ९ हजार ८५० तर भाजपाच्या सुप्रिया अजित जगताप यांना ९ हजार ६३८ मते मिळाली. २१२ मतांची आघाडी घेत सुनंदा आवताडे ह्या विजयी झाल्या आहेत.

काँग्रेसचे माजी गृहराज्यमंत्री तथा शिवसेना शिंदे गटाचे विद्यमान नेते सिध्दाराम म्हेत्रे यांनी दुधनी गड शाबूत ठेवला. दुधनीच्या नगराध्यक्षपदी प्रथमेश म्हेत्रे यांनी विजय संपादन केले. भाजपाचे अतुल मेळकुंदे यांना २२८९, काँग्रेसचे महेश बाजारमठ यांना १६० मतावर समाधान मानावे लागले. मैंदर्गी नगरपालिकेत भाजपने इतिहास घडविला. भाजपाच्या अंजली बाजारमठ यांनी स्थानिक गटाच्या उमेदवार शिवम्मा पोतेनवरु यांचा पराभव केला. भारतीय जनता पार्टीने याठिकाणी २० पैकी १८ जागांवर विजय मिळवला.

अक्कलकोटच्या नगराध्यक्षपदी भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी हे निवडून आले आहेत. काँग्रेसला दोन तर शिंदेसेना एका जागेवर समाधान मानावे लागले. नगराध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत मिलन कल्याणशेट्टी यांना १४ हजार ८६१, शिवसेना शिंदे सेनेचे रईस टिनवाला यांना ६ हजार ३०८ तर काँग्रेसचे अश्पाक बळोरगी यांना २ हजार ६४६ मते मिळाली.

कुर्डुवाडीमध्ये शिवसेनेला नगराध्यक्षासह पाच जागा तर राष्ट्रवादी तेरा जागा मिळाल्या तर शिंदेसेनेला एक तर अपक्ष एक जागा मिळाली. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना उबाठाच्या जयश्री संतोष भिसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुरेखा निवृत्ती गोरे यांचा ६५५ मतांनी पराभव केला. नगरसेवकांच्या २० पैकी १३ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळविला. शिवसेना उबाठाने पाच, शिवसेना शिंदे गट आणि अपक्ष प्रत्येक एका जागेवर विजय संपादन केले

अकलूज नगरपरिषदेसाठी प्रथमच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाला २२ व शिवसेना उबाठाला २ असे एकूण २४ जागा मिळाल्या. भाजपला केवळ ४ जागांवर विजय मिळविता आले. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोहिते-पाटील गटाच्या रेश्मा अडगळे यांनी भाजपाच्या पूजा कोतमिरे व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या दिव्या रास्ते यांचा दणदणीत पराभव केला. दरम्यान, डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून उमेदवार उभे केले होते. पण, त्यांना एकाही जागेवर विजय मिळविता आले नाही.

बार्शी नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीचे २३, शिवसेना उबाठाचे १९ उमेदवार विजयी झाले. नगराध्यक्षपदी भाजपाच्या तेजस्विनी कथले यांनी शिवसेना उबाठाच्या निर्मला बारबोले यांचा पराभव करत निवडून आल्या आहेत. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने येथील सत्ता कायम राखली आहे. शिवसेना उबाठाचे विद्यमान आमदार दिलीप सोपल यांनी १९ जागा जिंकून चांगलीच लढत दिली.

संपूर्ण राज्याचे लक्ष लागून असलेल्या सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेचे माजी आमदार ॲड.शहाजीबापू पाटील यांना नगराध्यक्षसह २३ पैकी १५ नगरसेवक निवडून आणण्यात यश आले आहे. याठिकाणी आनंदा गोरख माने यांनी नगराध्यक्षपद पटकावले. विशेष म्हणजे, उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मारुती बनकर यांना भारतीय जनता पार्टीत डेरेदाखल करुन घेत त्यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली होती. शहर विकास आघाडीला केवळ ८ जागांवर समाधान मानावे लागले. पंढरपूर नगरपरिषद निवडणुकीत माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखालील भाजपाची अवस्था गड आला पण सिंह गेला अशी झाली आहे. भाजपासह मित्रपक्ष **(उर्वरीत वृत्त पान ३ वर)**

# संघ हे समाजप्रेमावर चालणारे ईश्वरी कार्य

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

**◆ कोलकाता, २१ डिसेंबर**

जगातील कोणत्याही स्वयंसेवी संघटनेला जितका विरोध झाला नसेल तितका संघाला सहन करावा लागला. हल्ले झाले, हत्या झाल्या, पण स्वयंसेवक पुढे जातच राहिले. समाजातील प्रेमाच्या भरवशावर संघ पुढे जात आहे. मुळात, संघ हे समाजाच्या प्रेमावरच चालणारे ईश्वरी कार्य आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघ शताब्दीनिमित्त कोलकाता येथे आयोजित एकदिवसीय व्याख्यानात ते बोलत होते. सरसंघचालक म्हणाले की, संघाचे कार्य मैत्रीच्या आधारावर शुद्ध सात्त्विक स्वरूपाचे आहे. संघाविषयी



जाणून घ्यायचे असेल तर तुम्हाला शाखेत यावे लागेल. संघाचे स्वयंसेवक सर्वच क्षेत्रांत कार्यरत आहेत. संघ कोणावरही अंतर्गत किवा बाह्य अशा कोणत्याही स्वरूपाचे नियंत्रण ठेवण्याचा प्रकार करत नाही.

संघ अगदी स्थापनेच्या दिवसापासूनच सामूहिकतेच्या भावनेवर वाटचाल करत आहे. संघ ही सामूहिक कार्यपद्धती आहे. डॉ. हेडगेवारांच्या काळात हिंदुस्थान हे हिंदू राष्ट्र याला मान्यता नव्हती. त्यावेळी ते हिंदू समाजाच्या एकत्रीकरणासाठी उभे राहिले. अत्यंत विपरीत परिस्थितीत, आर्थिकदृष्ट्या हलाखीची स्थिती असतानाही शुद्ध अंत:करण, नि:स्वार्थ बुद्धीने डॉ. हेडगेवारांनी संघाचे कार्य सुरू केले.

संघाला प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. अनेक हल्ले झाले, हत्या झाल्या. पण, तरीही स्वयंसेवक पुढे जातच राहिले. एकही स्वयंसेवक मनात याविषयी कटूता बाळगत नाही. गुरुदक्षिणेवर संघ चालतो. बाहेरून काहीही घेतले जात नाही. स्वयंसेवकच सारे काही चालवतात. आज संघ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. एकेका रुपयाचा हिशेब ठेवला जातो आणि त्याचे अंकेक्षणही केले जाते.

भारताच्या एकूण पावणे सात लाख गावांपैकी सव्वा लाख ठिकाणी संघ आहे. ४५ हजार शहरांमध्ये आम्ही अर्ध्याहून जास्त ठिकाणी पोहोचलो आहोत आणि उर्वरित ठिकाणी पोहोचायचे आहे, असे सरसंघचालक म्हणाले. ◀ *(वृत्तसंस्था)*

### हिंदूंनी एकजुटीने उभे राहावे

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आपल्या भाषणात बांगलादेशातील हिंदूंच्या स्थितीचा उल्लेख केला. बांगलादेशात हिंदू अल्पसंख्यक आहेत आणि त्यांची स्थिती अतिशय बिकट आहे. स्थिती कठीण असली तरी तेथील हिंदूंना एकजूट व्हावे लागेल. जगभरातील हिंदूंनी त्यांची मदत केली पाहिजे. आपण आपल्या सीमेत राहून त्यांची जितकी मदत करू शकतो, ती करायला हवी. जर हिंदू समाज एकजूट होऊन उभा राहिला तर तेथील स्थिती बदलण्यास वेळ लागणार नाही. ■

# विदर्भात भाजपाची जोरदार मुसंडी; ५८ नगराध्यक्ष विजयी

## चंद्रपुरात मात्र काँग्रेसने दिला धक्का

**नागपूर, २१ डिसेंबर -**

विदर्भातील २४ नगर पंचायत आणि ७४ नगर परिषदांसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी रविवारी घेण्यात आली. यात नगराध्यक्षपदाच्या १०० पैकी भाजपाने ५८ जागा जिंकत घवघवीत यश संपादन केले. भाजपा हा विदर्भातील सर्वांत मोठा राजकीय पक्ष ठरला आहे. त्याखालोखाल शिवसेना ८, राकाँने ७ जागा जिंकल्या. महाविकास आघाडीत काँग्रेस सर्वांत मोठा पक्ष ठरला.

या पक्षाने २३ जागा जिंकल्या. नागपूर जिल्ह्यात २६ पैकी २२ जागा भाजपाने जिंकल्या. वर्धा : भाजपाचे वर्धेत ४० पैकी २५, हिंगणघाट येथे ४० पैकी २७, आर्वी येथे २५ पैकी १५, देवळी येथे २० पैकी १६, सिंदी रेल्वे येथे २० पैकी ११ तर पुलगाव येथे २१ पैकी ८ नगरसेवक निवडून आले. जिल्ह्यातील नगरसेवकांच्या १६६ पैकी भाजपाचे १०२ उमेदवार निवडून आले. गोंदिया : जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा नगर परिषद तसेच गोरेगाव व सालेकसा नगर पंचायत निवडणुकीत भाजपा व काँग्रेसचे प्रत्येकी ३५ उमेदवार निवडून आले. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे १९, बसपा ३, उबाठा ३, शिवसेना १ व ३ अपक्ष उमेदवार निवडून आले. असे असले तरी नगराध्यक्षाच्या निवडणुकीत गोंदिया, गोरेगाव व सालेकसा येथे काँग्रेसने बाजी मारली असून, भाजपाला तिरोडा येथे समाधान मानावे लागले. अमरावती : जिल्ह्यात १० नगरपरिषद व २ नगरपंचायत निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपाचे ६ उमेदवार, तर काँग्रेसचे २, उबाठा, शिवसेना, प्रहार, वंचितचा प्रत्येकी १ उमेदवार विजयी झाला. धामणगाव रेल्वेत भाजपाच्या नगराध्यक्षासह सर्वच २० नगरसेवक विजयी झाले. भंडारा : भंडारा नगर परिषदेत विद्यमान आमदारांना धोबीपछाड देत मतदारांनी भाजपा उमेदवाराला नगराध्यक्षपदी विराजमान केले. भाजपाने जिल्ह्यातील चार पैकी दोन नगर परिषदेचे अध्यक्षपद जिंकले. तर राष्ट्रवादी काँग्रेसने १ आणि अपक्ष उमेदवाराने १ अध्यक्षपद जिंकले. गडचिरोली : जिल्ह्यातील गडचिरोली, आरमोरी व देसाईगंज या तिन्ही नगरपरिषदांवर भाजपाने आपले वर्चस्व सिद्ध केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# हा निकाल तर फक्त 'ट्रेलर' खरे चित्र महापालिकेत दिसणार

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

◆ **ठाणे, २१ डिसेंबर**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल हे १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकांमध्ये काय होईल याचे 'ट्रेलर' आहे, असा दावा शिवसेनेचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी केला.

शिवसेनेच्या यशस्वी कामगिरीची कौतुक करताना शिंदे म्हणाले की, लागलेले निकाल हे आमच्या पक्षाने केलेल्या चांगल्या कामगिरीची पावती आहे. महाराष्ट्रातील २८६ नगर परिषदा आणि नगर पंचायतींमधील अध्यक्ष आणि सदस्यपदांच्या निवडणुकीसाठी मतमोजणी सकाळी दहा वाजता सुरू झाली. राज्यात महायुतीचे वर्चस्व दिसून आले.

नागरिकांची पसंती राजकारणापेक्षा विकासाला असल्याचे निकालांवरून दिसून आले. निवडणुकांमधील महायुतीचा हा भव्य विजय केवळ एक ट्रेलर आहे. आगामी महापालिका निवडणुकांमध्येही महायुती हीच कामगिरी पुन्हा करेल, असे त्यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

२८६ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुतीने २०० चा आकडा पार केल्याचे शिंदे यांनी सांगितले. भाजपाने शतक झळकवले आहे आणि शिवसेनेने अर्धशतक पूर्ण करून राज्यात दुसरा सर्वात मोठा पक्ष म्हणून स्थान मिळवले आहे, असे शिंदे यांनी सांगितले.

खरी शिवसेना कोणती, हे लोकांनीच दाखवून दिले आहे. आमची विचारधारा बाळासाहेब ठाकरे यांची आहे. या शानदार विजयामुळे आज त्यांना खूप आनंद झाला असता. राजकारण करणाऱ्यांसाठी हा एक खूप मोठा धडा आहे. जे लोकांना नाकारतात, त्यांना लोक नाकारतात. शिवसेनेचा 'स्ट्राईक रेट' खूप चांगला आहे. शिवसेनेने कमी जागांवर निवडणूक लढवली. पण, त्यापैकी जास्तीत जास्त जागांवर विजय मिळवला. शिवसेनेने महाविकास आघाडीच्या एकत्रित जागांपेक्षा जास्त जागा जिंकल्या, असे सांगताना एकनाथ शिंदे यांनी काँग्रेस, उबाठा आणि शरद पवार गटावर निशाणा साधला. ◂(वृत्तसंस्था)

#### घरी बसणाऱ्यांना घरीच बसवले

काही ठिकाणी भाजपा आणि शिवसेनेत मैत्रिपूर्ण लढती झाल्या. मतदारांनी निवडणुकीत घरी बसवलेल्यांना घरीच बसवून ठेवले, अशी अप्रत्यक्ष टीका एकनाथ शिंदे यांनी 'उबाठा'चे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर केली. ■



#### कोकण शिवसेनेचा बालेकिल्ला

कोकण हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. हा पक्ष केवळ मुंबई आणि ठाण्यापुरता मर्यादित नसून, तो राज्यातील प्रत्येक घराघरांत पोहोचला आहे. ज्या भागांमध्ये पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले, तिथेही महायुतीचा सामूहिक विजय हेच प्राधान्य राहिले, असे एकनाथ शिंदे म्हणाले. ■



राज्यात नगरपंचायत, नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपा सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष ठरल्यानंतर मुंबई येथील कार्यालयासमोर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला

## महत्त्वाचे

### सातार्‍यात भाजपा उमेदवार ४२ हजार मतांनी विजयी

**मुंबई** : सातारा जिल्ह्यातील नगर परिषद निवडणुकीत भाजपाचे उमेदवार अमोल मोहिते ४२ हजार मतांनी नगराध्यक्षपदी निवडून आले, असा दावा मंत्री शिवेंद्रसिंह भोसले यांनी रविवारी केला. हा आकडा विधानसभेत दिसणाऱ्या साधारण मताधिक्यापेक्षा मोठा आहे. महाराष्ट्रातील २८६ नगर परिषदा आणि नगर पंचायतींमधील अध्यक्ष आणि सदस्यपदांच्या निवडणुकीसाठी मतमोजणी रविवारी सकाळी दहा वाजता सुरू झाली. राज्यात महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. अमोल मोहिते यांना ५७,५९६ मते मिळाली. त्यांनी शरद पवार गटाचे उमेदवार सुवर्णदिवी पाटील यांचा पराभव केला. सुवर्णदिवी पाटील यांनी केवळ १५,५५६ मते मिळाली, असे शिवेंद्रसिंह भोसले यांनी निवेदनात म्हटले. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड नगर परिषदेत महायुतीने निर्भेळ विजय मिळवल्याची माहिती गृह राज्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते योगेश कदम यांनी दिली. महायुतीने सर्व २१ जागा जिंकल्या, यात शिवसेनेने १७ आणि भाजपाला तीन जागा मिळाल्या. ■

## श्रीवर्धनमध्ये राजकीय भूकंप

### विजयानंतर लगेच उबाठाचा नगराध्यक्ष शिंदेंच्या गळाला

**श्रीवर्धन** : रायगड जिल्ह्याच्या राजकारणात एक मोठा भूकंप झाला आहे. श्रीवर्धन नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे अतुल चौगुले दणदणीत बहुमताने निवडून आले आहेत. मात्र, विजयाचा गुलाल अंगावर असतानाच एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंचा हा विजयी नगराध्यक्ष आपल्या गळाला लावला आहे.

विशेष म्हणजे, अतुल चौगुले यांनी विजयाचे श्रेय एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांना दिले असून, ते शिंदे सेनेत प्रवेश करणार आहेत. हा उद्धव ठाकरे यांच्यासाठी कोकणात मोठा धक्का मानला जात आहे. श्रीवर्धन नगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची ठरली. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार आणि मंत्री भरत गोगावले यांनी मोठी खेळी खेळली. सुनील तटकरेंचा पराभव करण्यासाठी त्यांनी पडद्याआडून ठाकरे गटाचे उमेदवार अतुल चौगुले यांना ताकद दिली. दोन्ही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम केल्यामुळे तटकरेंच्या उमेदवाराला पराभवाचे तोंड पाहावे लागले.

### जल्लोष करताना राकाँचे १६ कार्यकर्ते होरपळले

**जेजुरी** : जेजुरीत मतमोजणी पार पडून निकाल जाहीर झाल्यानंतर गडाच्या पहिल्या पायरीजवळ खंडेरायाचरणी भंडारा अर्पण करून आशीर्वाद घेताना भंडाऱ्याचा भडका होऊन त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे १६ कार्यकर्ते होरपळले. यात निवडून आलेल्या राष्ट्रवादी कांग्रेसच्या नगरसेविका मोनिका घाडगे व त्यांच्या पतीचादेखील समावेश आहे. होरपळलेल्या कार्यकर्त्यांचा तातडीने येथील खाजगी व सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मल्हार नाट्यगृह येथे मतमोजणी व निकाल जाहीर झाल्यानंतर राष्ट्रवादीचे विजयी उमेदवार व कार्यकर्ते खंडोबा गडाच्या पहिल्या पायरीजवळ भंडारा अर्पण करण्यासाठी गेले होते. या ठिकाणी कार्यकर्त्यांनी उधळण केलेल्या भंडाऱ्याने अचानक पेट घेतला व स्फोटही झाला. यामध्ये सुमारे १६ जण भाजले असून यात महिलांचा समावेश आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांनी सांगितले, की गडाच्या पहिल्या पायरीजवळ घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असून ज्वालाग्राही व भेसळयुक्त भंडाऱ्याने पेट घेऊन मोठा भडका उडाला. भविष्यात भेसळयुक्त भंडाऱ्याच्या विक्रीवर कडक कारवाई करण्यात येणार असून नगरपालिका याबाबत पुढील काळात कठोर पावले उचलेल. ■




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३२,२०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,०३,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.० | १३.६ |
| अमरावती | २९.४ | ९.० |
| भंडारा | ३०.० | १०.० |
| बुलडाणा | २५.६ | १२.२ |
| चंद्रपूर | २९.८ | १२.० |
| गडचिरोली | २८.४ | १०.४ |
| गोंदिया | २६.९ | ८.० |
| नागपूर | २८.० | ८.२ |
| वर्धा | २८.५ | ९.४ |
| वाशीम | ३१.२ | ११.२ |
| यवतमाळ | ३१.० | ८.५ |

# नगरपालिका निवडणुकीत युवाशक्तीचा डंका

### मोहोळच्या सिध्दी वस्त्रे आणि सिंदखेडराजाचे सौरभ तायडे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष



◆ **सोलापूर, २१ डिसेंबर**

सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ नगरपरिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने भारतीय जनता पक्षाला जबरदस्त धक्का दिला आहे. शिवसेनेच्या उमेदवार सिद्धी वस्त्रे यांनी भाजपाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांचा पराभव करत नगराध्यक्ष पदावर कब्जा केला. विशेष म्हणजे, अवघ्या २२ व्या वर्षी ही किमया साधणाऱ्या सिद्धी वस्त्रे या राज्यातील सर्वात तरुण महिला नगराध्यक्ष ठरल्या आहेत. तर बुलढाणा येथील सिंदखेडराजा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सौरभ तायडे हे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत.

सिद्धी वस्त्रे यांनी भाजपाच्या शीतल क्षीरसागर यांचा १७० मतांच्या फरकाने पराभव केला. या निकालाने सोलापूर जिल्ह्यातील भाजपाच्या गोटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे. नगराध्यक्ष पदासोबतच नगरपरिषदेच्या एकूण २० जागांपैकी ९ जागांवर शिवसेनेने विजय मिळवत आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

#### सौरभ तायडे हे सर्वांत कमी वयाचे नगराध्यक्ष

दरम्यान, सिंदखेड राजा नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे सौरभ तायडे हे सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत. त्यांचे वय २१ वर्ष १० महीने आहे. युवा उमेदवार सौरभ विजय तायडे यांनी अवघ्या १६९ मतांच्या फरकाने विजय मिळवला. ते सर्वात कमी वयाचे नगराध्यक्ष ठरले आहेत. ■

## हा महायुतीचा सामूहिक विजय

### उपमुख्यमंत्री अजित पवारांची प्रतिक्रिया

**मुंबई**: नगरपालिका,नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुक निकालांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशामुळे राष्ट्रवादीच्या विकासात्मक, र्वधर्मसमभावाच्या भूमिकेवर जनतेचे शिक्कामोर्तब झाल्याचे या निकालांवरून स्पष्ट झाले आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नगर परिषद निवडणुकीच्या निकालांनंतर व्यक्त केली. हा विजय महायुतीचा सामूहिक विजय आहे. आम्ही जिथे एकत्र लढलो तिथे मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवला आणि जिथे मैत्रीपूर्ण लढती झाल्या तिथेही लोकशाहीचा आदर करण्यात आला, असेही अजित पवार यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## एकाच कुटुंबातील भाजपाच्या सहा उमेदवारांचा पराभव

### नांदेडमध्ये लोकांनी नाकारली घराणेशाही

◆ **नांदेड, २१ डिसेंबर**

नांदेड जिल्हातील लोहा नगर परिषदेच्या निवडणुकीत एकाच कुटुंबातील भाजपाच्या सहा उमेदवारांचा पराभव झाला. येथे लोकांनी घराणेशाही नाकारली आहे.

लोहा नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी भाजपाने गजानन सूर्यवंशी यांना उमेदवारी जाहीर केली. नगरसेवक पदासाठी गजानन सूर्यवंशी यांची पत्नी गोदावरी सूर्यवंशी, भाऊ सचिन सूर्यवंशी, भावाची पत्नी सुप्रिया सचिन सूर्यवंशी, मेहुणा युवराज वाघमारे, भाच्याची पत्नी रीना अमोल व्यवहारे यांना उमेदवारी दिली होती. मात्र, जनतेने त्यांना नाकारत घराणेशाहीला थारा नसल्याचे दाखवून दाखवून दिले. भाजपाने एकाच घरातील सहा जणांना तिकीट दिल्याने जिल्ह्यात ही नगर परिषद चर्चेचा विषय बनली होती. इथे नगराध्यक्षपदासाठी शरद पवार गटाने विजय मिळवला आहे.

लोहा नगर परिषदेत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस अशी तिरंगी लढत पहायला मिळाली. राकाँचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांचा लोहा हा बालेकिल्ला मानला जातो.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात भाजपा नांदेडच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढल्या आहेत. चव्हाण भाजपावासी झाल्यापासून जिल्ह्यात भाजपाची ताकद वाढली आहे. लोहा नगर परिषदेसाठी इच्छुकांची संख्याही अधिक होती, असे असताना भाजपाने एकाच कुटुंबातील सहा जणांना उमेदवारी दिल्याने तो चर्चेचा ठरला होता. ◂(वृत्तसंस्था)

## निकालांनंतर शरद पवार गटात अस्वस्थता

◆ **मुंबई, २१ डिसेंबर**

निकालांमधून राज्यातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा ठळकपणे समोर आली असून महायुतीतील घटक पक्षांनी मोठा विजय मिळवत आपली ताकद सिद्ध केली आहे. भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या सत्ताधारी आघाडीला अनेक ठिकाणी अपेक्षेपेक्षा जास्त यश मिळाले आहे. त्याउलट महाविकास आघाडीला मात्र या निवडणुकांमध्ये मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले असून अनेक नगरपरिषदांमध्ये आघाडीचे खातेही उघडता आले नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



या निकालांनंतर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अस्वस्थता स्पष्टपणे जाणवू लागली आहे. आमदार रोहित पवार यांनी या निकालांबाबत उघडपणे नाराजी व्यक्त करत तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी हा निकाल अत्यंत निराशाजनक असून तो प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात नैराश्य निर्माण करणारा असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी घेतलेली मेहनत, उमेदवारांनी केलेली धडपड आणि जनतेसमोर ठेवलेली भूमिका असूनही अपेक्षित यश मिळाले नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

उमेदवारांनी पूर्ण ताकदीने निवडणूक लढवली तरीही जो निकाल लागला, तो अत्यंत निराशाजनक आहे, असे त्यांनी नमूद केले. जनतेवर कोणताही आक्षेप नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी निवडणूक प्रक्रियेत सर्वत्र पैशाचेच प्राबल्य राहिले, अशी भावना व्यक्त केली. ◂(वृत्तसंस्था)

### कणकवलीत शिवसेनेने केला भाजपाचा पराभव

◆ **मालवण, २१ डिसेंबर**

कणकवली नगर परिषदेतील वर्चस्वाच्या लढाईत भाजपाने शिवसेनेकडून पराभव पत्करला. येथे शिवसेनेचे नीलेश राणे यांनी पाठिंबा दिलेल्या उमेदवाराने त्यांचे भाऊ आणि राज्याचे मंत्री नितेश राणे यांनी पाठिंबा दिलेल्या प्रतिस्पर्ध्याचा त्यांच्याच बालेकिल्ल्यात पराभव केला. ◂(वृत्तसंस्था)

## राज्यात मतमोजणीला गालबोट

◆ **नाशिक, २१ डिसेंबर**

विजयाचा हा गुलाल उधळला जात असतानाच नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि धुळे जिल्ह्यांत निकालाच्या रागातून हिंसक घटना घडल्याने निवडणूक प्रक्रियेला गालबोट लागले आहे.

नाशिकच्या येवला नगरपालिकेतून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रभाग क्रमांक चारच्या निकालानंतर शहरातील मोमीनपुरा भागात दोन गटांत तुफान हाणामारी झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव जिव्हारी लागल्याने हा वाद उफाळल्याचे समजते. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार रुपेश दराडे यांच्या कार्यकर्त्यांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणमध्येही निकालाचा राग दगडफेकीतून बाहेर पडला. येथे चक्क दोन पराभूत उमेदवारांचे गट एकमेकांशी भिडले. आपल्या पराभवासाठी एकमेकांना जबाबदार धरत पैठणच्या नेहरू चौकात दोन्ही गटांकडून जोरदार दगडफेक करण्यात आली. या हिंसक वळण घेतलेल्या वादात पाच जण जखमी झाले. धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहरातही मतमोजणीला गालबोट लागले. शिरपूरमधील वाल्मिक नगर भागात विजयी उमेदवाराची मिरवणूक काढली जात असताना अज्ञातांनी अचानक दगडफेक केली. या प्रकारामुळे मिरवणुकीत सहभागी कार्यकर्त्यांची पळापळ झाली. ◂(वृत्तसंस्था)



कराड येथील नगरपरिषद निवडणुकीत विजयानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत जल्लोष केला.

## लोकांना विधायक काम हवे, टीका नव्हे : अशोक चव्हाण

### निवडणूक निकालावर केले भाष्य

◆ **छ. संभाजीनगर, २१ डिसेंबर**

नागरिक केवळ विधायक कामांनाच प्राधान्य देतात आणि टीका नाकारतात, हे आजच्या निकालावरून स्पष्ट झाले, असे भाजपाचे खासदार अशोक चव्हाण यांनी रविवारी विरोधकांवर टीका करताना सांगितले.



केवळ टीका करून चालणार नाही, तर विधायक काम हवे असल्याचे लोकांनी दाखवून दिले आहे. राज्य आणि केंद्र सरकार विकासासाठी आक्रमकपणे काम करीत असल्यानेच लोकांनी महायुतीला मतदान केले, असे चव्हाण यांनी पत्रकारांना सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते असलेले चव्हाण यांनी या वर्षाच्या सुरुवातीला भाजपामध्ये प्रवेश केला होता. २८६ नगर पालिका आणि नगरपंचायतींच्या निकालांमध्ये भाजपाप्रणीत महायुतीने वर्चस्व गाजवल्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

नांदेडमध्ये भाजपाने जिल्ह्यातील इतर दोन नगरपालिकांसोबत आणखीन तीन नगरपालिकांवर विजय मिळवला आहे. इतर ठिकाणी जिथे संबंधित आमदार जबाबदार आहेत, तिथे काय घडले आहे, ते आम्ही पाहू. आम्ही एक आढावा बैठक बोलावू, असे चव्हाण म्हणाले. या निवडणुकीच्या निकालाचा पुढील महिन्यात होणाऱ्या २९ महापालिकांच्या निवडणुकांवर परिणाम होईल, असे चव्हाण म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

## ठाण्यातील दोन गडांवर भाजपाचा झेंडा

### अंबरनाथ, बदलापूर नगर परिषदांमध्ये विजय

◆ **मुंबई, २१ डिसेंबर**

शिवसेनेचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गड मानल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातील दोन गडांवर भाजपाने झेंडा फडकवला आहे. अंबरनाथ आणि बदलापूर या दोन शहरांतील नगर परिषदांमध्ये भाजपाने नगराध्यक्षपदाचे उमेदवार निवडून आणले.

बदलापूर नगर परिषदेमध्ये भाजपाच्या रुचिता घोरपडे आणि शिवसेना शिंदे गटाच्या वीणा म्हात्रे यांच्यात नगराध्यक्षपदासाठी लढत झाली. ठाकरे गटाने येथे प्रिया गवळी यांना उमेदवारी दिली होती. अटीतटीच्या निवडणुकीत भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार रुचिता घोरपडे यांनी सुमारे १० हजारांहून अधिक मतांची आघाडी घेत विजय मिळवला. बदलापूरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे २३ आणि भाजपाचे २३ नगरसेवक निवडून आले तर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन नगरसेवकांनी विजय मिळवला.

अनेक आरोप-प्रत्यारोपांमुळे गाजलेल्या अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीमध्येही भाजपा आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात मुख्य लढत झाली. काँग्रेसनेही या दोन्ही पक्षांसमोर मोठे आव्हान उभे केले होते. दरम्यान, अंबरनाथमध्ये शिवसेनेच्या मनीषा वाळेकर आणि भाजपाच्या तेजश्री करंजुले यांच्यात झालेल्या नगराध्यक्षपदाच्या लढतीत तेजश्री करंजुले यांनी सुमारे सहा हजारांच्या मताधिक्याने विजय मिळवला. अंबरनाथमध्ये शिवसेना शिंदे गटाचे २७, भाजपाचे १३, काँग्रेसचे १२ अजित पवार गटाचे ४ तर, इतर दोन नगरसेवक विजयी झाले. ◂(वृत्तसंस्था)

## मंत्री संजय सावकारेंच्या पत्नीचा पराभव

◆ **भुसावळ, २१ डिसेंबर**

जळगाव जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानल्या जाणाऱ्या भुसावळ नगर परिषदेत भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या सौभाग्यवती रजनी सावकारे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार गायत्री भंगाळे-गौर यांनी १८०० पेक्षा अधिक मतांनी पराभव केला आहे. भुसावळात मोठ्या सभा घेऊनही भाजपाला हा बालेकिल्ला राखता आला नाही, त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. भुसावळ नगर परिषदेची ही निवडणूक सुरुवातीपासूनच चुरशीची ठरली होती. नगराध्यक्षपद अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी राखीव झाल्याने राजकीय समीकरणे बदलली होती. भाजपने मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी सावकारे यांना उमेदवारी दिल्याने विरोधकांनी घराणेशाहीचा मुद्दा उचलून धरला. सत्तेचा गैरवापर आणि एकाच कुटुंबाकडे पदे, या आरोपांना मतदारांनी पसंती दर्शवल्याचे निकालावरून स्पष्ट होत आहे. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जोहान्सबर्गमध्ये बेछूट गोळीबार

## दक्षिण आफ्रिका हादरली, १२ नागरिकांचा मृत्यू, १० जखमी

◆ **जोहान्सबर्ग, २१ डिसेंबर**

अमेरिका, ऑस्ट्रेलियानंतर आता दक्षिण आफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरात बेकरसडल या टाऊनशीपसमोरील बारजवळ शनिवारी मध्यरात्रीनंतर १.३० वाजताच्या सुमारास दोन कारमधून आलेल्या माथेफिरूंनी नागरिकांवर बेछूट गोळीबार केला. या घटनेत १२ नागरिकांचा मृत्यू झाला असून, १० जण जखमी आहे. हल्ल्यानंतर आरोपी कारमधून पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलिसांनी दहशतवादी हल्ल्याची शक्यता वर्तवली आहे.

ऑस्ट्रेलियाची राजधानी सिडनी येथीव बोन्डी बीचवर झालेल्या बेछूट गोळीबाराची घटनात ताजी असताना आता दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे बेछूट गोळीबाराची घटना समोर आली. या महिन्यातील दक्षिण आफ्रिकेतील ही दुसरी सामूहिक गोळीबाराची घटना आहे. गौतेंग प्रांतातील पोलिस प्रवक्त्या ब्रिगेडियर ब्रेंडा मुरिडिली यांनी प्रसार माध्यमांना सांगितले की, जोहान्सबर्ग येथून नैऋत्य दिशेला ४० किमी अंतरावर असलेल्या बेकरसडल टाऊनशीजवळील एका बारजवळ गोळीबार झाला. काही लोक रस्त्यावर उभे असताना त्यांच्यावर दोन कारमधून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी अचानक गोळीबार केला आणि काही वेळातच ते कारमधून पसार झाले. या घटनेत आतापर्यंत १२ लोक ठार झाले, तर १० जण जखमी आहेत. या हल्ल्यामागचा हेतू अद्याप स्पष्ट झालेला नाही, मात्र या घटनेमागे दहशतवादी कट असल्याचा संशय असून, त्या दिशेने तपास सुरू आहे. पोलिस यंत्रणा मृत्युमुखी पडलेल्यांची ओळख पटविण्याचा प्रयत्न करत आहे.

गोळीबाराची घटना झाली, तेथून काही अंतरावर एक सोन्याची खाण आहे. याठिकाणी विनापरवाना मद्यविक्री सुरू होती. यापूर्वी ६ डिसेंबर रोजी प्रिटोरियाजवळ एका वसतिगृहात हल्लेखोराने केलेल्या गोळीबारात १२ लोकांचा मृत्यू झाला होता. (वृत्तसंस्था)



### दहशतवादी इसिसवर संशय

गोळीबाराच्या घटनेनंतर राजधानी जोहान्सबर्गमध्ये सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली. प्राथमिक तपासात दहशतवादी इसिस या हल्ल्यामागे असल्याचा संशय आहे. सीसीटीव्ही कॅमेरात दोन्ही कारचे नंबर कैद झाले असून, त्यांचा शोध घेतला जात आहे. कारमध्ये असलेले सर्व हल्लेखोर तोंडाला कापड बांधून होते.

# हिंदू तरुणाच्या हत्या प्रकरणी १० आरोपींना अटक

● मोहम्मद युनूस यांची माहिती ● भारतीय उच्चायुक्तालयाची सुरक्षा वाढवली

◆ **ढाका, २१ डिसेंबर**

बांगलादेशातील २७ वर्षीय हिंदू तरुण दीपू चंद्र दासच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी दहा आरोपींना अटक केली असून, आतापर्यंत ईशनिंदेचा कोणताही पुरावा सापडलेला नाही. भारतीय उच्चायुक्तालयाच्या रक्षणासाठी अतिरिक्त सुरक्षा दलाची तुकडी तैनात करण्यात आल्याची माहिती बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूस यांनी रविवारी एक्सवरील पोस्टमध्ये दिली.

युनूस यांनी म्हटले की, बांगलादेशातील मैमनसिंग जिल्ह्यात हिंदू तरुणाची झालेली हत्या अतिशय दुःखद आहे. यासाठी जबाबदार असलेल्या आरोपींना कठोर शिक्षा केली जाईल.

या प्रकरणात रॅपिड ॲक्शन बटालियनने सात जणांना तर स्थानिक पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. चितगाव, ढाका आणि सिल्हेटमधील भारतीय उच्चायुक्तालय कार्यालय आणि व्हिसा अर्ज केंद्र येथे सुरक्षा वाढवण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून हे पाऊल उचलण्यात आले. उच्चायुक्तालयावर झालेल्या हल्ल्याची

निष्पक्षपणे चौकशी केली जाईल आणि गुन्हेगारांना कायद्यानुसार कठोर शिक्षा केली जाईल. अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेसाठी सरकारकडून उपाययोजना केल्या जात आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारतीय उच्चायुक्तालयातील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतल्यानंरच भारतीय व्हिसा केंद्रातील सेवा सुरू करण्यात येईल. बांगलादेशातील चितगावमधील भारतीय सहाय्यक उच्चायुक्तालयाबाहेर झालेल्या हिंसाचारानंतर, भारतीय व्हिसा केंद्रातील सेवा तात्पुरत्या स्वरूपात निलंबित करण्यात आल्या आहेत. (वृत्तसंस्था)




### अल्पसंख्यकांच्या सुरक्षेवर भारताची चिंता

**परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले की, बांगलादेशातील परिस्थिती चिंताजनक असून आम्ही तेथील अल्पसंख्यकांच्या सुरक्षिततेची मागणी सरकारकडे केली आहे.**

### बीएनपी नेत्याच्या मुलीला जिवंत जाळले

बांगलादेशातील लक्ष्मीपूर सदर येथे कट्टरपंथी जमावाने शनिवारी रात्री बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी अर्थात् बीएनपीचे नेते बिलाल हुसैन यांच्या चितगाव येथील घराला बाहेरून कुलूप लावून पेट्रोल टाकून आग लावली. या आगीत त्यांची सात वर्षांच्या मुलीचा होरपळून मृत्यू झाला, तर दोन मुली गंभीर जखमी आहे. आयशा अख्तर असे मृत मुलीचे नाव असून सलमा अख्तर (वय,१६) आणि सामिया अख्तर (वय, १४) असे जखमी मुलींचे नावे आहे. लक्ष्मीपूर सदर मॉडेल पोलिस ठाण्याचे प्रभारी मोहम्मद वाहिद परवेझ यांनी सांगितले की, याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींचा शोध सुरू आहे.

# २०२२ पासून रशियन सैन्यात २०० हून अधिक भारतीय

## २६ जणांचा मृत्यू, परराष्ट्र मंत्रालयाची माहिती

◆ **नवी दिल्ली, २१ डिसेंबर**

रशिया आणि युक्रेनमधील सुरू असलेल्या युद्धात एक धक्कादायक खुलासा समोर आला आहे. भारत सरकारने संसदेत खुलासा केला आहे की २०० हून अधिक भारतीय नागरिक रशियन सैन्यात सामील झाले आहेत आणि या युद्धात लढत आहेत. राज्यसभेतील खासदारांच्या प्रश्नांना उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने ही आकडेवारी दिली. राज्यसभेत खासदार साकेत गोखले आणि रणदीप सिंग सुरजेवाला यांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखी उत्तर देताना भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने ही आकडेवारी दिली.

'रशियन सैन्यात भारतीय नागरिकांची सुटका' या शीर्षकाच्या निवेदनात मंत्रालयाने म्हटले आहे की फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून २०२ भारतीय नागरिक रशियन सशस्त्र दलात सामील झाल्याचे ज्ञात आहे. तथापि, सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांमुळे, यापैकी ११९ नागरिकांना अकाली सोडण्यात आले आहे. मृतांच्या संख्येबाबत निवेदनात म्हटले आहे की, रशियाच्या सीमावर्ती भागात झालेल्या लढाईत २६ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला आहे आणि सात जण बेपत्ता असल्याची माहिती आहे.

मंत्रालयाने पुढे म्हटले आहे की, रशियन सैन्याकडून ५० भारतीय नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत आणि १० मृतांचे मृतदेह परत मिळवण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाने आश्वासन दिले की, भारतीय नागरिकांच्या सुरक्षितता, कल्याण आणि लवकर सुटका करण्याबाबत भारत सरकार रशियन बाजूशी सतत संपर्कात आहे. दोन्ही देशांच्या नेत्यांमध्ये, मंत्री आणि अधिकाऱ्यांमध्ये या विषयावर विविध पातळ्यांवर चर्चा सुरू आहे.

मंत्रालयाने असेही म्हटले आहे की मृत किंवा बेपत्ता झालेल्या १८ भारतीयांचे डीएनए नमुने रशियन अधिकाऱ्यांसोबत शेअर करण्यात आले आहेत.

हे लक्षात घ्यावे की २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून, रशियाने राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या युद्धाला पुढे नेण्यासाठी १२८ देशांमध्ये भरती मोहीम तीव्र केली आहे. (वृत्तसंस्था)


# इस्रोची ड्रोग पॅराशूटची चाचणी यशस्वी

## अंतराळवीर पृथ्वीवर सुरक्षित उतरणार

◆ **बंगळुरू, २१ डिसेंबर**

गगनयान मोहिमेतील क्रू मॉड्यूलचा वेग कमी करणारी ड्रोग पॅराशूटची चाचणी इस्रोने यशस्वी केली. या चाचण्या १८ आणि १९ डिसेंबर रोजी चंडीगडमधील टर्मिनल बॅलिस्टिक्स संशोधन प्रयोगशाळेच्या अर्थात् टीबीआरएल युनिटमध्ये घेण्यात आल्या होत्या.

क्रू मॉड्यूलच्या माध्यमातून अवकाशवीरांना पृथ्वीवर आणले जाते. यासाठी विशिष्ट पॅराशूट लागतात. गगननयानच्या मोहिमेत चार प्रकारचे १० पॅराशूट आहेत. या चाचण्यांमुळे यानाच्या विविध उड्डाण परिस्थितींमध्ये ड्रोग पॅराशूट्सची कार्यक्षमता आणि विश्वासार्हता सिद्ध झाली असून, मानवी अंतराळ प्रवासातील ही एक महत्त्वाची पायरी मानली जात आहे. इस्रोच्या मते,



यानाचा वेग कमी करण्याची मालिका पॅराशूट चेंबरमधून संरक्षक कव्हर काढून टाकण्यापासून सुरू होते. त्यानंतर दोन ड्रोग पॅराशूट सज्ज केले जातात. तीन पायलट हे पॅराशूट उघडतात. हे मुख्य पॅराशूट क्रू मॉड्यूलची गती आणखी कमी करतात, ज्यामुळे पृथ्वीवर क्रू मॉडेलचे सुरक्षित लँडिंग होते. इस्रोने या संदर्भातील माहिती एक्सवर प्रसिद्ध केली आहे. (वृत्तसंस्था)

### बिबट्याच्या हल्ल्यात मुलाचा मृत्यू

**अमरेली** : गुजरातमधील अमरेली जिल्हयात रविवारी बिबट्याच्या हल्ल्यात एका पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाला. धारी शहराजवळील गोपालग्राम या गावात ही सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. बिबट्या शेतात लपला होता. मुलगा खेळत असताना बिबट्याने अचानक झडप घालून त्याला शेतात ओढत नेले. साहिल कटारा, असे या मुलाचे नाव असून हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला होता. रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### हत्ती मृत्यूप्रकरणी केंद्राने मागविला अहवाल

◆ **गोसाबा, २१ डिसेंबर**

आसामातील होजाल जिल्ह्यात शनिवारी रेल्वेच्या धडकेत दहा हत्तीचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी केंद्र सरकारने राज्य सरकारला विस्तृत अहवाल मागविला आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंद्र यादव यांनी आसामातील घटनांबरोबरच अन्य राज्यांमध्ये हत्ती अपघातांच्या घटनांचे अहवाल मागविले आहेत. यासंदर्भात हत्ती आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण अधिकाऱ्यांशी या विषयावर रविवारी चर्चा केल्यानंतर यादव यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# हेरगिरी करणाऱ्या लष्करी जवानाला अटक

## देशातून पळून जाताना पंजाब पोलिसांनी पकडले

◆ **मोतिहारी, २१ डिसेंबर**

भारत-नेपाळ सीमेवरील मोतिहारी भागातील रक्सौल येथे पंजाब पोलिसांनी भारतीय लष्कराने फरार घोषित केलेला आणि पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या जवानाला अटक केली. त्याच्या ताब्यातून ५०० ग्रॅम हेरॉईन आणि ग्रेनेड जप्त करण्यात आले. राजवीर सिंग उर्फ फौजी असे त्याचे नाव असून, त्याला फेब्रुवारी महिन्यात लष्कराने फरार घोषित केले होते.

२०२२ मध्ये, राजवीर इंटरनेटद्वारे पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर, तो नेपाळमध्ये लपून होता आणि तेथून पंजाब आणि नेपाळदरम्यान ड्रग्ज तस्करीचे नेटवर्क चालवत होता. एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला सांगितले की, राजवीर देश सोडून पळून जाण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी सापळा रचला. भारत-नेपाळ सीमेवर शनिवारी रात्री त्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपी जवान पाकिस्तानातील दहशतवादी आणि तस्करी नेटवर्कशी जोडला गेला होता. ड्रग्ज तस्करीच्या बदल्यात तो पाकिस्तानला भारतीय सैन्याशी संबंधित संवेदनशील आणि गोपनीय माहिती पुरवत होता. पंजाब पोलिसांनी फाजिल्का जिल्ह्यातील कांशीराम कॉलनीतून त्याचा सहकारी चिराग यालाही अटक केली. त्याच्याकडून ९ मिमी पिस्तूल आणि ४०७ ग्रॅम हेरॉइन जप्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)



काश्मीर खोऱ्यात गेल्या दोन दिवसांपासून बर्फवृष्टी सुरू असल्याने पर्वतांवर जणू पांढरीशुभ्र चादर पसरल्याचे दृश्य आहे. गुलमर्ग येथे बर्फवृष्टीचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत आहेत

# सोलापूर जिल्ह्यात 'महायुती'चाच...

पान १ वरून...

आघाडीला २३, भालकेंच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीला १२ आणि अपक्ष एक असे बलाबल झाले आहे. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत डॉ.प्रणिता भालके ह्या निवडून आल्या आहेत

मोहोळ नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाच्या २२ वर्षीय कु.सिध्दी राजू वस्त्रे ह्या १७० मतांनी विजयी झाल्या. त्यांना ६२७३, भाजपाच्या शीतल सुशील क्षीरसागर यांना ६१०३ तर शिवसेना उबाठाच्या उज्वला अमर कांबळे यांना ३६२२ मते मिळाली. नगरसेवकांच्या २० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपा ११, शिवसेना शिंदे गट ८ आणि शिवसेना उबाठा १ असे पक्षीय बलाबल राहिले आहे.

करमाळा नगरपरिषदेच्या निवडणुकीत शहर विकास आघाडीतील सावंत गटाच्या मोहिनी सावंत या १८३१ मतांनी विजयी झाल्या. त्यांनी भाजपच्या सुनिता देवी यांचा पराभव केला. शहर विकास आघाडीचे ८ नगरसेवक निवडून आले. भाजप ७, शिवसेनेचे ५ नगरसेवक निवडून आले आहेत. या निवडणुकीत शिवसेना नेते तथा माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या पत्नी नंदिनीदेवी जगताप आणि त्यांचे पुत्र तथा माजी नगराध्यक्ष वैभव जगताप यांना पराभव चाखावा लागला.



**'अनगर'च्या बिनविरोध जागांची घोषणा**

सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अनगरसह जिल्ह्यातील ६ नगरपालिकेतील ६ प्रभाग आणि २ नगराध्यक्षपदाची निवडणूक स्थगित केली होती. बिनविरोध निवडणूक झालेल्या जागांबाबत राज्य निवडणूक आयोगाचे पत्र आल्याने अनगरच्या त्या १७ सदस्यपदाच्या जागांची आणि १ नगराध्यक्षपदाची आजरोजी अधिकृत घोषणा केल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाकडून मिळाली.

**बेरजेच्या राजकारणाचे प्रतिक**

जिल्ह्यात पूर्वी २ नगरपालिका भाजपाच्या ताब्यात होत्या. आता ४ नगरपालिका ताब्यात आल्या आहेत. ३४-३५ नगरसेवकांचे आता १०० हून अधिक नगरसेवक जिल्ह्यातील नगरपालिकांत झाले आहेत. या निवडणुकीतील आमच्या बेरजेच्या राजकारणाचे हे प्रतिक म्हणावा लागेल. कोणाचे आणि किती प्रवेश झाले यापेक्षा आमच्या जागा किती वाढल्या? हे महत्वाचे आहे, असे भाजपाचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी सांगितले.

**भाजपचा स्वबळाचा निर्णय चुकला**

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली लढविण्यात आलेल्या नगरपालिका निवडणुकांकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. जिल्ह्यात भाजपने पहिल्यांदाच सर्वच ठिकाणी कमळाच्या चिन्हावर नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार दिले होते. जिल्ह्यातील १२ पैकी केवळ ४ जागांवर नगराध्यक्षपदावर विजय झाला. त्यामुळे स्व:बळावर लढण्याचा निर्णय चुकला, असं म्हणण्याची वेळ आल्याचे बोलले जात आहे.

**ॲड.शहाजीबापू ठरले बाजीगर**

शिवसेना शिंदे गटाने ६ जागा चिन्हावर लढवल्या. यातील ३ जागांवर विजय मिळविला. शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार ॲड.शहाजीबापू पाटील यांनी घवघवीत यश संपादन करत बाजीगर ठरले. ॲड.शहाजीबापू पाटील यांनी मिळविलेल्या या यशाचे संपूर्ण राज्यात चर्चा होत आहे.

# ९९ वे अ. भा. साहित्य संमेलन साताऱ्यात

## १ ते ४ जानेवारीदरम्यान रंगणार सारस्वतांचा मेळा




◆ **पुणे, २१ डिसेंबर**

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी २०२६ दरम्यान ऐतिहासिक सातारा नगरीतील शाहू स्टेडियम येथे होणार असून साहित्य अकादमी सन्मान विजेते विश्वास पाटील संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

महाराष्ट्र साहित्य परिषद आणि मावळा फाऊंडेशनच्या वतीने आयोजित या साहित्य संमेलनात भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी राहणार आहे. गुरुवार १ जानेवारी रोजी दुपारी तीन वाजता साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण तर डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन होईल. दुपारच्या सत्रात कविकट्टा, गझलकट्टा, प्रकाशन कट्टा, ग्रंथदिंडीचे आयोजन आहे.



औपचारिक उद्घाटन समारंभ शुक्रवारी २ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, पूर्वाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, उद्घाटक डॉ. मृदुला गर्ग यांच्या उपस्थितीत होईल. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, स्वागताध्यक्ष छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, खा. उदयनराजे भोसले उपस्थित राहतील.

दुपारच्या सत्रात कविसंमेलन, संवाद बाल-कुमार वाचकांशी, परिचर्चा आणि परिसंवाद होणार असून रात्री आठ वाजता प्रशांत दामले यांचे 'शिकायला गेलो एक' हे नाटक सादर केले जाणार आहे.

शनिवारी ३ जानेवारी रोजी कथाकथन, मुलाखत, ज्येष्ठ लेखक-प्रकाशक सत्कार, पुस्तक चर्चा, परिसंवाद होणार असून रात्री 'हास्यजत्रा' हा विशेष कार्यक्रम होईल. (वृत्तसंस्था)

### समारोप कार्यक्रमाला रघुवीर चौधरींची उपस्थिती

**रविवार ४ जानेवारीला पुस्तकचर्चा अंतर्गत 'शाहू पाटोळे लिखित 'अन्न हे पूर्णब्रह्म' यावर चर्चा होणार असून त्यापाठोपाठ मुलाखत, कविसंमेलन, परिसंवाद आणि कादंबरीकारांशी संवाद लक्षवेधी आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समारोप कार्यक्रमाला ज्ञानपीठ विजेते रघुवीर चौधरी प्रमुख पाहुणे राहणार असून यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शंभूराज देसाई, भरत गोगावले, ज्येष्ठ उद्योजक फरोख कुपर या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.**

# लग्न न करता एकत्र राहणे बेकायदेशीर नाही

## अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **लखनौ, २१ डिसेंबर**

लग्न न करता पती-पत्नीसारखे लिव्ह इन मध्ये एकत्र राहणे बेकायदेशीर नाही. अशा जोडप्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ही राज्य सरकारची असून, पोलिसांनी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका प्रकरणावर सुनावणी करताना दिले.

एका महिलेने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती विवेक कुमार सिंह यांनी आदेशात म्हटले की, वैवाहिक स्थिती काहीही असली तरी प्रत्येक नागरिकाच्या जीवित व वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. विवाह न करता एकत्र राहणे हा कोणताही गुन्हा नाही, तसेच लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये असलेल्या प्रौढ व्यक्तींनाही संविधानाने दिलेल्या हक्कांचे संरक्षण मिळण्याचा पूर्ण अधिकार आहे. केवळ अर्जदारांनी विवाह केलेला नाही, या कारणावरून त्यांना भारतीय संविधानात नागरिक म्हणून दिलेले मूलभूत हक्क नाकारता येणार नाही. याचिकाकर्त्या महिलेने त्यांच्या जीवाला धोका असल्याचा आरोप करत पोलिस संरक्षणाची मागणी केली होती. तसेच, स्थानिक पोलिसांकडे मदतीसाठी गेल्यानंतरही कोणतीही मदत मिळाली नसल्याचा दावा त्यांनी केला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे अनेक लिव इन मध्ये राहणाऱ्या जोडप्यांना दिलासा मिळाला आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# 'धुरंधर' भाजपाचा दिग्विजय

राजकारणात निवडणुकीचे मोठे महत्त्व असते. निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेची दारे उघडत असतात आणि सत्ता हा असा गुलाबजाम असतो की, शुगर कितीही वाढणार असली तरी तो कुणालाच सोडवत नाही. त्यामुळेच सारे राजकीय पक्ष, त्यांचे नेते, कार्यकर्ते प्रत्येक निवडणुकीत हिरिरीने उतरतातच. लोकशाहीत हे अपेक्षितच आहे. विजय अपेक्षित असतो, तसा पराभवही अपेक्षित असतो. नगर पालिका आणि नगर पंचायतींची निवडणूक धामधुमीत झाली. महाराष्ट्रात प्रदीर्घ काळ प्रतीक्षा केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू झाल्या आणि आजच्या निकालांनी त्यांचा पहिला टप्पाही पार पडला. पहिला टप्पा होता नगर पालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचा. २४६ नगर पालिका आणि ४२ नगर पंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन टप्प्यांत मतदान झाले आणि त्यांचा निकाल २१ डिसेंबरला लागला. बहुतांशी निकाल तसे अपेक्षितच आहेत. भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला. सर्वाधिक नगरसेवक, नगराध्यक्ष भाजपाचेच निवडून आले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी त्याखालोखाल चांगली कामगिरी केली आहे. एकुणात भाजपासह महायुतीची कामगिरी उत्तमच म्हटली पाहिजे. त्या तुलनेत महाविकास आघाडीची कामगिरी अत्यंत निराशाजनक आहे. मनात आणले तर महाविकास आघाडीतील घटक पक्षांसाठी ही आणखी एक आत्मपरीक्षणाची संधी आहे. राज्याच्या निवडणूक आयोगाने २८८ नगर पालिका व नगर पंचायतींचा कार्यक्रम गेल्या ४ नोव्हेंबरला जाहीर केला होता. २ डिसेंबर रोजी पहिल्या टप्प्याचे मतदान झाले. त्यात २६३ स्थानिक स्वराज्य संस्थांचे भविष्य पेटीत बंद झाले होते. दुसऱ्या टप्प्यात, २० डिसेंबरला उर्वरित स्थानिक संस्थांसाठी मतदान झाले. तसेच दीडेकशे सदस्यांच्या जागांसाठीही मतदान झाले. त्या साऱ्यांचा आज निकाल लागला. या निकालांचे एका वाक्यात वर्णन करायचे तर 'धुरंधर' ठरलेल्या भाजपाच्या दिग्विजयासह महायुतीची मैफिल या निकालांनी आणखी बहरलेली असताना काँग्रेससह महाविकास आघाडीला अद्याप सूर गवसलेला नाही, असेच करावे लागेल.

घराणेशाहीचा विषय अनेक ठिकाणी होता. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या. काही ठिकाणी प्रचंड चुरस होती. त्या-त्या ठिकाणी मतदारांनी आपापला कौल दिला आणि निकालातून आपल्या मनातले दाखवून दिले. सर्वपक्षीय घराणेशाहीवादी नेत्यांचा मुखभंग काही ठिकाणी झाला, तर अनेक ठिकाणी घराणेशाहीविरोधी प्रचाराचा विचार न करता लोकांनी प्रस्थापित कुटुंबातील व्यक्तींना निवडूनही दिले. त्याला स्थानिक समीकरणे कारणीभूत होती. परंतु, एकुणात हा निकाल म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीवर निमशहरी भागांचा विश्वास असल्याचे सांगणारा आहे. महाविकास आघाडी ही महायुतीची सशक्त विरोधक म्हणून नजीकच्या काळात उभी राहू शकणार नाही, हेही या निकालाने सांगितले आहे. महायुतीमधील एकवाक्यता आणि महाविकास आघाडीतील गोंधळ यातूनच या निवडणुकीत काय घडणार आहे ते लक्षात आलेच होते. अपेक्षेप्रमाणेच घडले. गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. त्यानंतर सहाच महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र महाविकास आघाडीची प्रचंड घसरण झाली. लोकसभा निवडणुकीतील कौलामुळे महाविकास आघाडीला अहंगंडाने पछाडले होते. आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद आपल्याकडेच येणार असा वृथा विश्वास महाविकास आघाडीला वाटू लागला होता. आघाडीतील घटक पक्ष विधानसभेच्या वेळी बेसावध राहिले आणि लोकसभेच्या झटक्याने सावध झालेल्या महायुतीने विधानसभा निवडणूक जिंकली. महायुतीने पुढेही सावध पवित्रा कायम ठेवला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर व त्यासाठीच्या हालचालींवर नजर ठेवली. त्यासाठी पूर्वतयारी केली आणि अखेर ही निवडणूक सुद्धा महायुतीने जिंकली. यातील प्रमुख योगदान भाजपाचे. त्याखालोखाल कामगिरी आहे दोन उपमुख्यमंत्र्यांच्या पक्षांची. महाविकास आघाडीतील काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे तिन्ही घटक पक्ष अजिबात चमक दाखवू शकले नाहीत. एकेक टापू, एकेक शहर अशी काही नेते वा पक्षांची छाप दिसते, पण राज्याच्या पातळीवर भाजपाखेरीज इतर कुणाचीही छाप नाही. राज्याच्या पातळीवर एकमेव उठून दिसणारे यश आहे ते भाजपाचे आणि ते यशच मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारे आहे. आता नवे वर्ष उजाडल्याबरोबरचा पंधरवडा महानगर पालिका निवडणुकीच्या धामधुमीचा असेल. त्यानंतर जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील. एकुणात ग्रामीण, शहरी व निमशहरी अशा तिन्ही स्तरांचा कौल लवकरच स्पष्ट होणार आहे. त्या निवडणुकीतही भाजपाची कामगिरी उत्तम राहील, असे या निकालांचे सांगणे आहे. भाजपाची निवडणुकीतील कामगिरी नेहमीच उजवी असते याची काही कारणे आहेत. पहिली बाब अशी की, आता फक्त पक्षाच्या किंवा नेत्याच्या नावावर निवडणुका जिंकता येत नाहीत. अपवादात्मक ठिकाणी यश मिळेलही, पण व्यापक यश मिळविण्यासाठी पक्ष व नेते मातब्बर असले तरी उमेदवारही चांगले असावे लागतात. भाजपामध्ये या गोष्टींची नीट काळजी घेतली जाते. शंभर टक्के ठरविल्याप्रमाणे होत नसेलही, पण शंभर टक्के नियोजन केल्यावर सत्तर-ऐंशी टक्के या प्रमाणात ते प्रत्यक्षात उतरत असते. हा पक्ष कागदावर तयारी करतो आणि नेते-कार्यकर्त्यांना कामाला लावतो. जबाबदाऱ्यांचे वाटप करतो आणि कामांचा हिशेब मागतो. तसे अन्य कोणत्याही पक्षात घडत नाही. काँग्रेसच्या नेत्यांना आजही असे वाटत असते की, मोदी किंवा फडणवीस यांच्या विरोधात अँटिइन्कम्बन्सी असल्यामुळे विजय आपलाच आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला अद्याप साहेबांच्या जादूगार असण्यावर विश्वास आहे. आपली पुण्याई महाराष्ट्रात अजूनही चालेल असा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा समज आहे. वास्तवात असे काहीही घडत नसते. निवडणूक गंभीरपणे लढावी लागते आणि ते फक्त भाजपाच करते. महायुतीतील घटक पक्षांना थोडाफार त्या पक्षाचा कित्ता गिरवावा लागतो. त्याचा त्यांना अर्थातच फायदा होतो. दुसरे म्हणजे सत्तेत असतानाही सर्व निवडणुका जिंकण्याची ईर्ष्या ठेवणे अवघड असते. सत्तेतल्या लोकांना आपलीच सत्ता सर्व थरांत येईल, असा समज होणे स्वाभाविक असते. मात्र, भाजपा कधीही बेसावध राहत नाही. सत्तेत असो वा नसो, निवडणूक जिंकण्यासाठी हा पक्ष हिरिरीने झटतो. त्याचा फायदा भाजपाला होतो. सत्तेत नसलेल्यांनी अँटिइन्कम्बन्सी वगैरेची फँटसी बाजूला ठेवून दिली पाहिजे. गेल्या दशकभरात देशाचे आणि महाराष्ट्राचेही राजकारण बदलले आहे. तसे ते गावागावाचे आणि शहरांचेही बदलले आहे. गावे, छोटी नगरे आणि महानगरे या सर्व ठिकाणच्या नागरिकांच्या काही अपेक्षा आणि आकांक्षा आहेत. त्यांना प्रतिसाद देणारा नेता, पक्ष आणि तसे सर्वाधिक उमेदवार देणे ज्यांना जमेल, त्यांच्या पदरात जनता आपले माप टाकत असते. निमशहरी भागांतील या निवडणुकीचा निकाल एकीकडे सुशासनावर विश्वास टाकतानाच अधिकचे काही मागणाराही आहे. जिथे कुठे महायुतीला विजय मिळाला नसेल, तेथे काय चुकले याचा धांडोळा घेतला तर महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत कामी येणारे मुद्दे सापडतील. आपल्या समस्या-प्रश्न सोडविले जाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनागोंदी संपविणे हे नागरिकांना-मतदारांना हवे आहे. हे काम केंद्रात व राज्यात सत्ता असलेला पक्ष म्हणजे भाजपा चांगल्या रीतीने करू शकतो, असा विश्वास दर्शवितानाच, अनेकानेक अपेक्षा ठेवून मतदारांनी महायुतीला हा कौल दिला आहे हेही समजून घेतले पाहिजे. विश्वास असेल तेथे अपेक्षा असतातच आणि अविश्वास दर्शविला गेला असेल तर अपेक्षाभंगाचे दुःख व्यक्त झालेले असते, एवढेसे गमक समजून घेतले तर निवडणुकीच्या लोकतांत्रिक अन्वयार्थाच्या तळाशी पोहोचणे कुणालाही कठीण नाही. पुढचे घोडामैदान तीन आठवड्यांवर आहे. ▮

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पाकिस्तानला आता 'एल-१६' टॉनिक!

अमेरिका आणि चीन या दोन जागतिक महाशक्तींमध्ये जबर मतभेद असले तरी पाकिस्तानला शस्त्रसज्ज व युद्धसज्ज करण्याच्या मुद्यावर त्यांचे एकमत झालेले दिसते. अमेरिकन प्रशासनाने एका ताज्या निर्णयात पाकिस्तानला १५ हजार कोटी रुपयांची 'एल-१६' उपकरणे विकण्याचा की देण्याचा निर्णय घेतला आहे.

**एल-१६ प्रकरण** : अमेरिकेच्या लॉकहिड मार्टीन या प्रसिद्ध कंपनीने तयार केलेले हे उपकरण लढाऊ विमानांमध्ये वापरले जाते. लिंक- १६ म्हणजे एल-१६ या नावाने ओळखले जाणारे हे उपकरण लढाऊ विमानांना त्यांचे लक्ष्य शोधण्यास, त्याचा मागोवा घेण्यास व ते उद्ध्वस्त करण्यास मदत करते. विशेष म्हणजे हे उपकरण 'जाम' केले जाऊ शकत नाही.

**९२ संच** : अमेरिका पाकिस्तानला या उपकरणाचे ९२ संच पुरविणार आहे. पाकिस्तानी रुपयामध्ये या एका संचाची किंमत १६३ कोटी रुपये राहणार आहे. पाकिस्तानला याचा होणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे पाकिस्तानजवळ असलेल्या एफ-१६ विमानांचे आयुष्य १५ वर्षांनी वाढणार असून, आता ही विमाने २०४० पर्यंत पाकिस्तानी वायुदलाला वापरता येतील.

**७५ विमाने** : पाकिस्तानी वायुदळाजवळ एफ-१६ जातीची ७५ विमाने असून ती आता जुनी झाली आहेत. या सर्व विमानांमध्ये एल- १६ बसविल्यानंतर त्यांना नवसंजीवनी मिळणार आहे. अमेरिका-पाकिस्तान यांच्यातील करारानुसार पाकिस्तानला या विमानांचा वापर भारताच्या विरोधात करण्यास मनाई आहे. ही अटही राष्ट्रपती ट्रम्प शिथिल करू शकतात. त्यानंतर या विमानांचा वापर भारताविरुद्ध करण्यास पाकिस्तान मोकळा राहणार आहे.

**ऑपरेशन सिंदूर** : मे महिन्यात झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानने भारताच्या विरोधात एफ-१६ चा वापर केला नव्हता तर चिनी बनावटीची जेएफ थंडर १० व जेएफ १७ या दोन जातींच्या विमानांचा वापर केला होता. त्याच्यात बसविण्यात आलेल्या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता ३०० किलोमीटर एवढी होती. पाकिस्तानला एल-१६ मिळाल्यानंतर पाकिस्तानच्या हवाई मारक क्षमतेत निश्चितच वाढ होणार आहे.

**निर्णयाचा मुहूर्त!** : २०२१ पासून पाकिस्तान एल-१६ मिळविण्याचा प्रयत्न करीत होता. आता त्याला ते देण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतला आहे. हा निर्णय आताच का घेण्यात आला? भारत-रशिया यांच्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या लष्करी कराराला अमेरिकेने दिलेले हे उत्तर असल्याचे मानले जाते. भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करणे बंद करावे अशी मागणी राष्ट्रपती ट्रम्प वारंवार करीत आहेत. ती मागणी मान्य न करता भारताने रशियाशी लष्करी करार केला. यावर अमेरिका नाराज होणार हे अपेक्षित होते. ती नाराजी कशी व्यक्त होते हा फक्त मुद्दा शिल्लक होता. पाकिस्तानला एल-१६ देण्याचा निर्णय घेत अमेरिकेने भारताला आपल्या नाराजीचा पहिला संकेत दिला आहे. आजवर हे तंत्रज्ञान केवळ नाटो देशांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. नाटोत नसणारा, पण एल-१६ तंत्रज्ञान असणारा पाकिस्तान पहिला देश राहणार आहे. येणाऱ्या दिवसांत अमेरिका पाकिस्तानला मदत करणारे आणखी काही निर्णय घेईल असे मानले जाते.



**हवाई युद्ध** : भारत-पाकिस्तान यांच्यात जेव्हा केव्हा युद्ध होईल ते प्रामुख्याने हवाई युद्ध असेल, तंत्रज्ञानाचे युद्ध असेल असे मानले जाते. ऑपरेशन सिंदूर त्याची झलक होती. दोन्ही देशांनी परस्परांच्या सीमा न ओलांडता हे युद्ध केले. भविष्यकाळातही ते होण्याची शक्यता आहे. भारताच्या विरोधात पाकिस्तानला युद्धसज्ज करण्याचे अमेरिका व चीन दोन्ही महाशक्तींनी ठरविलेले आहे.

**चीनचे जेएफ-३५** : चीन जेएफ थंडर-१० व १७ नंतर जेएफ थंडर- ३५ हे अत्याधुनिक लढाऊ विमान विकसित करीत असून ते पाकिस्तानला विकण्याच्या कराराबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा केली जात आहे. चीनचे हे विमान अमेरिकेच्या एफ-३५ च्या तोडीचे मानले जाते. चीनच्या या विमानाचा आरसीएस म्हणजे रडार क्रॉस सेक्शन तळहातापेक्षाही लहान असल्याने तो शत्रूच्या विमानांना पाहता येणार नाही. परिणामी या विमानातील रडार जाम करता येणार नाही. काही बाबतीत तर हे विमान अमेरिकेच्या एफ-३५ पेक्षाही प्रगत असल्याचे मानले जाते. आणि हे विमान पाकिस्तानला देण्याचा चीनचा मनसुबा आहे.

**नवा करार** : जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला इंडोनेशिया व पाकिस्तान यांच्यात काही दिवसांपूर्वी एक सुरक्षा करार करण्यात आला. पाकिस्तानने काही मुस्लिम देशांशी सुरक्षा करार करण्याचा सपाटा लावला असून त्याच मालिकेत हा करार करण्यात आला असल्याचे समजते. या कराराचा तपशील बाहेर आला नसला तरी संकटाच्या प्रसंगी दोन्ही देश परस्परांच्या मदतीला धावून जातील अशी तरतूद त्यात करण्यात आल्याचे सांगितले जाते. पाकिस्तानने असाच करार काही काळापूर्वी सौदी अरेबियाशी केला आहे.

**मुनीर दुस्साहस करणार?** : पाकिस्तान भारताच्या विरोधात एखादे दुस्साहस करण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले जात आहे. पाकिस्तानच्या तयारीवरून तसा अंदाज बांधला जात आहे. अमेरिका व चीनची फूस असल्याने फिल्ड मार्शल मुनीर यांचे मनोबल उंचावले असल्याचे सांगितले जाते. पाकिस्तानमधील अंतर्गत स्थितीही कमालीची संवेदनशील असून, मुलकी सरकारच्या हाती आता काहीही राहिले नसल्याचे समजते. शरीफ सरकारचे सारे महत्त्वाचे निर्णय मुनीर घेत आहेत. पाकिस्तानात आता अप्रत्यक्ष लष्करी राजवट सुरू झाली आहे. मुनीर यांना मुलकी सरकार उलथवून टाकण्यासाठी काही करण्याचे काम नाही अशी स्थिती देशात तयार झाली आहे. त्यामुळे भारताच्या विरोधात युद्ध सुरू करण्याचा निर्णय ते स्वत: घेऊ शकतात. त्यासाठी भारताच्या सीमावर्ती भागात एखादा दहशतवादी हल्ला घडवून आणावयाचा. मग भारत त्याला उत्तर देईल. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने भारताच्या विरोधात युद्ध सुरू करावयाचे अशी मुनीर यांची मानसिकता असल्याचे मानले जाते.

**लष्कराचा इतिहास** : पाकिस्तानच्या प्रत्येक लष्करी शासकाने भारताच्या विरोधात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष युद्ध केले आहे. जनरल झिया-उल-हक राष्ट्रपती असताना त्यांनी ऑपरेशन टोपाक या सांकेतिक नावाने काश्मीर खोऱ्यात दहशतवाद रुजविण्यास सुरुवात केली. भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केल्यानंतर त्याला उत्तर म्हणून झिया-उल-हक यांनी हे केले होते. एक योगायोग म्हणजे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे बंधू नवाज शरीफ पंतप्रधान असताना, जनरल परवेझ मुशर्रफ यांनी आपल्या सरकारला अंधारात ठेवून कारगिल केले होते. नंतर त्यांनी मुलकी सरकार उलथवित देशाची सूत्रे आपल्याकडे घेतली. नवाज शरीफ यांना लंडनला पलायन करावे लागले. आता शरीफ यांचे बंधू पंतप्रधान आहेत. पाकिस्तानचा एकमेव लोकप्रिय नेता इम्रान खान अडियाला कारागृहात १४ वर्षांची शिक्षा भोगत आहे. पाकिस्तानात घटनादुरुस्ती करीत फिल्ड मार्शल मुनीर यांना तिन्ही सेनादलांचे प्रमुख करण्यात आले आहे. अशा स्थितीत फिल्ड मार्शल मुनीर हे मुशर्रफ-झिया-उल-हक यांच्यापेक्षा वेगळे असतील अशी अपेक्षा करण्याचे कारण नाही. आणि आता तर त्यांना दोन महाशक्तींचे बळ लाभले आहे. अमेरिकेने पाकिस्तानला एल-१६ देणे हा त्याचाच एक भाग मानला पाहिजे. ▮

## वेध

हेमंत सालोडकर

# मोह, माया आणि मेस्सी

फुटबॉल चाहत्यांना ज्याची प्रतीक्षा होती तो अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सी अनेक वर्षांनंतर भारतात आला. तो तीन दिवस भारतात राहिला. त्याच्यासोबत त्याचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल होते. भारत भेटीत त्याने कोलकाता, मुंबई, हैदराबाद आणि दिल्ली या चार मोठ्या शहरांना भेटी दिल्या. मेस्सी येणार म्हणून भारतात त्याच्या स्वागतासाठी चाहत्यांनी जोरदार तयारी केली. पहिल्या दिवशी कोलकाता येथे त्याचे स्वागत झाले. कोलकात्यात मेस्सी सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला. सुरुवातीला सत्कार सोहळा यथोचित पार पडला. पण हा सोहळा अपेक्षेपेक्षा फारच कमी वेळेचा झाला. अवघ्या काही मिनिटांतच मेस्सी स्टेडियममधून निघून गेल्याने उपस्थित चाहत्यांनी स्टेडियममध्ये संताप व्यक्त करीत राडा केला. मेस्सीला प्रत्यक्ष पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये जमले होते. अनेकांनी तिकिटांसाठी हजारो रुपये खर्च केले होते. मात्र मेस्सी फार वेळ न थांबल्याने चाहते संतप्त झाले आणि सॉल्ट लेक स्टेडियमवर मिठाचा खडा पडावा तशी परिस्थिती निर्माण झाली. मेस्सी आला आणि गोंधळ घालून गेला असेच म्हणावे लागेल. मेस्सीला पाहण्यासाठी आलेल्या लोकांनी मैदानात घुसण्याचा प्रयत्न केला. काहींनी खुर्च्या आणि बाटल्या फेकून निषेध व्यक्त केला.

जेव्हा लोक आपल्यासाठी हजारो रुपये खर्च करून येतात, तेव्हा जागतिक स्तरावरच्या खेळाडूची जबाबदारी अधिक वाढते. आपल्या अनुपस्थितीने परिस्थिती हाताबाहेर जात आहे, असे कळल्यावर त्याने लोकांना शांत करणे अपेक्षित होते. पण स्टेडियमवर काय गोंधळ सुरू आहे याची जराही माहिती नसल्याने तो आल्या पावली परत गेला असावा. कोलकातामध्ये फुटबॉल हा क्रीडा प्रकार लोकप्रिय आहे. मेस्सी येथे सामना खेळेल अशी माहिती होती. पण मेस्सी फक्त १० मिनिटांसाठी आला. त्याच्याभोवती फक्त राजकारणी आणि मंत्री होते. आम्हाला काहीच दिसले नाही. त्याने एकही किक मारली नाही. इतके पैसे आणि वेळ वाया गेला असे, एका चाहत्याने सांगितले. मेस्सीभोवती फक्त राजकारणी आणि अभिनेते होते. त्यांनाच सोबत ठेवायचे होते तर मग आम्हाला का बोलावले? आमचे पैसे वाया गेले. पैसे भरून मेस्सीचा चेहराही नीट पाहता आला नाही, असा संताप दुसऱ्या चाहत्याने व्यक्त केला. येथे दुसरी बाजू समजून घेतली पाहिजे की, आपल्या दर्शनासाठी हजारो रुपये घेतले जात आहेत, हे मेस्सीला तरी माहीत होते की नाही, हाही प्रश्नच आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे आयोजकांच्या नियोजनावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मेस्सीसारख्या दिग्गज खेळाडूच्या कार्यक्रमासाठी मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र त्या पूर्ण न झाल्याने चाहत्यांचा संताप उफाळून आला. मेस्सीचा भारत दौरा ऐतिहासिक ठरण्याची अपेक्षा होती, पण कोलकात्यातील गोंधळाने गालबोट लागले. याचा परिणाम म्हणून या कार्यक्रमाचे आयोजक शताद्रू दत्ताला अटक करण्यात आली. या घटनेच्या चौकशीसाठी समितीही नेमण्यात आली आहे. या घटनेसाठी कारणीभूत ठरलेल्यांची चौकशी केली जाईल. दोषींना शिक्षा होईल. पण जे चाहते मेस्सीला पाहण्यासाठी आले होते, त्यांच्या भावनांची दखल कोण घेईल, हा मोठा प्रश्न आहे. असाच गोंधळ यावर्षी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने तब्बल १८ वर्षांनी आयपीएल चषक जिंकल्यावर उडाला होता. चिन्नास्वामी स्टेडियमवर संघाच्या विजयानिमित्त झालेल्या कार्यक्रमात चेंगरीचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला. तशी गंभीर स्थिती कोलकात्यात निर्माण झाली असती तर किती लोकांचा जीव गेला असता याची कल्पनाही करवत नाही. मेस्सीने नंतर हैदराबाद, मुंबई आणि दिल्ली येथेही भेट दिली. पण तेथे उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम व्यवस्थित झाले. कोलकात्यात जेवढी बेशिस्त होती त्याच्या विपरीत स्थिती मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होती. स्टेडियमवर हजारो चाहत्यांनी ''मेस्सी-सचिन''चा जयघोष केला. यावेळी हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकार, राजकारणी उपस्थित होते. एकेक कलाकार येऊन मेस्सीशी हस्तांदोलन करीत होते. मेस्सीसुद्धा अतिशय शांतपणे सर्वांशी बोलत होता. असेच नियोजन कोलकात्यात असते तर तेथील कार्यक्रमाचा आनंद लोकांना घेता आला असता. कोलकाता घटनेपासून धडा घेत यापुढे तरी मेस्सीसारख्या मोठ्या खेळाडूला सार्वजनिक ठिकाणी आणल्यानंतर काय खबरदारी घ्यावी, याची दक्षता घेतली पाहिजे. ▮

९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# व्यसनाधीनतेच्या विळख्यात तरुणाई

१९७१ साली प्रदर्शित झालेल्या 'हरे कृष्णा हरे राम' या चित्रपटात व्यसनाच्या विळख्यात हरवलेली तरुणाई ''दम मारो दम, मिट जाये गम'' या गाण्याच्या माध्यमातून दाखवण्यात आली होती. आज या गोष्टीला जवळपास ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ५५ वर्षांत भारतातील व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिकच वाढले आहे. समाजातील ही व्यसनाधीनता पाहून मनात प्रश्न उभा राहतो की, व्यावसायिक लोकांसोबतच कॉलेजमध्ये जाणारी मुले-मुलीही याच विळख्यात कशी काय सापडली आहेत. एवढेच नव्हे, शाळेतील मुलेही आता यात दिसून येत आहेत. ज्यांच्या आधारावर देशाच्या भविष्याचे सोनेरी स्वप्न समाजाने पाहावे, अशी शाळकरी आणि महाविद्यालयीन पिढी जर व्यसनाच्या विळख्यात सापडत असेल, तर समाजाचे भविष्यही सुरक्षित राहणार नाही.

येणारा काळ आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा आहे. या काळात भारतालाही सहभाग द्यायचा आहे. जगात नवनवे शोध लागत असताना, तंत्रज्ञान समोर जात असताना भारत केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. त्याला जगाच्या रंगमंचावर स्वत:चे उत्कृष्ट प्रदर्शन करावे लागेल. हे प्रदर्शन करणारे नायक म्हणजे आजची शाळकरी पिढी आणि महाविद्यालयीन तरुण-तरुणी आहेत. त्यामुळे समाजातील सर्व समाजचिंतकांनी, जाणत्या लोकांनी या परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना कसे मार्गदर्शन करता येईल? या विळख्यातून त्यांना कसे सोडवता येतील, याचा विचार आणि कृती करणे आवश्यक आहे. पालकांची, शिक्षकांची, कामगारांची, सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका यात महत्त्वाची आहे. सर्वांनी एकत्र येऊन समाजाला या समस्येपासून मुक्त करण्याचे प्रयत्न करावेत. मुलींची व्यसनाधीनता सुद्धा वाढते आहे. नुकतीच एक बातमी वाचण्यात आली, ज्यात महाविद्यालयीन मुलींच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण खूप वाढल्याचे लिहिले होते. त्यावरून समजले की, महाविद्यालयातील मुलीही मोठ्या प्रमाणात सिगारेट, दारू आणि इतर मादक द्रव्यांचे सेवन करीत आहेत. दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांनी घातलेली धाड ज्यात अनेक कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी पकडले गेले होते. पूर्वी व्यसनाधीनतेत पुरुष आणि मुलांचे प्रमाण अधिक असायचे; महिला यातून मुक्त असायच्या. ग्रामीण भागात शेतावर काम करणाऱ्या महिला तंबाखू खायच्या. पण आता शहरांमधील मुली चौकाचौकात सिगारेटचे झुरके सोडताना दिसत आहेत.

शिक्षणाच्या निमित्ताने दुसऱ्या शहरांत, महानगरांत जाऊन शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आहे. तिथे मुले-मुली घर सोडून राहतात. तेव्हा त्यांचा परिचय व्यसनाधीनतेच्या नव्या जगाशी होतो. जिथे सोबतची मुले दारू पितात, म्हणून हाही दारू प्यायला लागतो; सोबतची सिगारेट ओढतात, म्हणून हाही सिगारेट हाती घेतो. पूर्वी दारू-सिगारेटपर्यंत मर्यादित असलेल्या व्यसनात आता एमडी पावडरसह इतर द्रव्यांचाही समावेश झाला आहे. पूर्वी मुलींना सिगारेट ओढताना पाहून आश्चर्य वाटायचे; आता त्या चौकाचौकात मित्रांसह सिगारेट अर्धी-अर्धी ओढताना दिसतात. व्यसनाचे घातक परिणाम हे स्त्री-पुरुष दोघांच्याही शरीरावर होतात. आजच्या मुली या भविष्यातील माता आहेत. स्त्रीचे शरीर नवनिर्मितीसाठी बनलेले आहे. व्यसनामुळे शरीरात जाणारे घातक पदार्थ भविष्यातील प्रजननक्षमतेवर, गर्भधारण क्षमतेवर परिणाम करू शकतात. एक व्यसनाधीन माता आपल्या मुलांना संस्कारक्षम बनवू शकते का? हा प्रश्न समाजाला भेडसावतो. सिनेसृष्टीतील अनेक अभिनेत्री लग्न, मातृत्वापूर्वी शरीर विषमुक्त करण्यासाठी आयुर्वेद, योग, निसर्गोपचार घेतात. म्हणजे त्यांना माहीत आहे की, व्यसनामुळे शरीर विषमुक्त राहिलेले नाही. रासायनिक खतांमुळे जशी जमिनीची उर्वराशक्ती नष्ट होते, तशी व्यसनामुळे मुलींच्या शरीरावर परिणाम होतो. व्यसन केवळ शरीर दुर्बल करत नाही, तर मनालाही दुर्बल करते. दुर्बल मनाच्या व्यक्तीला जीवनसमस्यांना तोंड देणे कठीण जाते. व्यसनातून एकटेपणा, निराशा वाढते. ''हर फिक्र को धुएं में उडाता चला गया'' हे सोपे वाटते, पण चिंता जात नाहीत. प्रथम दारू पिणारा दारू पितो; नंतर दारू त्याला पिते. प्रथम व्यक्ती व्यसनाचा उपभोग घेते; नंतर व्यसन व्यक्तीचा भोग घेते.

आज स्पर्धेचे युग आहे. कामाच्या ठिकाणी राजकारण, वरिष्ठांकडून अन्याय, मित्रांकडून हेटाळणी असे मानसिक आघात होतात. परंतु याचे उत्तर व्यसन नाही. नुकतीच मी एक बातमी वाचली. सई जाधव नावाची तरुणी डेहराडूनच्या सैन्यप्रशिक्षण केंद्रातून अधिकारी म्हणून बाहेर पडली. या महाविद्यालयातून ६७ हजार विद्यार्थ्यांनी सैन्यात प्रवेश मिळविला आहे. पण ९३ वर्षांच्या इतिहासात ही पहिली मुलगी आहे जिने सैन्यामध्ये अधिकारी म्हणून प्रवेश मिळविला आहे. सैनिकांच्या विधवा कठीण प्रशिक्षण पूर्ण करून सैन्यात प्रवेश घेतात. कुठे २२ वर्षांची मुलगी अधिकारी होते, कुठे पायलट होते, कुठे चांद्रयान मोहिमेचे नेतृत्व करते. यांच्याही जीवनामध्ये व्यसनांचा पर्याय उपलब्ध आहे तरीही त्या या मार्गाने गेल्या नाहीत.कर्तबगार स्त्रियांचा पाया भक्कम आहे. व्यसनाधीन असत्या तर हे शक्य झाले नसते. आधुनिकता आणि स्वातंत्र्य म्हणजे व्यसनाधीनता नव्हे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. **उपाययोजना आणि संकल्प** : कुटुंब, समाज, राष्ट्राच्या स्वप्नांची जबाबदारी तरुणांवर आहे. त्यांना व्यसनांच्या विळख्यातून वाचविणे हे समाजचिंतकांचे कार्य आहे. शाळांमधून प्रबोधन आवश्यक आहे. पोलिसांचे 'ऑपरेशन थंडर'सारखे चांगले उपक्रम चालतात. तरीही गावात २०० कोटींचे मादक द्रव्य पकडले जाते. महाविद्यालयाबाहेरील हॉटेल्स, कॉफी हाऊसमधून मादक द्रव्यांचा पुरवठा होतो. कधी राजकीय, कधी पोलिसांच्या आशीर्वादाने हे सर्व चालते. आपण जी इतरांच्या घरात आग लावतो, ती आपल्या घरालाही जाळू शकते हे लक्षात ठेवले पाहिजे.

**''दूसरो के घर आग लगाने का सपना,**
**सदा अपने ही घर खरा होता है''**

एका कथेत एका व्यक्तीला खूप मोठी दौलत मिळेल असे सांगितले जाते. पण बदल्यात जगाच्या कोपऱ्यात एक माणूस मरेल असे त्याला सांगितले जाते. तो मान्य करतो. परंतु तो जेव्हा घरी पोहोचतो तेव्हा त्याचा मुलगा मृत आढळतो. तस्करीमुळे चालत्या-बोलत्या मुलांचे भविष्य नष्ट होते. तस्करांप्रमाणेच त्यांना साहाय्य करणारे काही पोलिस अधिकारी, राजकीय नेते हेही या परिस्थितीला जबाबदार आहेत. व्यसनाधीनता घरोघरची समस्या आहे. प्रबोधन, समुपदेशन, मार्गदर्शनाने ती संपवावी. व्यसनाधीन तरुणांना कला, साहित्य, खेळ, छंद यात गुंतविणे आवश्यक आहे. अशांना जीवनासाठी ध्येय द्यावे. ध्येयवादी विद्यार्थी यशस्वी होईल; ध्येयहीन व्यसनी बनेल. माझ्या संपर्कातील किमान पाच तरुणांना मी मार्गदर्शन करेन, त्यांच्या समस्या ऐकून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवेन, असा संकल्प सुजाण लोकांनी करणे आवश्यक आहे. ▮

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-८०

सोमवार, २२ डिसेंबर २०२५

### लढता लढता आत्मसमर्पण

लढता लढता आत्मसमर्पण
मरण नव्हे रे ते चिर जीवन ॥धृ ॥

पायातिल जो होउन पत्थर, स्वातंत्र्याचे उभवी मंदिर
थोर खरोखर तो कळसाहुन ॥१॥

निजप्राणांची उजळून ज्योती, ही आईची असे आरती
हे चरणांचे तिच्याच पूजन ॥२॥

यज्ञाची ही असे सांगता, आयुष्याची हीच सफलता
हे राष्ट्राचे अपुल्या भूषण ॥३॥

या वीरांची जीवन गाथा, मूर्तिमंत ती असे अस्मिता
ते स्फूर्तीचे निधान पावन ॥४॥

गर्व आईला अशा मुलांचा, सन्मानच तो जन्म-भूमिचा
कृतार्थ माता त्यांना प्रसवुन ॥५॥

दिव्यत्वाची इथे प्रचीती, अमर तयांची जगात कीर्ती
स्मृतीस त्यांच्या त्रिवार वंदन ॥६॥

## वाचक पत्रे

### सद्‌गुरू श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज

श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज हे भगवान दत्तात्रेयांचे दुसरे पूर्णावतार मानले जातात. त्यांचा जन्म १३७८ मध्ये कारंजा (लाड), वाशीम येथे झाला. त्यांचे बालपण अत्यंत विलक्षण होते. लहानपणापासूनच त्यांच्यातील विलक्षण तेज आणि आध्यात्मिक शक्ती लोकांना जाणवू लागली.

श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे संपूर्ण चरित्र हे शरणागत भक्तांच्या रक्षणाचे जिवंत उदाहरण आहे. जेव्हा भक्त ''पाही माम्'' (माझे रक्षण करा) अशी हाक मारतो, तेव्हा महाराज कोणत्याही मर्यादा ओलांडून धावून येतात. त्यांच्या विश्वंभर रूपाने त्यांनी हे सिद्ध केले की, जे शरण येतात, त्यांच्यासाठी ते प्रत्यक्ष ढाल बनतात. महाराजांकडे केवळ शारीरिक व्याधी घेऊनच लोक येत नसत, तर जे संभ्रमात होते, जे अहंकाराने ग्रासलेले होते, त्यांचेही त्यांनी रक्षण केले. त्रिविक्रम भारतींसारख्या विद्वान पंडितांचा अहंकार दूर करून त्यांना सत्य ज्ञानाचा मार्ग दाखवला. अज्ञान आणि अहंकारापासून रक्षण हेच खऱ्या अर्थाने बुद्धीचे रक्षण आहे. ज्या काळी कुष्ठरोग हा असाध्य आणि कलंक मानला जाई, त्या काळी महाराजांनी केवळ दर्शनाने आणि आशीर्वादाने अनेक भक्तांना या रोगातून मुक्त केले. पाही माम् म्हणणाऱ्याला त्यांनी निरोगी आयुष्य बहाल केले. गाणगापूर आणि आजूबाजूच्या परिसरात जेव्हा अन्नान्न दशा होती, तेव्हा महाराजांच्या कृपाप्रसादाने लोकांची दुःखे दूर झाली. अनेकांचे महाराजांनी व्याधी आणि संकटांपासून रक्षण केले. महाराज हे केवळ एका व्यक्तीचे रक्षणकर्ते नाहीत, तर ते विश्वाचे पोषण करणारे विश्वंभर आहेत. त्यांच्या चरणी मस्तक टेकवणे म्हणजेच विश्वाच्या सर्वोच्च शक्तीला शरण जाणे होय. त्यांच्या आरतीतील ''नृसिंह सरस्वति जय विश्वंभरिता'' हा जयघोष आणि ''पाही माम्'' ही प्रार्थना एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक त्यांची महती सांगते, तर दुसरी आपल्यातील समर्पण व्यक्त करते. महाराज जरी कर्दळीवनात गुप्त झाले असले, तरी त्यांनी जाताना वचन दिले होते की, ''मी गाणगापुरातच आहे.'' आजही जो भक्त मनोभावे सद्‌गुरूंची आळवणी करतो, त्याला महाराजांच्या अस्तित्वाची आणि रक्षणाची प्रचीती येते.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

● ● ● ●

### निमित्त ३१ डिसेंबरचे...

३१ डिसेंबर जवळ येताच मस्ती करावी, नशा करावी, मद्यपान करावे, झिंगावे आणि कुठेतरी पडावे या विचारांची वळवळ दिसू लागली आहे. ३१ डिसेंबर म्हणजे फटाके, अपघात, मुलींवरील अत्याचार, पार्ट्या यांना उधाण येते. पोलिस यंत्रणेवर अवाजवी ताण येतो. पुढे काही दिवस वृत्तपत्रे, न्यूज चॅनेल यांमधून भयानक बातम्या थंडपणे दिल्या जातात. मुली व स्त्रियाही या ३१ डिसेंबरच्या वादळात सहभागी होताना दिसत आहेत. स्त्रीवर्ग यात सहभागी होताना परिणामांचा विचार करताना दिसत नाही. काही विपरीत घडले की मग मात्र अगदी दाही दिशांनी टाहो फोडले जातात. अपरात्री घराबाहेर पडणे, मद्यपान करणे, नशा करणे, झिंग आणणारे संगीत ऐकणे, यांमुळे अपघात होणे, मुला-मुलींनी शारीरिक सलगी करणे हे आधी माहीत नव्हते असे भासवले जाते. पण ते खरे नाही. कारण गेली अनेक दशके हे चालू आहे. म्हणजेच सर्व माहीत असूनही आपण नकळतपणे त्यात सहभागी होत आहोत. आपल्या घरातली व आजूबाजूची लहान मुले हे सर्व पाहात आहेत. थोड्याच वर्षात तीही याच मार्गाने जातील. का नासवतोय आपण आपल्या देशाच्या भवितव्याला? यावर्षी निश्चय करूया, ३१ डिसेंबरला रात्री शांतपणे घरी झोपूया! ▮

**छाया मिराशी**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांचा बार असोसिएशनच्या वतीने सत्कार

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय मुंबई न्या. चंद्रशेखर हे तुळजापूर येथील नूतन न्यायालयीन इमारतीच्या उद्घाटनासाठी सोलापूर येथून तुळजापूरकडे प्रस्थान करत असताना सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने त्यांचे स्वागत करत पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला. यावेळी सौहार्दपूर्ण वातावरणात संवाद साधण्यात आला. या प्रसंगी न्यायालयीन प्रशासन, वकील संघटना व न्यायव्यवस्थेतील परस्पर सहकार्याचे महत्व अधोरेखित झाले.यावेळी सोलापूर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव, उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख, सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे, खजिनदार ॲड. अरविंद देडे, सहसचिवा ॲड. मीरा प्रसाद उपस्थित होते. तसेच सोलापूर येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे, सोलापूर न्यायालयाचे प्रबंधक मुकुंद ठोबळे तसेच इतर प्रशासकीय अधिकारीही यावेळी उपस्थित होते.



### संत गाडगेबाबा यांच्या ६९व्या पुण्यतिथीनिमित्त १०१ ब्लँकेट वाटप

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

संत गाडगेबाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथी दिनानिमित्त कुष्ठरोग वसाहत मधील अनाथ वृद्धांना १०१ ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आस्था रोटी बँकचे संस्थापक अध्यक्ष श्री विजय छंचुरे सर आणि सोलापूर शहर परीट धोबी समाज संघटनेचे विश्वस्त समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री नंदकुमार भोसले यांच्या वतीने श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व ब्लँकेट वाटतय कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तसेच यावेळी श्री संत गाडगे महाराज यांच्या जीवनावर संघटनेचे पदाधिकारी विनोद भोसले व दत्तात्रय दळवी यांनी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रम प्रसंगी आस्था रोटी बँकेचे संस्थापक विजय छंचुरे सर व सोलापूर शहर परीट समाज संघटनेचे पदाधिकारी, नंदकुमार भोसले, विनोद भोसले, संतोष काटकर, सचिन चौगुले, अक्षय कारंडे, विजय वाघमारे, प्रभाकर भोसले, दत्तात्रय दळवी,महादेव काटकर, निलेश काटकर या सर्वांनी मिळून कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले.



### वालचंद शिक्षण समूह; अल्पसंख्याक दर्जा मिळवणारी देशातली पहिली जैन संस्था : डॉ. प्रदीप छंचुरे

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

राज्यघटनेप्रमाणे भारतात जैन अल्पसंख्यांक दर्जा मिळविणारी पहिली संस्था होण्याचा बहुमान वालचंद शिक्षण समूहाला प्राप्त झाला. याकरिता स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांचे अनमोल योगदान आहे. या संकुलामुळे अनेक डॉक्टर, इंजिनियर, शिक्षक, वकील अशी समाजाला गतिमान करणारी महान व्यक्तिमत्व घडली आहेत. अल्पसंख्याकाच्या दृष्टीने येथे उत्कृष्ट कार्य केले जात आहे, असे गौरवोद्गार डॉ. प्रदीप छंचुरे यांनी काढले. राष्ट्रीय अल्पसंख्यांक दिनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संतोष कोटी होते. यांप्रसंगी त्यांच्या हस्ते अल्पसंख्यांक प्रवर्गातील विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. डॉ. महावीर शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. यांप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी, डॉ. विजया महाजन, डॉ. गोविंद तोडकरी, डॉ. अभय जाधव, डॉ. संदीप जगदाळे, डॉ. जितेंद्र गांधी, डॉ वासुदेव जाधव, डॉ परमेश्वर कमळे, डॉ भागवत गजधने, डॉ पद्मावती पाटील, डॉ दिपाली राजमाने डॉ मनीषा चवरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.महावीर साबळे यांनी केले. डॉ. स्मिता ढावरे यांनी आभार मानले.

Classifieds

**पाहिजेत**

कौस्तुभ इंजिनिअरिंग येथे Office Clerk (MS-CIT, Tally) - फोन करून येणे. होटगी रोड चव्हाण मोटर्समागे. 7720087726

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# ३४ गोवंशांना कत्तलीपासून जीवनदान

## श्रीराम सेना, प्राणीन फाउंडेशन व बजरंग दल यांची संयुक्त कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.२१ डिसेंबर-**

कुर्डूवाडी येथील अंबड शिराळ या भागातून खूप मोठ्या प्रमाणात देशी गोवंशाची तस्करी होते. अशी गुप्त माहिती मिळाली असता सदर मिळालेली गुप्त माहिती सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. त्यानुसार संबंधित घटनास्थळावर छापा टाकण्यासाठी अकलूज पोलीस स्टेशनचे एपीआय टेंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एक विशेष पथक नेमण्यात आले.

दिनांक १७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान कुर्डूवाडी येथील मौजे अंबड शिराळ तालुका माढा या हद्दीत छापा टाकला असता काटेरी झुडपांमध्ये २२ देशी गोवंश व १२ जर्सी गोवंश अशी एकूण ३४ गोवंश अधिक दाटीवाटीने कोणत्याही चारा पाण्याची व्यवस्था नसलेल्या स्वरूपात आढळले. संबंधित घटनास्थळावर चौकशी केली असता सदरची जनावरे ही यल्लाप्पा अबू वाघमोडे (रा. अंबड शिराळ, तालुका माढा) यांची असल्याची माहिती मिळाल्याने सदर व्यक्तीचा शोध घेत असताना तो घटनास्थळावरील जनावरे पळवून लावण्याचा प्रयत्न करीत असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं. यल्लाप्पा वाघमोडे यांच्याकडून जनावरांची चौकशी केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. सदर जनावरे सुरक्षिततेसाठी २ आयशर टेम्पो गाडी बोलावून सदरच्या कारवाईतील सर्व गोवंश पुढील देखभालीसाठी सुखरूपरीत्या मोडनिंब येथील श्रीकृष्ण गोशाळा बैरागवाडी येथे सुरक्षितरित्या जमा करण्यात आले.



सदर कार्यवाही यशस्वी करण्याकरिता सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, सहपोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, पोलीस निरीक्षक अतुल मोहिते उपनिरीक्षक टेंगळे, मानद पशुकल्याण अधिकारी महेश भंडारी, सोलापुरातील गोसेवक गोपाल सोमानी, प्राणीन फाउंडेशन यांचे सहकार्य लाभले असल्याची भावना श्रीराम सेना जिल्हाध्यक्ष शितलकुमार परदेशी यांनी व्यक्त केली.

कारवाई यशस्वी करण्याकरिता श्रीराम सेनेचे जिल्हाध्यक्ष शितलकुमार परदेशी, गोरक्षक प्रशांत परदेशी, गणेश बिजर्गी, अनिकेत गोरट्याल, पवन बल्ला बजरंग दलाचे यशवंत सुर्वे गोपाळ सुगंधी, मंगेश चिमकर, आदी गोरक्षकांनी कारवाई यशस्वीरित्या पार पडली. संबंधित कारवाईतील सर्व गोवंश सुखरूपरित्या जमा करण्यासाठी वाहतुकीसाठी लागलेला निधी सोलापुरातील प्रसिद्ध गोसेवक गोपाल सोमानी यांनी उपलब्ध करून दिला.



## मोबाईलच्या वाढत्या व्यसनामुळे तरुण पिढी अडचणीत

### निवृत्त पोलिस निरीक्षक नागेश गायकवाड यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

मोबाईलच्या वाढत्या व्यसनामुळे तरुण पिढी अडचणीत येत आहे. मोबाईलद्वारे काही विघातक पोस्ट फॉरवर्ड करण्याने सुद्धा आपले करिअर बिघडवू शकते. आपण सर्वजण देशाचे नागरिक आहोत पण जबाबदार नागरिक होण्यासाठी युवक पिढींनी विध्वंसक कार्यापासून दूर राहून त्याचा मुळापासून नायनाट करण्यासाठी सदैव दक्ष राहिले पाहिजे, असे प्रतिपादन निवृत्त पोलिस निरीक्षक नागेश गायकवाड यांनी केले.

संगमेश्वर महाविद्यालय येथे विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या ''मी जबाबदार नागरिक होणार ''या विषयावरील व्याख्यान प्रसंगी श्री.गायकवाड बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत प्रा.भीमाशंकर बिराजदार यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य ऋतुराज बुवा हे होते. सुजाता म्हेत्रे यांनी आभार मानले. यावेळी निळकंठ कोनापुरे, राजेंद्र मायनाळ, गुरुलिंग कन्नुरकर, विजय शाबादी, रविराज भोपळे, अशोक भांजे, बिळेनी बिराजदार, सिद्धराया होर्तीकर, सिद्राय्या माविनमर, गंगाधर पाटील आदी उपस्थित होते.



## राजस्थानी समाजाला मिळावे भाजपाकडून प्रतिनिधित्व

### महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर समाजाची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

गेल्या अनेक वर्षांपासून राजस्थानी समाज भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. मात्र अपवाद वगळता आजवर भाजपाकडून राजस्थानी समाजाला प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. त्यामुळे यंदाच्या महापालिका निवडणुकीत भाजपाने राजस्थानी समाजाला योग्य प्रतिनिधित्व द्यावे, अशी मागणी राजस्थानी समाजाच्या बैठकीत करण्यात आली.

तुळजापूर वेस येथील महेश्वरी सांस्कृतिक भवनमध्ये राजस्थानी समाजाची संयुक्त बैठक झाली. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक रंगनाथजी बंग, महेश तापडिया, पापाशेठ दायमा, सचिन लड्डा, नितीन करवा, कैलाश कोठारी, श्याम खंडेलवाल, श्यामसुंदर खंडेलवाल, बालाप्रसादजी ओझा, श्यामजी भुतडा, प्रवीण भुतडा, भाऊ पारिख, ओमजी दरक, कैलाशजी कोठारी, श्यामजी बिहानी प्रसिद्ध विविध संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते.

राजस्थानी समाजातील अनुभवी व युवा कार्यकर्ते अनेक वर्षांपासून राजकीय पक्षासोबत समाजकार्य करीत आहेत. उद्योग, व्यापार व कारखानदारी क्षेत्रात प्रमुख भूमिका बजावणारा हा राजस्थानी समाजाची सोलापूरच्या अनेक प्रभागांमध्ये निर्णायक मतदारसंख्या आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत राजस्थानी समाजाला महापालिकेत प्रतिनिधित्व मिळालेच पाहिजे, अशी मागणी समाजातील जेष्ठांनी केली.

अनेक वर्षांपासून पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या राजस्थानी समाजाला यंदा न्याय मिळाला पाहिजे अशी आक्रमक भूमिका समाजातील धुरीणांनी प्रसंगी घेतली. राजस्थानी समाजाला उमेदवारी दिल्यास समाज एकजुटीने उमेदवारांच्या पाठीशी उभे राहील असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## सिद्धेश्वर यात्रा आणि निवडणुकीत काही गडबड केल्यास कायदेशीर कारवाई करू

### पोलीस प्रशासनाचा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

सिध्दरामेश्वर यात्रा व महापालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने सोलापुर आयुक्तलयात, फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून त्यांना सिध्दरामेश्वर यात्रा व सोलापूर महानगरपालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने शांतता राखण्याबाबत सुचना देण्यात आल्या, त्यांनी काही गडबड केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असा समज पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्याकामी अवघ्या चार तसातच सर्व डीबी पथकाने मेहनत घेवुन १८ वॉरंट व १३ समन्सची बजावणी केली.

मुख्य न्यायदंडाधिकारी, जिल्हा न्यायालय सोलापूर यांचेकडून प्राप्त वॉरंट व समन्स याची तात्काळ बजावणी होवुन न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्यासाठी फौजदार चावडी पोलीस ठाणे कडुन दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत डी.बी. अंमलदार यांचेमार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये १८ बेलेबल व नॉलवेलेबल वारंट बजावणी करण्यात आले. १३ समन्सची बजावणी अवघ्या चार तासातच करण्यात आले. फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर कडील गुरनं. ११३२/२०१९ भादवि कलम ३७६ (३) अ.ज.अ.ज. अत्याचार ३(२), (), ३(२), (५) बा.लै.अ.४,८,१२,४ मधील आरोपी विकास दिगंबर शिंदे यास या कलमा मध्ये दोषी धरुन आजन्म करावास व २०,०००/- रु दंडाची शिक्षा झाली आहे. या गुन्ह्याच्या तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त सो, विभाग-१ कमलाकर ताकवले, तसेच सरकारी वकिल एस.ए. डोके, कोर्ट पैरवी विक्रांत कोकणे यांनी काम पाहिले आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त विभाग-१, प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राउत, दुय्यम पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोह/प्रविण चुंगे, पोह/बसवेश्वर परीट, पोह/सचिन बाबर, पोना/शिवानंद भिमदे, पोना/सर्जेराव पाटील, पोकों/ज्ञानेश्वर गायकवाड, पोकों/अजय चव्हाण, पोकों/सुरज सोनवलकर, पोकों/महादेव शिंदे, पोकों/अतिश पाटील, पोकों/कृष्णा बडुरे, पोकों/पंकज घाडगे, पोकों/सुधाकर माने, पोकों/विनोद व्हटकर, पोकों/तोसिफ शेख, पोकों/नितीन मोरे, पोकों/शशिकांत दराडे, पोकों/विनोदकुमार पुजारी, पोकों/अमोल खरटमल यांनी केली.

# दागिने चोरी करणाऱ्या आरोपीचा दोन तासात शोध

## महिला प्रवाश्याला अश्रू अनावर; पोलीसांचे मानले आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

एस.टी.स्टँड येथे गर्दीचा फायदा घेवून प्रवासी महिलेचे दागिने चोरी करणाऱ्या आरोपीस दोन तासात फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्यावतीने अटक करण्यात आली. प्रवाशी महिला सिंधु भारत डोईफोडे यांना या बाबत पोलीसांनी तात्काळ माहीती देताच नमुद वयोवृध्द महिला प्रवाशी यांचे अश्रू अनावर झाले व त्यांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.

याबाबतची हकीकत अशी, दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी प्रवाशी महिला सिंधु भारत डोईफोडे वय ६० वर्षे, रा.मु.पो. हिरेमठ हॉस्पीटल जवळ, रिंग रोड, बाशी, जि. सोलापूर या दुपारी मैत्रीणी रत्नमाला हिरे, व शोभा हिरे रा.बाशी जि. सोलापूर असे अक्कलकोट येथून देव दर्शन करुन अक्कलकोट ते सोलापूर गाडीत बसून सोलापूर एस.टी. स्टॅन्ड येथे दुपारी ४.०० वा.चे सुमारास उतरुन तिथे दहा पंधरा मिनीट एस.टी स्टॅन्ड येथे थांबले. वाशीला जाणारी बस फलाटवर बस आल्याने तिघी बसमध्ये चढत असताना गळ्यातील मणी मंगळसुत्र खेचल्यासारखे जाणवले, मागे वळून पाहिले असता ४५ ते ५० वर्षे वयाची महिला जिने अंगात एक करड्या रंगाची साडी घातलेली महिला मणी मंगळसूत्र घेवून जाताना दिसली. तिच्या मागे जात असताना आम्ही गर्दीतून बाहेर येईपर्यंत ती तेथुन निघुन गेली. त्या महिलेचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. याची माहिती पती व मुलगा यांना सांगितली. पोलीसांकडे तक्रार देण्यास त्यांनी सांगीतले. लागलीच फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे पोलीसांना माहीती दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांना



आरोपी महानंदा राठोड

तक्रारदार यांनी माहीती देताच त्यांनी संवेदनशिलता दाखवुन वयोवृध्द महिलेस धीर देवुन त्यांची तक्रार तात्काळ नोंदवून घेवुन, फौजदार चावडी पोलीस ठाणे गु.र.क्र.९३३/२०२५ भा.न्या. संहिता २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला, गुन्हा दाखल होताच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक क्षिरसागर यांना पथकासोबत सदर गुन्हयातील आरोपीत याचा तात्काळ शोध घेण्याबाबत आदेश दिले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत व पोलीस निरक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर व त्यांचे पथकाने तात्काळ या आरोपीत महिलेचा शोध सुरु केला. दरम्यान गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, '' एक अंदाजे ६० वर्ष वयाचो महिला जिने करडया रंगाची साडी घातलेली आहे. ती सोलापूर एस.टी. स्टॅन्ड येथे फिरत आहे.'' अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. याची योग्य ती खात्री व शहानिशा करून या महिला आरोपीला पोलीसांनी तक्रार प्राप्त झाल्यापासुन दोन तासातच ताब्यात घेतले. तिचे नांव आहे महानंदा राम राठोड (वय ५०, रा.मु. कानडे पिपळगांव, पोस्ट, हिरापुर ता. गेवराई जि.बीड). या महिला आरोपीकडे महिला पोलीसांमार्फत कसून चौकशी करताना तीने गुन्हा केल्याची कबुली दिली व तिचेकडून चोरीचे सोन्याचे मणीमंगळसुत्र जप्त करण्यात आले.

### जयसिंह चेळेकर मंगळवेढा न्यायालयात सरकारी वकील

**मंगळवेढा दि. २१ डिसेंबर-**

मंगळवेढ्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालयात सरकारी वकील म्हणून ॲड. जयसिंह विठ्ठल चेळेकर यांची नियुक्ती झाली असून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला आहे. ॲड. क्षीरसागर यांची बदली बार्शी येथे झाल्याने त्यांची जागा अद्यापही रिक्तच आहे. मंगळवेढा दिवाणी व फौजदारी न्यायालयात दोन सरकारी वकील कार्यरत असून या पैकी ॲड.बनसोडे यांची बदली काही महिन्यापुर्वी गारगोटी येथे झाली. ते मुळचे मंगळवेढ्याचे असून त्यांनी सोलापूर येथे न्यायालयात आत्तापर्यंत कामकाज केले आहे. येथे दोन न्यायालयाकडे एकच सरकारी वकिलाला कामकाज बघण्याची वेळ आली आहे.

नवीन अद्यावत सुविधांनी सज्ज वाडिया हॉस्पिटल येथे
४० वर्षावरील नागरिकांसाठी
सवलतीच्या दरात
वैद्यकीय तपासणी मोहीम



यामध्ये समावेश आहे - रक्त तपासण्या - 1) लिपिड प्रोफाईल 2) सीबीसी 3) ब्लड शुगर फास्टिंग व पीपी 4) ईएसआर 5) क्रियाटिनिन
छातीचा एक्स-रे | ईसीजी | तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी
ता. २२.१२.२०२५ ते २४.०१.२०२६ पर्यंत
(बुधवार व सुट्टीच्या दिवसाव्यतिरिक्त)
सवलतीचे शुल्क - रु. 950 फक्त
(वाडिया हॉस्पिटल येथे नोंद असलेल्या रुग्णांसाठी रु.850)
आवश्यक कागदपत्रे - आधारकार्ड
वाडिया मेडिकल स्टोअर येथे विशेष सवलतीच्या दरात औषधे उपलब्ध
WADIA HOSPITAL SOLAPUR
एन. एम. वाडिया चॅरिटेबल हॉस्पिटल
दादासाहेब गायकवाड मार्ग, १४५/६,रेल्वे लाईन्स, सोलापूर. संपर्क : ०२१७-२३११२०१, २३११२०२
Jhaveri

Truhome FINANCE
**ट्रूहोम फायनान्स लिमिटेड**
(पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइट:** http://www.truhomefinance.in

**मागणी सूचना**

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| १. श्री राठोड संजय लोकुसिंग (कर्जदार)<br>२. श्रीमती मिनाक्षी संजय राठोड (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता: ११ २२वसंतराव नाईक नगर ना नेहरू नगर विजापूर रोड सोलापूर इंदिरा नगर जवळ इंदिरानगर उत्तर सोलापूर महाराष्ट्र भारत ४१३००४<br>येथे देखील: मालमत्तेचा पत्ता:प्लॉट क्रमांक ११ उत्तर घर क्रमांक २२ प्लॉट क्रमांक ११ उत्तर घर एसएनओ ६०१ वसंतराव नाईक नगर ना सोलापूर सोलापूर ४१३००४<br>कर्जाची रक्कम – रु.४१,७३,४३७/-<br>कर्ज खाते क्रमांक - SLPHSOLR0000415.<br>एनपीए तारीख – ०४/१२/२०२५ | जुना सर्वेक्षण क्रमांक ६०१, नवीन सर्वेक्षण क्रमांक ४०/ए१बी, त्यापैकी भूखंड क्रमांक ११, त्यापैकी उत्तर बाजूचा भाग, ज्याचा घर क्रमांक २२ आहे, क्षेत्रफळ १५४.९२ चौरस मीटर.<br>नेहरू नगर लमण को-ऑप हाऊसिंग सोसायटी, सोलापूर येथे नेहरू नगर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर<br>ज्याची सीमा खालीलप्रमाणे आहे:-<br>पूर्व - ब्लॉक क्रमांक ८<br>दक्षिण - ब्लॉक क्रमांक ११, त्यापैकी दक्षिणेकडील भाग, ज्याचा घर क्रमांक २१ आहे<br>पश्चिम - रस्ता<br>उत्तर - ब्लॉक क्रमांक १२ | मागणी सूचना तारीख:<br>१२-१२-२०२५<br>दिनांक १०-१२-२०२५ रोजी कर्ज खाते क्र.<br>SLPHSOLR0000415.<br>अंतर्गत रु. ३४,७३,२३४/- (फक्त चौतीस लाख त्र्याहत्तर हजार दोनशे चौतीस रुपये)<br>आतापर्यंत नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, खर्च इ. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २२-१२-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### रिचर्ड नगारवा झिम्बाब्वेचा नवा कसोटी, वन-डे कर्णधार

**हरारे** : झिम्बाब्वे क्रिकेटने रिचर्ड नगारवाला कसोटी आणि एकदिवसीय (वन-डे) या दोन्ही फॉरमॅटसाठी झिम्बाब्वे संघाचा नवीन कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे, तर ब्रायन बेनेट उपकर्णधार म्हणून काम पाहणार आहे. येथे नुकत्याच झालेल्या झिम्बाब्वे क्रिकेट मंडळाच्या चौथ्या तिमाहीच्या बैठकीत या नियुक्त्यांची पुष्टी करण्यात आली. हा डावखुरा वेगवान गोलंदाज अनुभवी फलंदाज क्रेग एर्विनकडून कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारत आहे. एर्विन संघाला एका महत्त्वाच्या पुनर्रचना टप्प्यातून मार्गदर्शन केल्यानंतर पद सोडत आहे.झिम्बाब्वे क्रिकेटचे अध्यक्ष तावेंग्वा मुकुहलानी यांनी नवीन नेतृत्व संघाचे अभिनंदन केले आणि पद सोडणाऱ्या कर्णधाराच्या योगदानालाही दाद दिली. २०१७ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलेला नगारवा हा झिम्बाब्वेच्या गोलंदाजी फळीचा एक महत्त्वाचा भाग आहे. डावखुरा वेगवान-मध्यम गोलंदाज म्हणून त्याने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत आणि १०० टी-२० आंतरराष्ट्रीय बळी घेणारा तो पहिला झिम्बाब्वेचा खेळाडू आहे.

### आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशन एएफसी नेशन्स लीग सुरू करणार

**क्वालालम्पूर** : आशियाई फुटबॉल कॉन्फेडरेशन आपल्या सदस्य देशांमध्ये स्पर्धा वाढवण्यासाठी एएफसी नेशन्स फुटबॉल लीग सुरू करणार आहे. २०१८ मध्ये यूईएफएने नेशन्स लीग सुरू केल्यानंतर हे पाऊल उचलले गेले, ज्यामध्ये युरोपियन राष्ट्रीय संघांना स्तरांमध्ये विभागले जाते. आफ्रिकन फुटबॉल कॉन्फेडरेशनने २०२९ मध्ये अशीच स्पर्धा सुरू करणार असल्याचे सांगितल्यानंतर एका दिवसात ही घोषणा करण्यात आली. प्रतिस्पर्ध्यांची मर्यादित उपलब्धता, वाढत्या ऑपरेशनल खर्च आणि लॉजिस्टिकल गुंतागुंतीमुळे फिफा आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या विंडोचा प्रभावी वापर वाढत्या आव्हानात्मक बनला आहे, ज्यामुळे अनेकदा आंतरराष्ट्रीय सामन्यांचे क्रीडा मूल्य कमी होत आहे, असे एएफसीने एका निवेदनात म्हटले आहे. सर्वसमावेशक अंतर्गत पुनरावलोकन आणि सल्लामसलत प्रक्रियेनंतर, कॉन्फेडरेशनने तत्वतः एएफसी नेशन्स लीग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

### कर्णधारपद हे नेतृत्वगुण सुधारण्याची संधी : जरमनप्रीत

**नवी दिल्ली** : आगामी हॉकी इंडिया लीग हंगामात कर्णधारपद हे नेतृत्वगुण सुधारण्याची संधी आहे, पण लक्ष चांगल्या खेळावरच राहील, असे दिल्ली एसजी पायपर्स संघाचा कर्णधार जरमनप्रीत सिंग म्हणाला. अनुभवी बचावपटू जरमनप्रीत सिंगची कर्णधारपदी निवड केल्यानंतर तो माध्यमांशी बोलत होता. गत वर्षी केवळ एकच विजय मिळवून तळाशी राहिलेल्या दिल्ली एसजी पायपर्स संघाने प्रशिक्षक आणि खेळाडूंच्या संघात मोठे बदल केले आहेत.किमान लक्ष्य अव्वल चारमध्ये स्थान मिळवण्याचे आमचे लक्ष्य आहे. आम्हाला विजयाने सुरुवात करून ती गती कायम ठेवावी लागेल. जेव्हा तुम्हाला नेतृत्वाची भूमिका मिळते, तेव्हा तुम्हाला संघाला एकत्र ठेवावे लागते. माझ्या नेतृत्वगुणांमध्ये सुधारणा करण्यासाठी ही एक चांगली संधी आहे. मला विश्वास आहे की कर्णधार म्हणून जबाबदाऱ्या वाढतात, पण माझे मुख्य लक्ष खेळताना असते तसेच राहील, असे २८ वर्षीय जरमनप्रीत सिंग म्हणाला.संघात काही मोठी परदेशी नावे असली तरी, लिलावादरम्यान निवडलेल्या रुपिंदरपाल सिंगचा अपवाद वगळता, जरमनप्रीत हा सर्वात वरिष्ठ भारतीय खेळाडू आहे, अशा संघात ज्याने कनिष्ठ खेळाडूंच्या मूळ गटावर विश्वास कायम ठेवला आहे.



### 'ठोकळ'च्या प्रगती शिंदेची राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

अमरावती येथे झालेल्या राज्य आर्चरी (धनुर्विद्या) स्पर्धेतून १७ वर्षांखालील गटात येथील निर्मलताई ठोकळ ज्युनिअर कॉलेजच्या प्रगती भागवत शिंदे हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. पुणे विभागातून राज्य स्पर्धेसाठी खेळत असताना तिने १ सुवर्ण, १ रौप्य व २ कांस्य अशी ४ पदके पटकाविली. या कामगिरीवर तिची रांची (झारखंड) येथे ६ जानेवारी ते १० जानेवारी २६संपन्न होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघातून रिकव्हर प्रकारात निवड झाली. तिला पुण्याचे रंजीत चामले व क्रीडा शिक्षक अर्जुन सुरवसे यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ सचिव भिकाजी गाजरे, प्राचार्य दत्तात्रय गाजरे यांनी अभिनंदन केले.

# भारतीय युवा संघाला उपविजेतेपद

**आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट** | **पाकिस्तानकडून १९१ धावांनी पराभव** | **समीर मिन्हास सामनावीर व मालिकावीर**

♦ **दुबई, २१ डिसेंबर**

आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत अपराजित राहिलेल्या भारतीय संघासाठी आजचा रविवारचा दिवस चांगला नव्हता. अंतिम सामन्यात भारताला पाकिस्तानकडून १९१ धावांनी पराभव पत्करावा लागला, परिणामी भारातला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

भारतीय संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेने नाणेफेक जिंकून पाकिस्तानला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. पाकिस्तानने ८ बाद ३४७ धाव उभारल्या. मात्र प्रत्युत्तर देताना भारताचा संपूर्ण डाव २६.२ षटकांत १५६ धावांतच आटोपला.



सामनावीर व मालिकावीर समीर मिन्हास

भारत केवळ पहिल्या काही षटकांपर्यंतच सामन्यात होता, पण त्यानंतर सर्वत्र पाकिस्तानने वर्चस्व गाजविले. त्यांच्या गोलंदाजांनी नियमित अंतराने फलंदाज बाद केले. अली रझाने ४ बळी घेतले. समीर मिन्हास सामनावीर व मालिकावीर ठरला. समीरने ११३ चेंडूंत १७२ धावंची खेळी केली, त्याने स्पर्धेत एकूण ४७१ धावा काढल्या.

ही एक चांगली खेळी होती, मोठी धावसंख्या करण्याचा माझ्या मनात विचार होता, मला माझा नैसर्गिक खेळ खेळायचा होता, खेळपट्टी पाहून आम्हाला प्रथम फलंदाजी करायची होती. हा क्षण माझ्यासाठी खूप अविस्मरणीय आहे, असे समीर मिन्हास म्हणाला. विजय नोंदविताच पाकिस्तान संघाने जल्लोष सुरू केला व खेळाडूंनी समीर मिन्हासला खांद्यावर उचलून फिरवले.सलामीवीर समीर मिन्हासने ११३ चेंडूंमध्ये १७२ धावांची धडाकेबाज खेळी करत पाकिस्तानच्या विजयाचा पाया रचला. मिन्हासची ही खेळी पाकिस्तानसाठी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली, तसेच युवा एकदिवसीय सामन्यांच्या अंतिम फेरीत कोणत्याही फलंदाजाने केलेली ही सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे. त्याने आपल्या खेळीदरम्यान १७ चौकार आणि नऊ षट्कार मारले आणि ४३ व्या षटकात तो बाद झाला. त्याने १५२.२१ च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या.

प्रत्युत्तरात, यूएईविरुद्धच्या १७१ धावांच्या खेळीनंतर या स्पर्धेत ५, ५०, ९ आणि २६ धावा करणाऱ्या वैभव सूर्यवंशीने भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना स्फोटक सुरुवात केली. त्याने तीन षट्कार आणि एक चौकार मारला, पण अली रझाने त्याला १० चेंडूंमध्ये २६ धावांवर झेलबाद केले. आयुष म्हात्रेही दोन धावा काढून बाद झाला. भारताने पाचव्या षटकात आपले अर्धशतक पूर्ण केले होते आणि पॉवरप्लेच्या अखेरीस त्यांची धावसंख्या ५ बाद ६८ अशी होती. भारताकडून दीपेश देवेंद्रनने तेवढी सर्वाधिक ३६ धावांची खेळी केली. भारताचे उर्वरित खेळाडू नियमित अंतराने नियमिकत अंतराने तंबूत परतले. अली रेझाने ४ बळी, मोहम्मद सय्याम, अब्दुल सुभम व हुझैफा अहसानने प्रत्येकी २ बळी टिपले. *(वृत्तसंस्था)*

# ऑस्ट्रेलियाने ॲशेस मालिका कायम राखली

### इंग्लंडवर ८२ धावांनी रोमांचक विजय

♦ **ॲडलेड, २१ डिसेंबर**

वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने शेवटचे चारपैकी तीन बळी घेऊन इंग्लंडचा कडवा प्रतिकार मोडून काढल्यामुळे, तिसऱ्या क्रिकेट कसोटीच्या पाचव्या दिवशीच्या ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर ८२ धावांनी विजय नोंदविला. ऑस्ट्रेलियाने दोन सामने शिल्लक असतानाच ॲशेस मालिका कायम राखली.

पहिल्या डावांत १०२ धावांची, तर दुसऱ्या डावांत ७२ धावांची खेळी व ६ झेल पकडणाऱ्या ॲलेक्स कॅरीला सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ऑस्ट्रेलियाने पाचव्या दिवसाची सुरुवात ॲशेस मालिका कायम राखण्यासाठी चार बळींच्या गरजेने केली होती. इंग्लंडने ६ बाद २०७ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली आणि विजयासाठी आवश्यक असलेल्या ४३५ धावांच्या लक्ष्यापासून ते अजून २२८ धावा दूर होते, जे साध्य करण्यासाठी जागतिक विक्रमाची आवश्यकता होती. जेमी ॲण्डरसन (६०), विल जॅक्स (४७) व ब्रायडन कार्सेने (३९) शर्थीचे प्रयत्न केले, परंतु इंग्लंडला दुसऱ्या डावांत ३५२ धावांपर्यंतच मजल मारता आली. परिणामी ऑस्ट्रेलियाने ८२ धावांनी विजय मिळविला.

ॲडलेड ओव्हलवर आम्ही हे करून दाखवले, खूप छान वाटते आहे, असे ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स ८२ धावांच्या विजयाबद्दल म्हणाला

सकाळच्या सत्रात स्टार्कने एकमेव विकेट घेतली जेमी स्मिथचा संयम सुटला व तो ६० धावांवर कमिन्सकरवी झेलबाद झाला.



विजयाचा आनंद साजरा करताना सामनावीर ॲलेक्स कॅरी व ट्रॅव्हिस हेड

इंग्लंडच्या या झुंजार खेळीमुळे शेवटच्या दिवशी उपहाराच्यावेळी ॲशेसचे समीकरण अधिक रोमांचक झाले होते. ॲडलेडमध्ये ॲशेस चषक जिंकण्यासाठी ऑस्ट्रेलियाला तीन बळींची गरज होती व पाच सामन्यांची मालिका जिवंत ठेवण्यासाठी इंग्लंडला १२६ धावांची गरज होती.

कसोटी जिंकण्यासाठी चौथ्या डावात वेस्ट इंडिजच्या ४१८ धावांपेक्षा (२००३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन विकेट्सने मिळवलेला विजय) अधिक धावा कोणत्याही संघाने केल्या नव्हत्या.

इंग्लंडच्या तळाच्या फळीतील फलंदाज चिकाटीने दबाव टाकत असताना व ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजी आक्रमणात अनुभवी फिरकी गोलंदाज नॅथन लियोनची उणीव भासत असताना, मालिकेतील आघाडीच्या गोलंदाजाने यजमान संघासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली. नॅथन पायाच्या दुखापतीमुळे लंगडत मैदानाबाहेर गेला होता.

पर्थ आणि ब्रिस्बेनमध्ये विजय नोंदविल्यानंतर ऑस्ट्रेलियाने ॲडलेड येथील कसोटी जिंकून ॲशेस मालिकेत ३-० अशी विजयी आघाडी घेतली.

ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक ॲलेक्स कॅरीला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. त्याने पहिल्या डावात घरच्या मैदानावर शतक, दुसऱ्या डावात ट्रॅव्हिस हेडसोबत १६२ धावांच्या भागीदारीत अर्धशतक (हेडने १७० धावांची सर्वोच्च खेळी केली) आणि कसोटीत सात बळी टिपण्याची कामगिरी केली.

**मालिका गमावली, तरीही आनंदी : बेन स्टोक्स**

अवघ्या ११ दिवसांत मालिका गमावली असली तरी, या आठवड्यात आपल्या संघाने दाखवलेल्या चिकाटीमुळे तो अधिक आनंदी आहे, इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स म्हणाला. आम्ही येथे घेऊन आलेले स्वप्न आता संपले आहे, जे निश्चितपणे अत्यंत निराशाजनक आहे.पण, अजून दोन कसोटी सामने शिल्लक आहेत व आता लक्ष तिकडेच केंद्रित करण्याची गरज आहे, असे तो म्हणाला. *(वृत्तसंस्था)*

# आंतरराष्ट्रीय गुणांकन जलद बुद्धिबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

### जीएच रायसोनी मेमोरियल चषक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

जीएच रायसोनी यांच्या स्मरणार्थ जागतिक बुद्धिबळ संघटना, अखिल भारतीय बुद्धिबळ संघटना, महाराष्ट्र चेस असोसिएशन व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने जी एच रायसोनी स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशन अँड कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशन यांनी चॅम्प चेस स्कूलच्या सहकार्याने पहिल्या जीएच रायसोनी जलद आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत महाराष्ट्रासह गोवा, कर्नाटक, पोंडिचेरी, तेलंगणा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, बिहार आदी राज्यातील ९६ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह एकूण २९२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

सोलापुर येथील राजस्व मधील चैत्राली लॉन्स अँड बँक्वेट हॉल मध्ये भारतातील नामवंत व मातब्बर खेळाडूंच्या सहभागामुळे स्पर्धेत आकर्षक लढती सोलापूरकरांना पहावयास मिळत आहे. आंतरराष्ट्रीय मास्टर श्रीजित पॉल, कँडिडेट मास्टर अनिश गांधी, जर्मनीचा विजय विश्रुत, श्रीराज भोसले, ऋषिकेश कबनुरकर, इंद्रजीत महिंद्रकर, मानस गायकवाड यांनी उत्कृष्ट खेळ करत विजयी सलामी दिली. तसेच पाच वर्षीय पुण्याचा अनिरुद्ध नगरकर, सांगलीचे ६८ वर्षीय जेष्ठ खेळाडू दिलीप कुलकर्णी व सोलापूरचा बिगरमानांकित खेळाडू प्रथमेश रेवतगाव, नांदेडचा नऊ वर्षीय शौर्य मुप्पणी यांनी आकर्षक खेळ करत लक्ष वेधून घेतले.




स्पर्धेचे उद्घाटन चैत्राली लॉन्स अँड बँक्वेट उद्योग समूहाचे मालक सतीश मुरुडकर व इंडियन मॉडेल स्कूलचे संस्थापक सचिव अमोल जोशी यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. यावेळी कल्पना प्रकाश वेल्फेअर फाउंडेशनचे सचिव भूषण श्रीवास, सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशनचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सहसचिव सतीश ठाकुर, व्यवस्थापकीय समिती समितीचे अतुल कुलकर्णी, आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी, फिडे मार्गदर्शक शशिकांत मक्तेदार, राष्ट्रीय पंच संतोष पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी तर प्रास्ताविक संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड यांनी केले. या स्पर्धेत प्रमुख पंच पवन राठी यांच्यासह वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, फिडे पंच अमितकुमार टेंभुर्ने, वरिष्ठ राष्ट्रीय पंच, रोहिणी तुम्मा, सहायक पंच गणेश मस्कले, विजय पंगुडवाले. भरत वडीशेरला, यश इंगळे, सुधीर वाघमारे हे काम पाहत आहेत.

**सोलापूरचे खेळाडू उल्लेखनीय कामगीरी करत आहेत**

आपल्या मनोगतात अमोल जोशी यांनी बुद्धिबळाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरुष व म हिला गटात भारताचे वर्चस्व असल्याचे सांगून सोलापूरचे खेळाडू देखील राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगीरी करत असल्याचे नमूद केले. तसेच सतीश बुरुडकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीयस्तरावरच्या स्पर्धा सोलापुरात होत असल्याचे पाहून संघटनेचे कौतुक करत समाधान व्यक्त केले व बुद्धिबळ खेळाच्या प्रसार व प्रचार याकरिता सर्वतोपरी मदत करणार असल्याचे सांगून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# लक्ष्मीश्री दांडू, जेनिफर लुइखेम यांची विजयी सलामी

### जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन टेनिस

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या जामश्री-इलिझियम सोलापूर ओपन २०२५ महिलांच्या ३० हजार रकमेच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत लक्ष्मीश्री दांडू, जेनिफर लुइखेम यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत आगेकूच केली.

कुमठा नाका जिल्हा क्रीडा संकुलातील एमएसएलटीए टेनिस सेंटरवर सुरू झालेल्या या स्पर्धेत पात्रता फेरीत भारतच्या लक्ष्मीश्री दांडू हिने तेराव्या मानांकित थायलंडच्या तनुचापोर्न योंगमोडचा ६-३, ६-२ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. भारताच्या जेनिफर लुइखेम हिने चौदाव्या मानांकित जननी रमेशचा ५-७, ७-५, १०-७ असा पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. बाराव्या मानांकित बेला ताम्हणकरने ऐश्वर्या जाधवचा ७-६(५), ६-३ असा तर,नवव्या मानांकित सोनल पाटीलने अमोदिनी नाईकचा ६-०, ६-३ असा पराभव करून अंतिम पात्रता फेरी गाठली.

**पहिली पात्रता फेरीचे अन्य निकाल :**

जिझेल माटोस सिक्रेरा फर्नांडिस ॲटोस (ग्रेट ब्रिटन)४ वि.वि.दिशा बेहरा(भारत)६-३, ६-१;
मारिया मिखाइलोवा(रशिया)५ वि.वि.वंशिता पठानिया(भारत)७-५, ६-३;
एना सेडीशेवा (रशिया) १६ वि.वि.डॅनिका फर्नांडो(भारत)६-०, ६-२;
एम्मा व्हॅन पॉपेल(नेदरलँड) ७ वि.वि.लुंडा कुम्होम(थायलंड)६-४, ६-४;
होनोरी कोयामा(जपान) ८ वि.वि.सौम्या रोंडे(भारत)६-४, ६-३;
सोहा सादिक(भारत)६ वि.वि.चंदना पोतुगरी(भारत)६-२, ७-५;
यशस्विनी पनवार(भारत) १५ वि.वि. गरिमा कलुगडे(भारत) ४-६, ६-४, १०-८;
अंजली राठी (भारत)२ वि.वि.श्रीमन्या रेड्डी अनुगोंडा(भारत) ६-२, ६-२;
प्रत्युशा रचापुडी(भारत) १० वि.वि.जीतेश कुमारी(भारत) ६-२, ६-१;
मधुरिमा सावंत(भारत) ११ वि.वि.आकृती सोनकुसरे(भारत) ६-४, ६-३;
पोलिना बख्मुटकिना(बेलारूस)३ वि.वि.चेविका रेड्डी समा (भारत)६-४, ६-१.


# महिलांमध्ये धाराशिव विरुद्ध पुणे अंतिम फेरीत भिडणार

### ६१वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

### पुरुषांत पुणे विरुद्ध मुंबई उपनगर अंतिम लढत

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. २१ डिसेंबर-**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून महिला गटात धाराशिव विरुद्ध पुणे तर पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर यांच्यात विजेतेपदासाठी लढत रंगणार आहे. चारही संघांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा भरणा असल्याने हे अंतिम सामने कमालीचे चुरशीचे होण्याची अपेक्षा आहे.



महिला गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३ गुण व ५० सेकंद राखून (३२२९) निसटता पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन्ही डावांत ड्रीम रनच्या जोरावर पुण्याने ४ गुण मिळवत आघाडी घेतली, तर ठाण्याला केवळ १ ड्रीम रन गुणावर समाधान मानावे लागले. पुण्याकडून श्वेता नवले (२.२४ मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (१.३० व २.०४ मि. संरक्षण व १० गुण), श्वेता वाघ (१.१४ मि. संरक्षण व ४ गुण), अपर्णा वर्धे (नाबाद १.३० व १.१६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी निर्णायक खेळी करताना अंतिम फेरीची दारे उघडली तर पराभूत ठाण्याकडून रेश्मा राठोड (२.२० व १.३२ मि. संरक्षण व ४ गुण), प्रियांका भोपी (१.२० व १.०३ मि. संरक्षण) यांनी झुंजार खेळ करताना विजयाची पराकाष्टा केली, मात्र त्या अपयशी ठरल्या.



पुरुष गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीचा ३ मिनिटे ३७ सेकंद राखून २ गुणांनी (३६३४) पराभव केला. उपनगरकडून अक्षय भांगरे (२.१० व १.१० मि. संरक्षण), अनिकेत चेंदवणेकर (१.३०, १.१० मि. संरक्षण व ८ गुण), प्रतीक देवरे (१० गुण), निहार दुबळे (१, १.०६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत अंतिम फेरीचे दार ठोठावले तर पराभूत सांगलीकडून अक्षय मासाळ (१.०८ व १.३४ मि. संरक्षण व ४ गुण), अभिषेक केरीपाळे (१.१० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी चमकदार कामगिरी नोंदवली.

पुरुष गटातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुण्याने धाराशिववर १.१० मिनिटे राखून ४ गुणांनी (३७३३) मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. चुरशीचा ठरलेला हा सामना प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके क्षणाक्षणाला वाढवत होते. पुण्याकडून शुभम थोरात (१.४५, २.३० मि. संरक्षण व ४ गुण), प्रतीक वाईकर (१.३०, १.३० व १.४० मि. संरक्षण व ८ गुण), सुयश गरगटे (१.००, १.३० मि. संरक्षण व २ गुण), रुद्र थोपटे (८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ करताना अंतिम फेरीत पोहचले तर पराभूत धाराशिवकडून विजय शिंदे (१.३०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण), श्री पेठे (१.२०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी झुंजार लढत दिली.

**महिला गटात धाराशिवने उडवला नाशिकचा धुव्वा**

महिला गटातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात धाराशिवने नाशिकचा एक डाव व १० गुणांनी (२६१६) धुव्वा उडवत रुबाबात अंतिम फेरी गाठली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (३.१० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.३० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात धमाकेदार खेळी करत उल्लेखनीय मोठा विजय साजरा करत प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले. तर पराभूत नाशिककडून ज्योती मेढेने चांगली कामगिरी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## चित्रपट वार्ता

### ‘टॉक्सिक’मध्ये एक-दोन नव्हे तर चार अभिनेत्री



**मुंबई :** ‘केजीएफ’चा स्टार यश याच्या ‘टॉक्सिक : अ फेअरी टेल फॉर ग्रोन अप्स’ या चित्रपटाची बऱ्याच दिवसांपासून चर्चा सुरू आहे. कारण याची व्याप्ती जागितक स्तरावरील असल्याचे म्हटले जात आहे. एखाद्या चित्रपटात एक किंवा दोन अभिनेत्री असतात पण, ‘टॉक्सिक’मध्ये चार अभिनेत्री झळकणार आहेत. त्यात कियारा अडवाणी, नयनतारा, हुमा कुरेशी आणि तारा सुतारिया यांचा समावेश आहे. रविवारी ‘टॉक्सिक’मधील कियाराच्या भूमिकेची झलक प्रेक्षकांसमोर आली आहे. ही झलक समोर येताच समाज माध्यमांवर खळबळ माजली. स्वत: अभिनेता यशने कियाराचा लूक शेअर केला आहे. या पोस्टरमध्ये कियारा ‘नादिया’ नावाच्या पात्रात दिसत आहे. रॅम्पवर चालताना कियारा रडताना दिसतोय. हा चित्रपट १९ मार्चला जगभरात प्रदर्शित होणार आहे.

# खुल्या गटात मंगळवेढ्याचा सचिन खांडेकर अव्वल

### जिल्हा क्रॉसकंट्री अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा

### अन्य गटात नरळे, पवार, वाघमोडे, बन्ने, लोंढे व कटके प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

जिल्हा क्रॉसकंट्री स्पर्धेत खुल्या गटात मंगळवेढ्याचा सचिन खांडेकर याने प्रथम क्रमांक पटकाविला. अन्य गटात रविराज नरळे, अक्षरा पवार, विशाल वाघमोडे, ज्योती बन्ने, कृष्णा लोंढे, स्वानंदी कटके यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

समृद्धी स्पोर्टस क्लब व ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या या अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे उद्घाटन सेपक टकरा असोसिएशनचे सचिव रामचंद्र दत्तू व आदर्श शिक्षक समितीचे कार्यकारी अध्यक्ष दीपक काळे यांच्या हस्ते झाले. यावेळी ॲथलेटिक्स असोसिएशनचे



अध्यक्ष सुरेश पवार, समृद्धी स्पोर्ट क्लबचे अध्यक्ष राजू प्याटी, फाऊंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत, नाटय परिषद उपाध्यक्ष गोवर्धन कमटम, समृद्धी स्पोर्ट क्लबचे पदाधिकारी मल्हारी बनसोडे, गणेश पवार, सत्येन जाधव, अविनाश गोडसे, संजय अंबोले,. तुकाराम शेंडगे, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समृद्धी स्पोर्ट्स क्लबचे सचिव संजय सावंत यांनी केले. यावेळी राष्ट्रीय खेळाडू पूजा राठोड व ज्योती बन्ने यांचा मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंना प्रमाणपत्र व मेडल प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी राजू प्याटी, गणेश पवार, पुंडलिक कलखांबकर, रविद्र चव्हाण, व्यंकप्पा शेंडगे, श्रीमंत कोळी, महेश चव्हाण विशेष प्रयत्न केले.

**अंतिम निकाल (प्रथम तीन )**

**सोळा वर्षे मुले :** रविराज दत्तात्रय नरळे, बालाजी नगर (मंगळवेढा), प्रेम दशरथ डांगे (हिप्परगा), साईश्वर केशव गुंटूर (सोलापूर). **मुली :** अक्षरा शिवाजी पवार (मंगळवेढा), आरोही प्रदीप पाटमास पंढरपूर, नेहा परशुराम जाधव सोलापूर.

**अठरा वर्षे मुले :** विशाल सोन्या बापू वाघमोडे (सांगोला), राहुल गिरिप्पा अस्वले (अक्कलकोट), सिद्धाराम सोमनाथ (मैंदर्गी). मुली : ज्योती मल्लप्पा बन्ने (अक्कलकोट), अर्पिता तुळशीराम पवार कुमठे (सोलापूर), श्रावणी दशरथ लोंढे (अक्कलकोट).

**वीस वर्षे मुले :** कृष्णा अंबादास लोंढे (अक्कलकोट), शशिकांत जगन्नाथ चव्हाण (सांगोला), अनिल बधू चव्हाण (सोलापूर). मुली : स्वानंदी संतोष कटके (ए.जी.पाटील, सोलापूर)

**खुला गट :** सचिन उत्तम खांडेकर (मंगळवेढा), धनराज मल्लिकार्जुन हुल्ले (वळसंग) बसवराज मलकणा फुलारी (जेऊर).



**सोलापूर : सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीची रणनीती ठरविण्यासाठी महाविकास आघाडीची बैठक रविवारी सायंकाळी हॉटल सिटी पार्क येथे झाली.**

# वाळूज-मोहोळ भागात कडाक्याची थंडी, शेकोट्यांचा आधार

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. २१ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील वाळूज परिसरात सध्या थंडीची लाट पसरली आहे सलग तीन दिवस किमान तापमानाचा पारा घटल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. या तीन दिवसांमध्ये किमान तापमानासोबत कमाल तापमानातही घट झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रचंड गारठा निर्माण झाला आहे .जिल्ह्यासह मोहोळ तालुक्यातील तापमानाचा पारा १२ अंशाच्या खाली घसरला असून ग्रामीण परिसरात कडाक्याची थंडी वाढत चालल्याने जनजीवन विस्कळीत होत आहे. हवेत गारवा असल्याने दिवसभर थंडी टिकून असल्याने दुपारच्या सुमारासही वातावरणात गारवा जाणवत आहे. थंडीचा कडाका वाढला आहे. झटपट शेकोटी पेटवा लागलाय खोकला अशी अवस्था झाली आहे. थंडीचा कडाका वाढल्याने थंडीपासून संरक्षण करण्यासाठी नागरिक स्वेटर, कानटोपी, जॅकेट्सचा. उबदार कपड्यांचा वापर करत. नागरिक रस्त्यावर शेकाटीची ऊब घेत आहेत. सायंकाळपासूनच ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसत आहेत. पहाटे किमान तापमानात घट होत दाट धुक्याची चादर पसरली आहे.सकाळी शेतकरी, दूध विक्रेते, भाजी विक्रेते,विद्यार्थी यांना या थंडीचा मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. दुसरीकडे गहू, हरभरा यांसारख्या रब्बी पिकांसाठी ही थंडी पोषक आहे.



थंडीचा जोर वाढल्याने अनेकांना सर्दी, खोकला, अंगदुखी, कफ यासारखे त्रास होऊ लागले आहेत. थंडी वाढल्यानंतर मानवी आरोग्यासाठी घ्यायची काळजी याबाबत जिल्हा प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. या शिवाय थंडीमध्ये शेती पिकांची काळजी, पशुधनाची काळजी या बाबतही मार्गदर्शक सूचना आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून दिल्या जात आहेत. डिसेंबरच्या शेवटच्या टप्प्यात थंडी कमी होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यासाठी नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

**थंडीमध्ये आरोग्याची काळजी घ्या**

✻ सकाळी व रात्री उबदार कपडे घाला, कान व नाक झाका. ✻ थंड पाणी टाळा, कोमट पाणी प्या. ✻ खोकला, सर्दी, ताप, अंगदुखी वाढल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. ✻ लहान मुले व ज्येष्ठांनी पहाटे बाहेर जाणे टाळावे. ✻ धुक्यात व थंडीत अचानक तापमान बदल टाळा. ✻ अंगात थंडी शिरल्यास विश्रांती घ्या. ✻ आजार अंगावर काढू नका; वेळीच उपचार घ्या.

# इंग्लिश स्कूलमध्ये स्नेहसंमेलनासह आनंदी बाजार; बालचमुचा उत्साही सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २१ डिसेंबर -**

इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त दिनांक २०/१२/२०२५ रोजी आनंदी बाजार आयोजित करण्यात आला या आनंदी बाजाराचे उद्घाटन वेळापूर ग्रामपंचायत च्या माजी सरपंच सौ विमलताई जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास व्यासपीठावरती उपस्थित वेळापूर ग्रामपंचायत च्या माजी सरपंच सौ विमलताई जानकर प्रशालेचे मुख्याध्यापक पवार आर बी प्रशालेचे उप मुख्याध्यापक पठाण शिवशरण पर्यवेक्षक सावळे बी एस वार्षिक स्नेहसंमेलनाचे माध्यमिक चे कार्याध्यक्ष पालवे सर, उच्च माध्यमिक च्या कार्याध्यक्षा कुमारी केसकर मॅडम, शिक्षकेतर कार्याध्यक्ष टाकणे, शिवतेज प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कुमारी गायकवाड मॅडम व शिवतेजच्या कार्याध्यक्षा कु अजेटराव मॅडम शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप जगदाळे उपाध्यक्षा सौ पोरे मॅडम सर्व मान्यवर उपस्थित होते.

त्याचबरोबर माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर यांनीही सदिच्छा भेट दिली. त्यांनी आनंदी बाजाराचा मनसोक्त आनंद घेतला. आनंदी बाजार कार्यक्रमाचे सर्व नियोजन बारंगुळे यांनी केले होते. त्याचबरोबर सोमवार दिनांक २२/१२/२०२५ रोजी व इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज वेळापूर माध्यमिक विभाग व शिवतेज प्राथमिक विभाग या विभागातील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींचा सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे. तसेच २३/१२/२०२५ रोजी सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. यशवंत पाटणे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम संस्थेच्या मार्गदर्शिका मीनाताई कदम यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती माळशिरस तालुक्याचे विद्यमान आमदार उत्तमराव जानकर यांची आहे.



**सोलापूर : जागतिक ध्यान दिनानिमित्त सोलापूर पिरामिड स्पिरिच्युअल ट्रस्टतर्फे व्ही. एम. मेहता स्कूलच्या प्रांगणात सामूहिक ध्यानाचे आयोजन केले होते.**

## निधन वृत्त...


### वल्लभदास गोयदानी



**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

आयुष्यभर सामाजिक कार्यात सक्रिय व विवेकानंद केंद्र, सोलापूर यांच्या माध्यमातून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रसार व जनजागृती करणारे वल्लभदास गोयदानी (वय ८४) यांचे रविवार सकाळी ८ वा. वृद्धापकाळाने निधन झाले. ते सोलापूर जनता बँक लि.चे माजी संचालक म्हणूनही कार्यरत होते. त्यांनी मरणोत्तर नेत्रदान केले आहे. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

### महमद हुसेन खतीब



**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

दक्षिण कसबा येथील व सोलापूर महापालिका परिवहन विभागातील निवृत्त वाहक महमद हुसेन (खालीद) अ.हमीद खतीब (वय ६५) यांचे १९ डिसेंबर रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण, मुले व मुली व नातवंडे असा परिवार आहे.जिल्हा परिषद उर्दू शाळा परांडाचे मुख्याध्यापक ए.ए. खतीब यांचे ते मोठे बंधू होत.

### राजाराम धडके



**सोलापूर,दि.२१ डिसेंबर-**

येथील कुमठा नाका परिसरातील रहिवाशी राजाराम सदाशिव धडके (वय ८५) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार होत. दै.सोलापूर तरूण भारतचे कर्मचारी शशिकांत शिंदे यांचे ते सासरे होत.

### कमल तारापुरे



**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

मजरेवाडी भारतमाता नगर येथील कमल मनोहर तारापुरे (वय ८५) यांचे रविवारी (दि.२१) निधन झाले. त्यांच्यामागे २ मुले, २ सुना व नातवंडे असा परिवार आहे.



# डब्ल्यूआयटी, ‘हिराचंद नेमचंद’ संघाचे विजय

### श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मृती चषक क्रिकेट स्पर्धेत डब्ल्यू.आय.टी. शिक्षकेतर व हिराचंद नेमचंद वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने दणदणीत विजय मिळविले.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या क्रीडांगणावर तिसऱ्या रविवारी पार पडलेल्या सामन्यात पहिल्या सामन्यात डब्ल्यू.आय.टी. शिक्षकेतर संघाने वालचंद शिक्षक संघास ८ गडी राखून हरविले. वालचंद टीचिंग संघाने आठ षटकांत सात गडी गमावून केवळ ६७ धावा केल्या. यात प्रसन्नकुमार पल्लीने २६ धावा केल्या. विजयी ६८ धावांचे लक्ष्य डब्ल्यू.आय.टी. शिक्षकेतर संघाने अवघ्या पाच षटकांत दोन गडी गमावून पूर्ण केले. नरेश रेस याने नाबाद २४ तर महेश मिटकरीने नाबाद २६ धावांची धडाकेबाज खेळी केली. वालचंद टीचिंग संघाकडून नितीन पाटीलने ११ धावांत चार बळी मिळवले. या सामन्याची नाणेफेक डब्ल्यू. आय. टी. कॉलेजचे प्राध्यापक प्रा. एम. पी. राय यांनी केली.

दुसऱ्या सामन्यात हिराचंद नेमचंदने जैन गुरूकूल संघावर १० गडी राखून दणदणीत विजय मिळविला. जैन गुरुकुलने निर्धारित ८ षटकांत ४ बाद ५८ धावा केल्या. प्रत्युत्तरात एच. एन. सी. सी. संघाने अवघ्या सात षटकांत एकही गडी न गमावत ६२ धावा केल्या. यात निखिल अंबुरेने नाबाद ४९ धावांची खेळी केली. या सामन्याची नाणेफेक डब्ल्यू.आय.टी. कॉलेजच्या संशोधन व विकास (आर अँड डी) विभागाचे अधिष्ठाता डॉ. एस. टी. पाटील यांनी केली.

# सोलापूरच्या सेंट थॉमस स्कूलच्या पूर्वी सावंतची ‘मिशन महादेव’साठी निवड

### सोलापूर जिल्ह्यातील एकमेव विद्यार्थिनी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ डिसेंबर-**

राज्य शासनाच्या महत्त्वकांक्षी फुटबॉल प्रोजेक्ट महादेव अंतर्गत येथील सेंट थॉमस स्कूलची उत्कृष्ट मिडफिल्डर पूर्वी महेश सावंत हिची ५ वर्षासाठी निवड झाली आहे. निवड झालेली जिल्ह्यातील ती एकमेव खेळाडू असल्यामुळे सोलापूर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. मुंबई येथे आयोजित विशेष कार्यक्रमात तिने जागतिक दर्जाच्या फुटबॉल आयकॉन लीओनेल मेस्सी सोबत फुटबॉल खेळण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले आहे.

भारतीय संघात अधिकाधिक महाराष्ट्राचे खेळाडू रहावे या उद्देशाने राज्य शासनामार्फत ‘मिशन महादेवा’ ही योजना चालवण्यात येत आहे. या अंतर्गत राज्यातून



३० मुले व ३० मुले पाच वर्षाच्या दीर्घ फुटबॉल प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. मुंबई येथे आयोजित विशेष कार्यक्रमात जागतिक दर्जाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी, तसेच क्रिकेटचा देवता सचिन तेंडुलकर व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पूर्वीचा सत्कार व स्कॉलरशिप प्रदान करण्यात आली.

भारताला जागतिक स्तरावर चांगली कामगिरी करण्यासाठी २०३६ पर्यंत सक्षम महिला संघ उभारण्याच्या उद्देशाने शासनाने प्रोजेक्ट महादेवाची निर्मिती केली आहे. राज्य शासनाच्या या प्रोजेक्ट महादेवासाठी २५ हजार मुलींनी चाचण्या दिल्या.त्यातून ३० मुलींची निवड करण्यात आली असून त्यांचे सर्व प्रशिक्षण, शिक्षण आता शासन बघणार आहे. त्यांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी उत्कृष्ट प्रशिक्षक नेमण्यात येणार आहे. तसेच त्यांना भारतात व भारताबाहेरही प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

मुंबईतील खारघर येथे या खेळासाठी अद्यावत क्रीडांगण, प्रशिक्षणासह, शिक्षण राहणे आहार व स्कॉलरशिप शासनामार्फत आहे या यशाचे कौतुक मुख्यमंत्र्याचे प्रमुख आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे सचिव किरण चौगुले, स्कूलचे मुख्याध्यापक फादर रॉबिन, क्रीडा शिक्षक राजेंद्र गायकवाड. सिल्वस्टर जॉन, अमित, दामोदर यांनी अभिनंदन केले.

# पंढरपुरात भाजपाची गड आला पण सिंह गेला अशी स्थिती

## भाजपा मित्रपक्ष २४ तर भालकेंची आघाडी ११ जागांवर विजयी; नगराध्यक्षपदी डॉ.प्रणिता भालके

**तभा वृत्तसेवा / महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२१ डिसेंबर -**

संपुर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीत सत्ताधारी परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपाची गड आला पण सिंह गेला अशी अवस्था झाली. पंढरपूर पालिकेच्या या निवडणूकीत एकीकडे भाजपा आणि मित्रपक्ष आघाडीचे तब्बल २४ नगरसेवक निवडून आले तर दुसरीकडे सर्वात महत्वाच्या अशा नगराध्यक्षपदाच्या निवडणूकीत मात्र विरोधी तिर्थक्षेत्र विकास आघाडीच्या उमेदवार डॉ.प्रणिता भालके यांनी तब्बल ११ हजार १३६ मतांनी भाजपाच्या उमेदवार शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर ) यांचा पराभव केला. या निवडणूकीत भालकेंच्या तिर्थक्षेत्र आघाडीला नगरसेवकपदाच्या केवळ ११ जागांवर समाधान मानावे लागले. एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला.

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीची मतमोजणी येथील तहसील कार्यलया समोरील शासकीय धान्य गोदामा मध्ये रविवारी सकाळी दहा वाजता सुरु झाली. एकुण नऊ फेऱ्यामध्ये सर्व निकाल जाहीर झाले. दुपारी अडीचच्या सुमारास नगराध्यक्षपदासह ३५ नगरसेवकपदाचे निकाल घोषित झाले होते. मतदाना पूर्वीच प्रभाग क्रमांक पाच ( अ) मधुन भाजपाच्या कुसुम परचंडे या बिनविरोध निवडून आलेल्या होत्या. दरम्यान मतमोजणीच्यावेळी प्रभाग क्रमांक एक पासूनच नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ.प्रणिता भालकें यांची विजयी घौडदौड सुरु झालेली दिसून आली. नगराध्यक्षपदाची निवडणूक जनते मधून असल्यामुळे पहिल्या फेरीनंतरच नगराध्यक्षपदासाठी नागरिकांचा डॉ.प्रणिता भालकेंना कौल असल्याचा अंदाज आला होता.एकुण नऊ फेरी मध्ये नगराध्यक्षपदासाठी डॉ.प्रणिता भालकेंनी सुमारे ११ हजार १३६ मतांचे मताधिक्य घेऊन प्रतिस्पर्धी उमेदवार शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर ) यांचा मोठ्या फरकाने पराभव केला.



दुसरीकडे नगरसवेक पदासाठी झालेल्या मतमोजणीमध्ये प्रत्येक प्रभागात रंगत दिसुन आली. पालिकेच्या एकुण १८ प्रभागातून ३५ नगरसेवक पदाच्या उमेदवारांसाठी मतदान झालेले होते. यामध्ये परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजप मित्रपक्ष आघाडीला २४ जागा मिळाल्या. विरोधी तिर्थक्षेत्र आघाडीचे ११ नगरसेवक विजयी झाले. तर एका जागेवर अपक्ष उमेदवार निवडून आला.

पालिकेच्या या निवडणूकीमध्ये विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी देखील विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी स्थापन करुन सुमारे १२ नगरसेवकपदासाठीचे उमेदवार उभे केलेले होते. विशेष म्हणजे, या निवडणूकी मध्ये आमदार पाटील यांच्या विठ्ठल परिवर्तन विकास आघाडीला साधे खाते देखील उघडता आले नाही.

**प्रभागनिहाय विजयी उमेदवार असे : प्रभाग १ (अ)** - लखन जंबू चौगुले (भाजपा), **प्रभाग क्रमांक १ (ब)**- अर्चना गणेश शिंदे (भाजपा). **प्रभाग क्रमांक २ (अ)** -प्रसाद प्रकाश कळसे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक २ (ब)** - प्रणिता किरण घाडगे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर). **प्रभाग क्रमांक ३ (अ)** - तेजश्री रोहित पानकर (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ३ (ब)** - अक्षय प्रताप गंगेकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर). **प्रभाग क्रमांक ४ (अ)** - विनायक कुमार संगितराव (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ४ (ब)** - प्रियांका सागर तारापूरकर (भाजपा), **प्रभाग क्रमांक ५ (अ)** - कुसुम जगन्नाथ परचंडे ( भाजपा, बिनविरोध) आणि **प्रभाग क्रमांक ५ (ब)** - ओंकार अभय जोशी (अपक्ष). **प्रभाग क्रमांक ६ (अ)** - सुजितकुमार एकनाथ सर्वगोड (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक ६ (ब)** - रेहाना इब्राहिम बोहरी (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी,पंढरपूर) **प्रभाग क्रमांक ७ (अ)** - शिला शरद माने (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ७ (ब)** - भागवत त्रिंबक बडवे (भाजपा )**प्रभाग क्रमांक ८ (अ)** - मनिषा धनंजय देशपांडे (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ८ (ब)** - प्रदीप दिलीप पवार (भाजपा). **प्रभाग क्रमांक ९ (अ)** -प्रतिक्षा विक्रम शिरसट (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ९ (ब)** - संदिप पांडुरंग अधटराव (भाजपा),**प्रभाग क्रमांक १० (अ)** - साधना सुधीर धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक १० (ब)** - संजय जवाहरलाल बंदपट्टे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर).**प्रभाग क्रमांक ११ (अ)** -अनिता सिकंदर ढवळे (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक ११ (ब)** - बालाजी अरुण मलपे (भाजपा).**प्रभाग क्रमांक १२ (अ)** - निता नितीन परचंडे (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक १२ (ब)** -विशाल दगडू मलपे (भाजपा)

**प्रभाग क्रमांक १३ (अ)** - रुक्मिणी धनाजी धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक १३ (ब)** - नागेश आण्णासाहेब भोसले (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर). **प्रभाग क्रमांक १४ (अ)** -उज्वला महादेव भालेराव (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी) आणि **प्रभाग क्रमांक १४ (ब)** - महादेव माणिक धोत्रे (पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडी), **प्रभाग क्रमांक १५ (अ)** -धर्मराज आण्णाप्पा घोडके (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक १५ (ब)** - स्मिता आदित्य फत्तेपूरकर (तिर्थक्षेत्र विकास आघाडी )**प्रभाग क्रमांक १६ (अ)** - अमोल विठ्ठल डोके (भाजपा) आणि **प्रभाग क्रमांक १६ (ब)** - संध्या मालोजी शेंबडे (भाजपा),**प्रभाग क्रमांक १७ (अ)** - लोकेश नागनाथ यादव (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक १७ (ब)** - माधुरी दिलीप धोत्रे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर)**प्रभाग क्रमांक १८ (अ)** - विनायक बसवेश्वर देवमारे (तिर्थक्षेत्र विकास आघाडी,पंढरपूर) आणि **प्रभाग क्रमांक १८ (ब)** - ज्योती अशोक शिंदे (भाजपा).

### लाव रे तो व्हिडिओचा मोठा इफेक्ट

नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डाँ.प्रणिता भालके यांच्या शेवटच्या प्रचार सभेत भगिरथ भालकेंनी येथील शिवतिर्थावर सभा घेऊन त्या मध्ये लाव रे तो व्हिडिओ म्हणत परिचारकांनी शहरात केलेल्या विकास कामांच्या दाव्याची पोलखोल केली. त्यामुळे देखील भालकेंच्या विजयाचा मार्ग सुकर झाला.

### क्रॉस व्होटिंगचा फटका

पंढरपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या आरक्षण सोडती मध्ये नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षीत झालेले होते. मात्र सर्वसाधारण महिला जागेवर परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपा मित्रपक्ष आघाडीच्या वतीने ओबीसी प्रवर्गातील महिला उमेदवार शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर) यांना भाजपाकडून उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे देखील भाजपाच्या शामल पापरकर या नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराला क्राँसव्होटिंगचा मोठा फटका सहन करावा लागला.

### स्व.भारत भालकेंवरील टीका मतदारांना रुचली नाही

पंढरपूर शहरात आमदार भारत भालके यांची एक वेगळी क्रेझ होती. (स्व.) भारतनाना भालकें यांच्या विषयी आजही शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये सहानुभूती आहे. मात्र नगरपालिका निवडणूकी दरम्यान माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी प्रचार सभेतून (स्व.) भारत भालके यांचा ऐकेरी उल्लेख करीत त्यांच्यावर केलेली टीका सर्वसामान्य मतदारांना रुचली नाही. त्याचा मोठा परिणाम नगराध्यक्षपदाच्या मतदानातून दिसुन आला.

# सांगोला नगरपरिषदेवर शिवसेनेचे माजी आ.शहाजीबापू पाटील यांची सत्ता





### लोकनियुक्त नगराध्यक्षपदी आनंदा गोरख माने

**तभा वृत्तसेवा / दीपक भाकरे**
**सांगोला,दि.२१ डिसेंबर -**

राज्याचे लक्ष लागून असलेल्या सांगोला नगरपरिषद निवडणुकीत शिवसेनेचे माजी आ.शहाजीबापू पाटील यांना लोकनियुक्त नगराध्यक्षसह २३ पैकी १५ नगरसेवक निवडून आणण्यात यश आले आहे. तसेच शहर विकास आघाडीला ८ जागांवर समाधान मानावे लागले.

सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीत अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शेतकरी कामगार पक्षामधील मारुतीआबा बनकर यांचा भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश घेऊन त्यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली. त्यानंतर दिपकआबा साळुंखे पाटील गट, शेतकरी कामगार पक्ष व भारतीय जनता पार्टी यांनी एकत्र येऊन शहर विकास आघाडी स्थापन केली. त्यांच्याविरुद्ध शिवसेनेचे माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी नगराध्यक्ष पदाची उमेदवारी आनंदा माने यांना देऊन एकाकी लढत दिली. निवडणुकीच्या काळात शहर विकास आघाडीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर शिवसेनेच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सांगोल्यात सभा पार पडल्या होत्या.

दरम्यान शिवसेनेकडून **प्रभाग क्र.१** अ मधून राणी आनंदा माने तसेच शहर विकास आघाडी कडून **प्रभाग क्र.११** अ मधून सुजाता चेतनसिंह केदार सावंत ह्या नगरसेवक पदासाठी बिनविरोध निवडून आल्या. त्यामुळे रविवार दि.२१ डिसेंबर रोजी नगराध्यक्ष व २१ नगरसेवक पदासाठी मतमोजणी पार पडली. यामध्ये शिवसेनेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदा गोरख माने हे ५ हजार १४० मतांनी विजयी झाले. तसेच नगरसेवक पदाचे प्रभाग क्र.१ ब रामचंद्र बापू मदने, प्रभाग क्र.२ अ प्रशांत बबन धनवजीर, २ ब वैशाली सतिश सावंत, प्रभाग क्र.३ अ गोदाबाई भारत बनसोडे, ३ ब अरुण विलास पाटील, प्रभाग क्र.४ अ आशादेवी सोमेश्वर यावलकर, ४ ब ज्ञानेश्वर बाळकृष्ण तेली, प्रभाग क्र.५ अ काशिलिंग दगडू गावडे, ५ ब छाया सुर्यकांत मेटकरी, प्रभाग क्र.६ अ सिमा समाधान सरगर, ६ ब चैतन्य ज्ञानु राऊत, प्रभाग क्र.१० ब विवेक दिलीप पाटील, प्रभाग क्र.११ ब अनिता निलेश केदार, क नितिन विठ्ठल इंगोले हे उमेदवार विजयी झाले. तसेच शहर विकास आघाडीचे प्रभाग क्र.७ अ गणेश शिवाजी बनकर, ७ ब शोभा निवृत्ती फुले, प्रभाग क्र.८ अ श्रध्दा रवीप्रकाश साबळे, ८ ब रमेश पांडूरंग जाधव, प्रभाग क्र.९ अ जुबेर इक्बाल मुजावर, ९ ब दिव्यानी सौरभ दौंडे, प्रभाग क्र.१० अ वैशाली सिध्दार्थ झपके हे उमेदवार विजयी झाले.

ही निवडणूक नेत्यांपेक्षा सर्वसामान्य जनतेने स्वतःच्या हातात घेतली होती. हा विजय सर्वसामान्य जनतेने प्रस्थापित, श्रीमंत आणि अहंकारी लोकांचा केलेला पराभव आहे. सांगोला शहरातील जनतेने आपला स्वाभिमान जिवंत ठेवला आहे. मी सर्व मतदारांचे मनापासून आभार मानतो.

**- माजी आ.शहाजीबापू पाटील**

सांगोला नगरपरिषदचे नूतन नगराध्यक्ष आनंदा माने आणि सर्व विजयी नगरसेवकांचे प्रथम मनपूर्वक अभिनंदन ! या निवडणुकीत आमच्या शहर विकास आघाडीचा पराभव झाला. आघाडीचा हा पराभव धक्कादायक असला तरी या पराभवाने आम्ही कुणीही खचून जाणारे नाही. या पराभवाची कारणमीमांसा करू, तसेच जनमताचा आदर करून योग्य सर्व निर्णय घेऊ आणि आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जिंकण्याचा सर्वोतोपरी प्रयत्न करू

**- माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील**

# माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी दुधनी गड ठेवला शाबूत

### शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे यांच्यासह सर्व २० उमेदवार विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.२१ डिसेंबर-**

काँग्रेसचा त्याग करुन शिवसेना शिंदे गटात प्रवेश केलेले माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या दृष्टीने होमपिच मानला जाणाऱ्या दुधनी नगरपालिकेत भारतीय जनता पार्टीचा होऊ घातलेला शिरकाव रोखत सिध्दाराम म्हेत्रे यांनी आपला गड शाबूत ठेवला. विशेष म्हणजे, गतवेळच्या निवडणुकीत या नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदावर आणि नगरसेवकांच्या दोन जागांवर 'भाजपा'चे उमेदवार निवडून आले होते. यंदाच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे यांच्यासह शिवसेनेने सर्वच्या सर्व म्हणजे २० जागांवर विजय संपादन केले. शिवसेनेचे प्रथमेश म्हेत्रे यांना ५ हजार १५७ तर भारतीय जनता पार्टीचे अतुल मेळकुंदे यांना २ हजार २८९ मते मिळाली. काँग्रेसचे उमेदवार महेश बाजारमठ यांच्या पारड्यात केवळ १६० मते पडली. राजेंद्र इंगळे यांना ६५ तर रेखा गद्दी यांना ३० मते मिळाली.

प्रभागनिहाय उमेदवार, पक्ष आणि पडलेली मते याप्रमाणे; अश्विनी हरळेकर १ अ (शिवसेना)-६०० मते, झळकी आम्रपाली-भाजप (१८२ ) मते काँग्रेसच्या निर्मला गायकवाड यांना २४ मते व नोटा ९ मते मिळाली.

बसवराज परमशेट्टी-१ब (शिवसेना) ६०६ विजयी, ठक्का संतोष-भाजप-१८१, वगदरगी दौलप्पा-काँग्रेस-२४, नोटा ४ मते. प्रभाग दोन अ मध्ये श्रीदेवी कोळी-२अ विजयी(शिवसेना)-४७६ विजयी, कोळी सुनंदा-भाजप २८५, नोटा १० मते. संगमेश सिन्नूर-२ ब (शिवसेना)-५०३मानकर ज्ञानेश्वर-काँग्रेस-२३, सिध्दाराम म्हेत्रे-भाजप-२३६, नोटा ९. प्रभाग ३ पवार हरिचंद्र-३ अ (शिवसेना)-४१९, जमादार परमेश्वर-भाजप-१५१, नोटा ८. सरूबाई मळेकर -३ ब (शिवसेना)-४०८, संगीता गोटे-काँग्रेस-२५, श्रीदेवी गोटे-भाजप १४०, नोटा.

प्रभाग ४ मधुमती म्हेत्रे विजयी-४अ (शिवसेना)-४२५, महादेवी कोळी-भाजप-१४०, नोटा ९. सिध्दाराम येगदी-४ ब (शिवसेना)-४१५, महेश पाटील-भाजप -१४१, गुरुशांत अल्लापूर-काँग्रेस-९, नोटा ७. प्रभाग ५ सुषमा धल्लू विजयी-५ अ (शिवसेना)-७२०, शबाना मोमीन-भाजप १४६, रुपा बाहेरमठ-काँग्रेस-३४, नोटा ५. जिलानी नाकेदार-५ ब (शिवसेना)-७१५, काशीनाथ यरगल-भाजपा-१७७, नोटा १३. प्रभाग ६ रऊफ निंबाळकर-६ अ (शिवसेना)-५५४, हणमंत कलशेट्टी-भाजप-१४४, नोटा ९. सुनंदा चिंचोळी-६ ब (शिवसेना)-५९९, रुपाली भाईकट्टी-भाजप-२८६, विजयलक्ष्मी हिरेमठ-काँग्रेस ११, नोटा ११.

प्रभाग ७ बसवराज बसवनकेरी-७ अ (शिवसेना)-५४५, हादीमनी अजय-काँग्रेस ४८, लक्ष्प्पा बसवनकेरी-भाजप २९२, रेखा गद्दी-बसपा ९, नोटा ५. संगीता पाटील-७ ब (शिवसेना)-५८२, अनिता भांजी-भाजप ३१३, नोटा १३. प्रभाग ८ स्वाती सोळशे-विजयी ८ अ (शिवसेना)-४०८, हणमंत फुलारी-भाजप ३०९, यल्लाप्पा गोटे-काँग्रेस १६, नोटा ०. अंजनाबाई पोलिसपाटील-८ ब (शिवसेना)-३९६, निर्मला रामचंद्र बिराजदार-भाजप ३३२, फुलारी राजेश्वरी-काँग्रेस १२, नोटा ०. प्रभाग ९ ललिता गद्दी-९ अ विजयी (शिवसेना)-४९६, फुलारी अंबवा हणमंत-भाजप २७८, नोटा ०. सातलिंगप्पा शरणप्पा परमशेट्टी-९ ब (शिवसेना)-४६५, परमशेट्टी सातलिंगप्पा सैदप्पा-भाजप-३०१, विठ्ठल भगवान पाटील-काँग्रेस १२, नोटा ०. प्रभाग १० जगदेवी कोतली-१० अ (शिवसेना)-४९१, नंदिनी सुरेश परमशेट्टी-भाजप-२७६, महांतेश पाटील-१० ब (शिवसेना)-४२५, महेश चंद्रकांत टक्कळकी-काँग्रेस-२७, सातलिंग सिद्धण्णा अल्लापुर-भाजप-३०९, नोटा ०.

# करमाळ्यात शहर विकास आघाडीचा भाजप व शिवसेनेला दे धक्का...

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार वलटे, तुषार जाधव**
**करमाळा । जेऊर दि.२१ डिसेंबर**

करमाळा नगरपरिषदेच्या निवडणुकीत सावंत गटाच्या मोहिनी सावंत १८३१ मतांनी विजयी झाल्या त्यांनी भाजपच्या सुनिता देवी यांचा पराभव केला. शहर विकास आघाडीचे आठ नगरसेवक निवडून आले. तर भाजप सात, शिवसेना पाच नगरसेवक निवडून आले. भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी आलेल्या पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी करमाळा नगरपरिषद दत्तक घेतली असल्याचे मतदारांना ठामपणे सांगितले होते. ही निवडणूक सामान्य लोकांनी हाती घेतली व जनशक्तीचा विजय झाला अशी प्रतिक्रिया सावंत गटाचे नेते सुनिल बापु सावंत यांनी दिली. भारतीय जनता पार्टीकडे मुख्यमंत्री,पालकमंत्री यांचेसह भलीमोठी फौज असतानासुद्धा त्यांना अपयशाला सामोरे



जावे लागले ही पक्षासाठी आत्मचिंतनाची वेळ आहे. शिवसेनेला मोठ्ठा धक्का बसला असून शिवसेनानेते मा.आ.जयवंतराव जगताप यांच्या पत्नी नंदीनीदेवी जागताप यांना पराभवाला सामोरे जावे लागले. तसेच त्यांचे पुत्र माजी नगराध्यक्ष वैभव जगताप हे देखील नगरसेवकपदासाठी उभे होते. ते देखील पराभूत झाले. जगताप यांचेसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विजयाचे आव्हान केले होते.

नगरपालिकेतील संख्या बळ : सावंत गट- ८+१, भाजपा- ७, शिवसेना- ५ असे राहिले.

**विजयी उमेदवार :** करमाळा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक नगराध्यक्षा सौ मोहीनीताई संजय ( पप्पु) सावंत अपक्ष सावंत गट -

**वार्ड क्रमांक एक** १) रवि जाधव (सावंत गट) २) खलील मुलाणी (सावंत गट)

**वार्ड क्रमांक दोन** ३) संजय ( पप्पू ) सावंत (सावंत गट) ४) प्रदीप लुणिया(सावंत गट)

**वार्ड क्रमांक तीन** ५) सचिन गायकवाड (भाजप)● ६) दादा इंदलकर(सावंत गट)

**वार्ड क्रमांक चार** ७) अतुल फंड (भाजप)● ८) स्वाती फंड (भाजप)●

**वार्ड क्रमांक पाच** ९) विक्रमसिंह परदेशी (सावंत गट) १०) चाचा कुरेशी( शिवसेना)

**वार्ड क्रमांक सहा** ११)प्रशांत ढाळे (शिवसेना) १२) रोहिदास आल्हाट (शिवसेना)

**वार्ड क्रमांक सात** १३) युवराज चिवटे(शिवसेना) १४) अब्दुले मॅडम (शिवसेना)

**वार्ड क्रमांक आठ** १५) दीपक चव्हाण (भाजप)● १६) रामभाऊ ढाणे (भाजप)●

**वार्ड क्रमांक नऊ** १७) सचिन घोलप (भाजप)● १८) विजय घोलप (भाजप)●

**वार्ड क्रमांक दहा** १९) संदीप कांबळे (सावंत गट) २०) चैत्राली सावंत (सावंत गट)

### यांचा झाला पराभव

करमाळा नगर परिषदेत भाजप नगराध्यक्ष पदाचे उमेदवार पराभूत झाले. त्याच बरोबर भाजप शहर अध्यक्ष जगदिश आग्रवाल, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, माजी नगरसेवक राहुल जगताप, माजी नगराध्यक्ष वैभव जगताप, माजी नगरसैवक प्रविण जाधव, रवि कांबळे, अल्ताफ तांबोळी, श्रेणिक खाटेर, माजी नगरसेवक श्रीनिवास कांबळे यांचे पुत्र निलेश कांबळे यांना पराभवास सामोरे जावे लागले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महानगरपालिका निवडणूक ३७५ मतदान केंद्रांवर होणार मतदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** होऊ घातलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ३७५ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मागच्या मनपा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदान केंद्रांच्या संख्येत चार ची भर पडली आहे. मनपा प्रशासन या निवडणुकीसाठी सज्ज झाले आहे.लातूर शहर मनपाची यावेळचीनिवडणूक लक्षवेधी ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मागच्या निवडणुकीच्या दरम्यान शहरात असणाऱ्या मतदारांच्या संख्येत आता ४० हजार मतदारांची वाढ झाली आहे. वाढ झालेला मतदार हा तरुण – नव मतदार आहे. तरुणवर्ग ज्याच्या पाठीशी राहील त्या राजकीय पक्षाला विजयाची अधिक संधी असणार आहे. मनपा निवडणुकीसाठी मनपा प्रशासन सज्ज झालेआहे. साडेतीन वर्षांपासून प्रशासकराज असणाऱ्या लातूर शहर मनपाला येत्या जानेवारीमध्ये नूतन पदाधिकारी मिळणार आहेत. त्यादृष्टीने सर्वचराजकीय पक्ष कामाला लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेची ही निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीच्या वतीने एकत्रित लढवण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहेत. त्यामुळे या निवडणुकीत शेवटच्या क्षणाला नाराज कार्यकर्त्यांकडून बंडाचे निशाण फडकावले जाण्याची शक्यताही बळावल्याचे दिसून येत आहे.



# जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपाची सरशी

### पाच पैकी चार नगराध्यक्षपदावर भाजपाचे उमेदवार विजयी । निलंगा, उदगीर, अहमदपूर व रेणापूरमध्ये भाजप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** लातूर जिल्ह्यात पार पडलेल्या चार नगर परिषद आणि एका नगर पंचायत निवडणुकीपैकी औसा नपचा अपवाद वगळता अन्य ठिकाणी भारतीय जनता पार्टीची सरशी झाल्याचे पाहावयास मिळाले. या निकालाकडे लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीची रंगीत तालीम म्हणून पाहिले जात होते. एकंदर परिस्थितीवरून मतदार विकास कामांना प्राधान्य देण्याच्या दृष्टीने पूर्णतः भारतीय जनता परिचय पाठीशी असल्याचेच पाहावयास मिळाले. या निकालाचे परिणाम निश्चितच येणाऱ्या मनपा आणि जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीवर होतील, असाही तर्क लावला जात आहे.

कधीकाळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा अभेद्य गड असलेला लातूर जिल्हा मागच्या काही वर्षात भाजपचा बालेकिल्ला बनू पाहत आहे. भाजपाकडे पाहण्याची मतदारांची धारणा आता पुरती बदलली आहे. राज्यात आणि देशात एकाच पक्षाचे सरकार असल्यास त्याचा विकासकामांवर चांगला परिणाम होतो,

या बाबी आता कोणी सामान्य नागरिकांना समजावून सांगण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. आजचा मतदार सुज्ञ आणि चाणाक्ष झाला आहे. त्याला चांगल्या-वाईटाची चांगली जाण आहे. त्यामुळे निवडणूक प्रचारादरम्यान कोणी-कितीही प्रक्षोभक वक्तव्ये केली वा मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला तरीही मतदार आपल्याला जे करायचे आहे तेच करण्यास प्राधान्य देतात, असे या निकालाकडे पाहून लक्षात येते.

उदगीर नगर परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपच्या स्वाती सचिन हुडे या विजयी झाल्या. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या खादरी अंजुम फातेमा सय्यद अब्दुलाह यांचा पराभव केला. अहमदपूर नगर परिषदेच्या अध्यक्षपदी भाजपचे स्वप्नील महारुद्र व्हत्ते विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अभय मिरकले यांचा पराभव केला. निलंगा नपमध्ये भाजपच्या संजयराज प्रमोद हलगरकर यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या शेख हमीद इब्राहिम यांचा पराभव केला. औसा नपमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या परवीन नवाबोद्दीन शेख या निवडून आल्या. त्यांनी भाजपच्या ज्योती महादेव बनसुडे यांचा पराभव केला. रेणापूर नगर पंचायतमध्ये भाजपच्या शोभा श्यामराव आकनगिरे या नगराध्यक्षपदी निवडून आल्या. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अर्चना प्रदीप माने यांचा पराभव केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून बराच काळ रखडल्या होत्या. या निवडणुका कोणत्याही परिस्थितीत येत्या ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. न्यायालयाच्या आदेशान्वये या निवडणुका एकूण तीन टप्प्यात पूर्ण केल्या जात आहेत. नगर परिषद-नगर पंचायतचा हा पहिला टप्पा आज पार पडला.

दुसऱ्या टप्प्यात आता मनपाच्या निवडणुका होणार आहेत. जिल्ह्यात झालेल्या या एकूण पाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालाकडे जिल्हाभरातील मतदारांचे लक्ष लागले होते. या निवडणुकीच्या निकालावर लातूर मनपाच्या निकालाचा अंदाज वर्तवला जात होता.

पाच पैकी चार ठिकाणी भाजपचे वर्चस्व सिद्ध झाल्याने लातूर मनपाचा निकालही फारसा वेगळा राहणार नाही, अशा प्रतिक्रिया सुजाण नागरीकातून व्यक्त केल्या जात आहेत.या निकालाचे परिणाम लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीवर कितपत होणार? हा आता खऱ्या अर्थाने औत्सुक्याचा विषय होताना दिसत आहे.

मनपा निवडणुकीसाठी दि. २३ डिसेंबरपासून नामनिर्देशनपत्रे दाखल केली जाणार आहेत. त्यामुळे येत्या तीन चार दिवसात कोणत्या पक्षाकडून कोणता चेहरा उमेदवार म्हणून पुढे केला जातोय त्याकडेही आता मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे. जिल्ह्यातील अन्य स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या तुलनेत लातूर शहर मनपाची निवडणूक अतिशय चुरशीची, अटीतटीची होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## वकिलांचे प्राथमिक कर्तव्य हे न्याय सुनिश्चित करणे : प्रशांत भूषण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** दयानंद शिक्षण संस्थेच्या दयानंद विधी महाविद्यालयास सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांनी दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना अमुल्य असे मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना संबोधित करताना ॲड. प्रशांत भूषण म्हणाले की, तुम्ही कायद्याच्या क्षेत्रातील न्यायासाठी लढणारे योद्धे आहात. वकील झाल्यानंतर तुमचे प्राथमिक कर्तव्य न्याय सुनिश्चित करणे हे आहे.

यावेळी त्यांनी सध्याच्या परिस्थितीत न्यायव्यवस्था धोक्यात असून ती पूर्णपणे स्वतंत्र राहिलेली नाही अशी चिंता व्यक्त केली. तसेच प्रत्येक वकिलाची प्राथमिक जबाबदारी ही नागरिकाचे मूलभूत हक्क संरक्षित करणे तसेच जलद गतीने न्याय मिळण्यासाठी न्यायव्यवस्थे मध्ये नेतृत्व करणे हे असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.




व्यासपीठावर दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सहसचिव ड श्रीकांत उटगे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ड. आशिष बाजपाई, सुदर्शन भांगडिया यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुनम नाथानी, तसेच दयानंद शिक्षण संस्थेच्या इतर महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा डॉ. शुभांगी पांचाळ यांनी केले.

## भाजपा युवा मोर्चा लातूर शहर जिल्हा उपाध्यक्षपदी शंकर नागभुजंगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** भाजप लातूर शहर युवा मोर्चाच्या उपाध्यक्षपदी शंकर नागभुंजगे यांची निवड करण्यात आली आहे. भाजप युवा मोर्चाची लातूर शहर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशाने, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तसेच लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनात आणि मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, आ. रमेश आप्पा कराड व लातूर शहर जिल्हा अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपा युवा मोर्चा लातूर शहर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

या कार्यकारिणीत निवड झालेल्या सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे सर्व मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.


## शिवराज पाटील चाकूरकर यांना लातूरकरांच्या वतीने श्रद्धांजली

### दयानंद सभागृह येथे मंगळवारी श्रद्धांजली सभेचे आयोजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २१ डिसेंबर :** विद्वत्ता आणि नैतिक मूल्यांचे प्रतीक म्हणून ओळख असलेले माजी केंद्रिय गृहमंत्री व पंजाबचे माजी राज्यपाल शिवराज पाटील चाकूरकर यांचे १२ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी लातूरकरांच्या वतीने सभा आयोजित करण्यात आली आहे. ही श्रद्धांजली सभा मंगळवारी (दि . २३) सायंकाळी ४ वाजता दयानंद सभागृह येथे होणार आहे.

लातूरचे नगराध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार, केंद्रिय मंत्री, लोकसभेचे सभापती, राज्यपाल अशी विविध पदे भूषवत असताना शिवराज पाटील चाकूरकर यांनी राजकारणात कायम नैतिकता जपली. मूल्यांना महत्त्व दिले. सुसंस्कृत राजकारणाचा, निष्कलंक



व्यक्तिमत्त्वाचा आदर्श घालून दिला. आपल्या प्रदीर्घ राजकीय, सामाजिक कारकिर्दीला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांचे योगदान कायम स्मरणात राहणार आहे.

त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मंगळवारी (ता. २३) दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेस नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पद्मभूषण डॉ. अशोक कुकडे, माजी कुलगुरू व माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे, शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, अष्टविनायक प्रतिष्ठानचे संस्थापक प्रदीप राठी, महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, ड. धनंजय पाटील, इसाक नवाब पटेल, जयप्रकाश दगडे, राजेश्र्वर बुके आणि संयोजन समितीच्या वतीने केले आहे.

## नागनाथ वनकुद्रे : आत्मनिर्भर शेतीचा यशस्वी प्रयोगशील आदर्श

### मुख्य पिकासोबतच आंतरपिक घेवून करतात शेतीचा पुरेपूर वापर

**त.भा. वृत्तसेवा,**

**येरोळ, दि. २१ डिसेंबर :** येरोळ, ता. शिरूर अनंतपाळ येथील प्रगतिशील शेतकरी नागनाथ भगवान वनकुद्रे यांनी आपल्या कष्ट, कल्पकता आणि प्रयोगशीलतेच्या जोरावर आत्मनिर्भर शेतीची यशस्वी वाटचाल केली आहे. मर्यादित साधनसंपत्ती असूनही त्यांनी शेतीत नावीन्यपूर्ण प्रयोग राबवत परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

नागनाथ वनकुद्रे यांनी आपल्या शेतामध्ये ८००५ या सुधारित जातीचा ऊस लागवड केला असून, त्या उसामध्ये आंतरपीक म्हणून घेवड्याची लागवड करून दुहेरी उत्पन्नाचा मार्ग अवलंबला आहे. उसासोबत घेतलेल्या आंतरपिकामुळे जमिनीचा पुरेपूर वापर होत असून उत्पन्नात लक्षणीय वाढ होत आहे.

शेतीला वन्यप्राण्यांपासून संरक्षण मिळावे यासाठी त्यांनी स्वतःच्या पाच लाख रुपयाच्या स्वखर्चातून तारेचे कुंपण उभारले आहे. यामुळे पिकांचे नुकसान थांबले असून शेतातील उत्पादन सुरक्षित आणि शाश्र्वत बनले आहे. त्यांच्या शेतात ऊस, घेवडा यासोबतच करडई हे पीकही घेतले जाते. याशिवाय त्यांनी दीर्घकालीन उत्पन्नाचा विचार करून शेवगा व आंबा यांसारख्या फळझाडांची लागवड केली आहे. कमी पाण्यात चांगले उत्पादन देणारी ही झाडे त्यांच्या शेतीला आर्थिक स्थैर्य देत आहेत. विविध पिकांचे नियोजन, पाणी व्यवस्थापन आणि खर्च नियंत्रण यामुळे




त्यांची शेती खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनली आहे.

नागनाथ वनकुद्रे हे केवळ पारंपरिक शेतीपुरते मर्यादित न राहता नवनवीन प्रयोग करणारे प्रयोगशील शेतकरी म्हणून परिसरात ओळखले जातात. त्यांच्या शेतीकडे पाहण्यासाठी व मार्गदर्शन घेण्यासाठी आजूबाजूच्या गावांतील अनेक शेतकरी येतात. आजच्या काळात वाढते उत्पादन खर्च, पाण्याची टंचाई आणि अस्थिर बाजारपेठ यामध्येही स्वतः च्या बुद्धी, मेहनत आणि आत्मविश्र्वासाच्या जोरावर शेती कशी यशस्वी करता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे नागनाथ भगवान वनकुद्रे यांची शेती आहे. त्यांच्या या आत्मनिर्भर शेतीच्या वाटचालीमुळे अनेक शेतकऱ्यांना नवी दिशा आणि नवी उमेद मिळत आहे.




## सुल्लाळीकर-चाकूरकरांच्या स्मरणार्थ काळे वैद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २० डिसेंबर :** दिवंगत एड. शिवराज पाटील सुल्लाळीकर व माजी केंद्रीय गृहमंत्री स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मरणार्थ डॉ. सुवर्णा डिगोळे, गितांजली पाटील, चुरी,अमेरिका यांच्या वतीने लातूरच्या कै. बी.व्ही. काळे आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालयास सोलर ड्रायर मोफत भेट देण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद पवार, डॉ. सुमोल पवार, डॉ. मुळजे, डॉ. चव्हाण, डॉ. निरगुडे, डॉ. महेंद्रकर, डॉ. नरहरे, डॉ. नाईकवाडे, डॉ. पुरी, डॉ. देशमुख, डॉ. नंदनवनकर, डॉ. खानापूरकर, डॉ.उषा गिरीश ब्याळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## वेद मंत्रोच्चारात पार पडला स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा समाधी सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**


**लातूर, २१ डिसेंबर :** आपले संपूर्ण जीवनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघास समर्पित केलेले मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा समाधी सोहळा वेद मंत्रोच्चारात सोमवारी रात्री उशिरा औसा तालुक्यातील वानवडा येथील प्रा. उमाकांत होनराव यांच्या शेतात पार पडला.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला.

उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व.सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिले आहे.

राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले.

सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले.तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या



असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर, श्रीपादजी नाईक, राज्याचे विद्यमान उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले. त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते.

पूज्य दुर्गानंद गिरी महाराज यांच्या समाधी सोहळ्यासाठी नाशिकहून जयंत गायधनी, राम मंदीर प्रतिष्ठापनामध्ये सहभागी झालेले पं. दिनेश गायधनी, संतोष दिक्षित, नाशिकच्या गोदावरी मंदिराचे पुजारी योगेश कवी, त्र्यंबकेश्वरचे राजाभाऊ लोहगावकर लातुरात दाखल झाले होते. एखाद्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यामध्ये ज्याप्रमाणे सर्व धार्मिक विधी, संस्कार पार पाडले जातात, अगदी त्याप्रमाणे दुर्गानंद महाराजांचा समाधीसोहळा चालला. त्यांच्या पार्थिवाचा विधिवत अभिषेक, पूजाअर्चा झाल्यानंतर समाधी पूर्ण झाला. हा सर्व विधी लातूरच्या रिलायन्स लातूर पॅटर्नचे प्रा. उमाकांत होनराव यांनी पूर्ण केला. कडाक्याच्या थंडीतही यावेळी स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मान्यवरांनी गर्दी केली होती.

यावेळी औशाचे आमदार अभिमन्यू पवार, सुशिलदादा बाजपाई, विभाग प्रचारक राजेशजी संन्यासी, विवेकानंद फाउंडेशनचे डॉ. संतोष देशपांडे, द्रविड एज्युकेशन सोसायटी वाईचे डॉ. मुजुमदार, नाशिकचे कांचनताई खाडे, गौरव खाडे, विभाग संघचालक संजय अग्रवाल, सागर कारंजे, औसा तालुका संघ चालक डॉ. जगताप, प्रेरणा होनराव, ओंकार होनराव, भीमाशंकर राचट्टे, अप्पाराव कुलकर्णी, अशोक मठपती गुरुजी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# राष्ट्रवादी काँग्रेसचे औशात निर्विवाद वर्चस्व

## नगराध्यक्ष राष्ट्रवादीचा, १७ राष्ट्रवादी तर ६ जागावर भाजप

**औसा, दि. २१ डिसेंबर :** औसा नगरपालिकेच्या २३ जागापैकी १७ जागावर राष्ट्रवादी काँग्रेसने विजय मिळवला. तर नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या परवीन नवाबोद्दीन शेख यांनी भाजपाच्या डॉ. ज्योती महादेव बनसोडे यांचा १३६१ मतांनी पराभव करीत औशाच्या नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसने निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. तर या निवडणुकीत महाविकास आघाडीला खातेही उघडता आले नाही.

औसा शहरातील ११ प्रभागातून २३ व नगराध्यक्ष पदासाठी एक अशा २४ जागेसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी रविवार दि. २१ रोजी प्रशासकीय इमारतीत निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार घनशाम अडसुळ व निवडणुक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी मंगश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. प्रभाग १ मध्ये शांताबाई काशीनाथ कसबे, आनंद अमरदीप कसबे राष्ट्रवादीने भाजपाच्या ॲड. मंजुषा जयराज कसबे, अंगद रामा कांबळे यांचा पराभव केला. प्रभाग २ मध्ये भाजपाच्या सुनील मिटकरी व ऐश्वर्या पवनराज राचट्टे यांनी राष्ट्रवादीच्या विलास दशरथ डोलारे, मंगल राजकुमार औटी



यांचा पराभव केला. प्रभाग ३ मध्ये राष्ट्रवादीच्या किर्ती अशोक कांबळे, अविनाश तानाजी टिके यांनी भाजपाच्या मनिषा उमेश जाधव, शाम शिवाजी भोसले यांना पराभूत केले.प्रभाग ४ मध्ये राष्ट्रवादी व काग्रेंस यांच्यात झाली.

भाजपाची या प्रभागात तिसऱ्या क्रमांकावर घसरण झाली. राष्ट्रवादीच्या मालनबी सालार पटेल, जावेद हमीदसाब शेख यांनी काग्रेंसच्या तबस्सुम खाजा शेख, अझहरुल्ला मजहरउल्ला हाश्मी यांचा पराभव केला.

प्रभाग ५ मध्ये राष्ट्रवादीच्या हंसा मुस्तफा सय्यद, गोविंद विठ्ठलराव जाधव यांनी भाजपाच्या सईदुन्निसा मुजम्मिल शेख, जयशंकर विजयकुमार मिटकरी यांना पराभुत केले. प्रभाग ६ मध्ये राष्ट्रवादीच्या कृष्णा प्रभू सावळकर, मेहरून्नीसा मेहराज शेख यांनी भाजपाच्या महादेव निवृत्ती कटके, आसमा आक्रमखान पठाण यांचा पराभव केला.

प्रभाग ७ मध्ये महायुतीचे पियुष गोपाळराव म्हेत्रे व शिल्पा संतोष कुलकर्णी यांनी राष्ट्रवादीच्या जिवन मुरलीधर कांबळे, अंजली अच्युत सुर्यवंशी यांना पराभूत केले. प्रभाग ८ मध्ये भाजपाच्या अश्विनी नागनाथ स्वामी, आकाश शिवशंकर उटगे यांनी राष्ट्रवादीच्या सविता राजकुमार स्वामी, महादेव राजेंद्र जोगदंड यांना पराभूत केले.

प्रभाग ९ मध्ये राष्ट्रवादीच्या आसिफुन निसा खुनमिर मुल्ला, कलीमुल्ला अब्दुल अजीज सय्यद यांनी भाजपाच्या फातेमा उमर पंजेशा, सोमनाथ गुरपादप्पा इळेकर यांना पराभूत केले.

प्रभाग १० मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस व शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये झाली तर भाजपा या प्रभागात तिर्सऱ्या क्रमांकावर गेला. राष्ट्रवादीच्या रफीक गफुरमियाँ उर्फ बाबा मुंगले, अतिखा खादर सय्यद यांनी मारुफ रशिद शेख, नाजेमा ईस्माईल शेख यांचा पराभव केला. प्रभाग ११ मध्ये राष्ट्रवादीच्या हफिजाबेगम रहेमानसाब कुरेशी, सबीहा बासीद शेख,अफसर नवाबोद्दीन शेख यांनी भाजपाच्या नसिबाबेगम बाबू सय्यद, उषा लिंबराज जाधव, वसिम मुनीरअली सय्यद यांचा पराभव केला.

या निवडणुकीत सर्वच प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार टक्कर देत ११ पैकी ८ प्रभागात विजय मिळवत १७ जागा जिंकल्या तर भाजपाने ३ प्रभागातून ६ जागा जिंकल्या. एक प्रभागात महाविकास आघाडी तर एक प्रभागात शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने झुंज दिली मात्र विजय मिळाला नाही. यामुळे महाविकास आघाडीला खातेही उघडता आले नाही.

नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या परवीन नवाबोद्दीन शेख यांनी भाजपाच्या डॉ. ज्योती महादेव बनसोडे यांचा १३६१ मतांनी पराभव केला. शिवसेनेच्या ॲड. मंजुषा रुपेश माडजे यांना ३३१ मते पडली.तर अपक्षांना दोनशेचा टप्पा ओलांडता आला नाही.

# औशात राष्ट्रवादी काँग्रेसचा जल्लोष

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, दि. २१ डिसेंबर :** औसा नगरपालिकेच्या निवडणुकीतील मतदानाची मतमोजणीस रविवार दि. २१ रोजी सकाळी १० वा. पासून सुरुवात झाली. फेरीतील आघाडीनंतर हालगी, ताशा, फुल व गुलालाची उधळण सुरु झाली. दुपारी १२ नंतर जवळपास सर्वपक्षीय वाजंत्र्यांनी एकजुट होत विजयी उमेदवारांचा शोध घेत वाजवण्यास सुरुवात केली. सर्व फेऱ्यांची मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर मुख्य रस्त्याच्या दुतर्फा वाट पाहत बसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाक्यांची आतिषबाजी व फुलांची उधळण करीत हालगी, ढोल ताशाच्या ठेक्यावर ताल धरीत गुलालाची उधळण करुन एकच जल्लोष केला.

या अटीतटीच्या झालेल्या निवडणुकीतील अनेक उमेदवारांनी मतमोजणी केंद्राकडे लांबूनच हजेरी लावली होती. तर मोजक्याच उमेदवारांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या गर्दीत हजेरी लावली.या निवडणुकीसाठी खास करुन उपस्थित राहिलेल्या हालगी पथकांनी विजयी उमेदवारांचा शोध घेऊन ताल धरण्यास सुरुवात केली. दुपारनंतर या मतमोजणीचा निकाल निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी जाहीर करताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या तरुण कार्यकर्त्यांनी विजयी उमेदवारांना हार घालून खांद्यावर घेऊन गुलाल उधळुन केली.

११ प्रभागातील मतमोजणी जाहीर



करताच पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी तहसिल कार्यालयासमोर एकच जल्लोष सुरु केला. सांस्कृतीक सभागृहाच्या समोरुन तहसिल कार्यालयाच्या कोर्पय्रापर्यंत वाद्याच्या तालावर ठेका धरुन हातात पक्षाचा झेंडा धरुन एकच जल्लोष केला. यानंतर सलग तीन चार फेऱ्या मारुन राष्ट्रवादी काँग्रेसचा विजयी जल्लोष शहराच्या मुख्य रस्त्यावरुन गेला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा नुतन नगरसेवक अफसर शेख, आनंद बनसोडे, अविनाश टिके,जावेद शेख, गोविंद जाधव, मेहराज शेख, कलीमुल्ला सय्यद, खादर सय्यद, बासीद शेख, शांताबाई कसबे, कृष्णा सावळकर, खुनमिर मुल्ला, रफीक मुंगळे,रहेमान कुरेशी,उपस्थित होते.

# साकोळकरांच्या वतीने चाकूरकरांना श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, २१ डिसेंबर :** भारताचे माजी केंद्रीय मंत्री व लातूरचे सुपुत्र शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या निधनाने साकोळसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानिमित्त साकोळ येथे ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

शोकसभेत वक्त्यांनी शिवराज पाटील चाकूरकरांनी साकोळ व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या कार्यकाळात सामाजिक सलोखा, लोकशाही मूल्ये आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले, असे मत व्यक्त करण्यात आले. यावेळी प्रदीप पाटील, अविनाश शिंदे,विरभद्र होनमाळे,महेश तिवारी, संतोष महाजन, शिवशंकर भालके, मनोज मोरे, मनोज वाघमारे, दिलीप सोडले, उध्दव वाडीकर, भानुदास आवळे, भाऊराव शिंदे, गुणवंत डोंगरे,रमेश होनमाळे, सिद्धेश्र्वर होनमाळे, श्रीनिवास हंकारे, अन्नाराव शिंदे, कमलाकर मादळे, दिलीप भिक्का उपस्थित होते.

# उदगीर नगराध्यक्षपदी युतीच्या सौ. स्वाती हुडे विजयी

## राष्ट्रवादीचे २०, भाजपाचे १३ असे युतीचे ३३ नगरसेवक



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, २१ डिसेंबर :** उदगीर शहराला सर्व सोयी सुविधा पुरवून महाराष्ट्रात उदगीर शहर हे स्मार्ट सिटी म्हणून नावारूपाला आणण्यासाठी उदगीर शहरातील जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या युतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. स्वाती सचिन हुडे ह्या नगराध्यक्ष पदी निवडून आले आहेत तर शहरातील २० प्रभागातील ४० उमेदवारांपैकी ३३ उमेदवार हे युती चे निवडून देऊन उदगीर शहरातील जनतेने माझ्यावर मोठा विश्र्वास दाखवला आहे. त्यात २० नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तर १३ भारतीय जनता पार्टी असे ३३ नगरसेवक शहरातील नागरिकांनी निवडून दिले आहेत. त्याबद्दल सर्व उदगीर शहरातील जनतेचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून नव्याने निवडून आलेल्या सर्व उमेदवारांचे आमदार संजय बनसोडे यांनी अभिनंदन केले आहे.

मागील ६ वर्षाच्या माझ्या आमदारकीच्या कार्यकाळात उदगीरच्या जनतेने विश्र्वास दाखवुन विधानसभेत मला मोठे मताधिक्य या शहराने दिले आणि आज नगराध्यक्ष व नगरसेवक यांना भरघोस मते देऊन माझा मोठा सन्मान या शहरातील जनतेने केला असल्याने त्यांचे आभार व्यक्त करून निवडून आलेले सर्व उमेदवार हे सर्व उदगीरच्या सर्वांगीण विकासासाठी रात्रंदिवस काम करून महाराष्ट्रात आपल्या उदगीरचे नाव करतील असा विश्र्वास व्यक्त आ.बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी माजी आ. गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, नगराध्यक्षा सौ.स्वाती हुडे, सचिन हुडे, रामचंद्र तिरुके, बापूराव राठोड, पंडित सुर्यवंशी, प्रा. श्याम डावळे, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, सय्यद जानीमियाँ,बाळासाहेब मरलापल्ले, अनिल मुदळे, विजय निटुरे, चंद्रशेखर पाटील, रामदास बेंबडे, शिवशंकर पांडे, धनाजी मुळे, ज्ञानेश्वर बिरादार, बालाजी भोसले, रामराव बिरादार, उदयसिंह ठाकुर, दिलीप मटके, मधुमती कनशेट्टे, वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, यांच्यासह युतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निलंगा नगरपालिकेवर भाजपचा झेंडा

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २१ डिसेंबर :** निलंगा नगरपालिकेवर पुन्हा एकदा भाजपचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांचे वर्चस्व सिद्ध झाले असून २३ पैकी १५ जागा जिंकून पालिकेवर पुन्हा एकदा भाजपचा झेंडा फडकविले आहे. नगराध्यक्षपदी भाजपचे संजयराज प्रमोद हलगरकर हे काँग्रेसचे उमेदवार हमीद इब्राहिम शेख यांचा दणदणीत पराभव करून २०२६ मताने विजयी झाले आहेत.

भाजप आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व भाजप युवा नेते किंगमेकर अरविंद पाटील निलंगेकर यांच्या प्रतिष्ठेची व काँग्रेस जिल्हा अध्यक्ष अभय साळुंके यांच्या अस्तित्वाच्या चुरशीच्या या लढतीत भाजपने काँग्रेसला पराभवाची धूळ चारली आहे.

निलंगा नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत विविध प्रभागात भाजप व काँग्रेस यांच्यामध्ये झालेल्या अटीतटीची लढतीत भाजपचे १५ नगरसेवक निवडून आले तर काँग्रेसचे ८ नगरसेवक निवडून आले आहेत.

निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी एक नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदासाठी सकाळी ठीक दहा वाजता तह-



सील कार्यालय निलंगा येथे मतमोजणी सुरू झाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार संजयराज हलगरकर यांनी आघाडी घेण्यास सुरुवात केली व ती आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवत काँग्रेस उमेदवार हमीद शेख यांचा २०२६ मताने पराभव करत दणदणीत विजय मिळवला. भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय हलगरकर यांना ९९२४ मते मिळाली तर काँग्रेसचे हमीद शेख यांना ७८९८ मते मिळाली. या निवडणुकीत सुरुवातीपासूनच धडाकेबाज प्रचाराच्या रणधुमाळीने भाजप काँग्रेस उमेदवारांचे व नेतेमंडळीचे झोप उडवणारे उबाठा शिवसेनेचे उमेदवार शिवसेनेचे लिंबन महाराज रेशमे यांना २७१२ मते मिळाली.

या निवडणुकीत नगरसेवक पदाचे भाजपचे उमेदवार आशा फुलारी, लक्ष्मीबाई नागदे, ड विरभद्र स्वामी, पूजा मोहोळकर, ईश्र्वर पाटील, सोनाली हाडोळे, रमेश कांबळे, खदीर मासूलदार, सुधा वाघमारे, मीनाक्षी निलंगेकर देशपांडे

### आमदार निलंगेकर यांचे वर्चस्व सिद्ध; नगराध्यक्षपदी भाजपचे संजयराज हलगरकर विजयी

, धर्मप्रकाश निंबाळकर, निळकंठ पेठकर , सचिन गायकवाड, रंजना कांबळे, नयूम शेख असे एकूण १५ उमेदवार विजयी झाले . तर काँग्रेसचे नगरसेवक पदाचे उमेदवार अजित नाईकवाडे, विजया वांजरवाडे, सिराज देशमुख, सरोजा भोसले, इस्माईल मनियार, शिवगंगा पेठकर, स्वाती सूर्यवंशी, राधिका पेटकर असे एकूण ८ उमेदवार विजयी झाले आहेत.

भाजपचे युवा नेते अरविंद पाटील निलंगेकर यांच्या संघटन कौशल्य व नियोजनबद्ध प्रचार यंत्रणेमुळे भाजपने प्रतिकूल परिस्थितीमध्ये हा विजय खेचून आणले आहे.

# येरोळ जि.प. शाळेत शिक्षकांचा अभाव

**त.भा. वृत्तसेवा,**

**येरोळ, दि. २१ डिसेंबर :** येरोळ येथील जिल्हा परिषद शाळेत माध्यमिक स्तरावर इंग्रजी व गणित या अत्यंत महत्त्वाच्या विषयांसाठी शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.

दहावी बोर्ड परीक्षा अवघ्या दोन महिन्यांवर येऊन ठेपल्या असताना अद्यापही या विषयांचे शिक्षक नियुक्त न झाल्याने पालक व ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

येथील शाळेतील माध्यमिक विभागातील दोन शिक्षिका दीर्घकाळ

### २५ डिसेंबरला शाळेला टाळे ठोकण्याचा इशारा

रजेवर गेल्याने इंग्रजी व गणित विषयांचे अध्यापन अनेक दिवसांपासून ठप्प आहे. याबाबत शालेय समिती व ग्रामस्थांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी यांची अनेक वेळा भेट घेऊन शिक्षक नियुक्तीची मागणी केली; मात्र प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही.

विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता दि. २४ डिसेंबर २०२५ पर्यंत येरोळ जिल्हा परिषद शाळेसाठी इंग्रजी व गणित विषयांचे दोन शिक्षक तात्काळ नियुक्त करावेत, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद शाळेला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आला आहे. हे निवेदन गटविकास अधिकारी यांना देण्यात आले असून, त्यावर शालेय शिक्षण समिती अध्यक्ष तानाजी महाराज दाडगे, सरपंच सतिश सिंदाळकर, गुडेराव चौसष्टे, संदीप पाटील, सोमेश्वर गुणगुणे, आमीर बागवान, नवनाथ जाधव, सलिमा मुजावर यांच्यासह अनेक पालक व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येण्याची शक्यता असून, आंदोलनाला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# रेणापूर नगर पंचायतवर भाजपचे वर्चस्व; नगराध्यक्षपदी भाजपच्या शोभाताई आकनगिरे

**तभा वृत्तसेवा /ईश्वर बद्दर**

**रेणापूर, दि. २१ डिसेंबर :** रेणापूर नगर पंचायतच्या निवडणुकीत आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. नगराध्यक्षपदी भाजपच्या शोभा शामराव आकनगिरे या विजयी झाल्या. रेणापूर नगरपंचायतच्या सार्वत्रिक निवडणूकीत भाजपचे एकूण १० उमेदवार विजयी झाले.

या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ५, राष्ट्रवादी शरद पवार गटाचा एक तर एका अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे. रेणापूर नगरपंचायत एकूण १७ जागांसाठी झालेल्या निवडणूकीत भाजपने बाजी मारत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. पुन्हा एकदा सत्ता ताब्यात खेचून भाजपने आपला झेंडा रेणापूर नगरपंचायतीवर फडकवला आहे. लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात या देशमुखांना धक्का देण्याचे काम या निवडणुकीत केले आहे.

विजय उमेदवाराचे वॉर्ड निहाय नावे पुढीलप्रमाणे वार्ड १ मधून भाजपाचे अभिषेक शामराव आकनगीरे, वार्ड क्रमांक २ भाजपाच्या मोटेगावकर सुमन श्रीकृष्ण, वार्ड क्रमांक ३ भाजपाच्या सुनिता मधुकर बस्तापुरे, वार्ड क्रमांक ४ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट चक्रे रुपेश जनार्दन, वार्ड क्रमांक ५ भाजपाचे सरवदे दत्ता त्रिंबक, वार्ड क्रमांक ६ भाजपाच्या गाडे धरती महेश, वार्ड क्रमांक ७ काँग्रेसचे सचिन अनुरथ मोटेगावकर, वार्ड क्रमांक ८ काँग्रेस पक्षाच्या राजश्री संतोष शिंदे, वार्ड क्रमांक ९ भाजपाच्या शेख रबीयाबी शफी, वार्ड क्रमांक १० भाजपाच्या हुसेना रशीद शेख, वार्ड क्रमांक ११ भाजपाच्या खैरूनिसा मारूफ आत्तार,



वार्ड क्रमांक १२ काँग्रेस पक्षाच्या मीनाक्षी भूषण पनुरे. वार्ड क्रमांक १३ काँग्रेस पक्षाचे गजेंद्र मनोहर चव्हाण, वॉर्ड क्रमांक १४ भाजपाच्या ज्योती विजय चव्हाण, वार्ड क्रमांक १५ काँग्रेस पक्षाच्या सुजाता बाबू सौदागर, वार्ड क्रमांक १६ अपक्ष उमेदवार शेख बाहेर शहाबुद्दीन तर वॉर्ड क्रमांक १७ मधून भाजपचे राठोड प्रदीप ज्योतीराम विजयी झाले आहेत.

भाजपच्या विजयी उमेदवारांची रेणापूर शहरातून ढोल ताशाच्या गजरात गुलालाची उधळण करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार रमेश आप्पा कराड यांच्यासह तालुक्यातील भाजपचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विजयाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना आ. कराड यांनी रेणापूरच्या मतदारांनी भाजपाला दिलेले मत म्हणजे रेणापूरच्या सर्वांगीण विकासाला मत असल्याचे सांगितले. रेणापूरकरांच्या विकासाच्या सर्व अपेक्षांची पूर्तता करण्याचे काम नवनिर्वाचित नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे व त्यांचे सहकारी नगरसेवक करतील, असा विश्वासही आ. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केला. यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २४ डिसेंबर रोजी लोकसेवा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**
भारतरत्न, माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनानिमित्त धाराशिव येथील लोकसेवा समिती संस्थेच्या वतीने दिला जाणारा मराठवाडास्तरीय लोकसेवा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दि.२४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. यंदा या पुरस्काराचे १६ वे वर्ष आहे.

हा पुरस्कार वितरण कार्यक्रम जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. बुधवार, दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी ४ वा. खा. प्रमोद महाजन बहुउद्देशीय सभागृह, आर्य चाणक्य विद्यालय परिसर, वरुडा रोड, समर्थ नगर, धाराशिव येथे हा कार्यक्रम होणार आहे. यंदाचा लोकसेवा पुरस्कार अंबाजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनीचे प्रसाद मधुकरराव चिक्षे, धाराशिव जिल्ह्यात पालावरची शाळा चालवणारे चंद्रशेखर बाबुराव पाटील तसेच मातोश्री वृद्धाश्रम, लातूर या संस्थेला देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कार वितरण कार्यक्रमास धाराशिव शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी उपस्थित रहावक, असे आवाहन पुरस्कार संयोजन समितीचे अध्यक्ष व लोकसेवा समितीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, सचिव कमलाकर पाटील तसेच सदस्य शेषाद्री डांगे यांनी केले आहे.



# परंडा नगरपरिषदेत अटीतटीच्या लढतीत जाकीर सौदागर विजयी

### शिवसेना शिंदे गटाला ८ जागा तर जनशक्ती नगरविकास आघाडीला १२ जागा...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ डिसेंबर -**
नगरपरिषद परांडा अंतर्गत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि.२ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली होती. मात्र मतमोजणीसाठी मतदारांना तब्बल १८ दिवस प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे कोण निवडून येणार, याबाबत सर्वत्र उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

अतिशय चुरशीने पार पडलेल्या या निवडणुकीची मतमोजणी रविवार, दि२१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता परांडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह येथे सुरू झाली. मतमोजणी प्रक्रिया नियोजित वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी प्रशासनाकडून व पोलीस प्रशासनाकडून काटेकोर नियोजन करण्यात आले होते.

निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार निलेश काकडे यांच्या उपस्थित झालेल्या मतांची मतमोजणीसाठी ५ टेबलची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक टेबलवर ५ कर्मचारी असे २५ कर्मचारी नियुक्त केले होते. झालेल्या मतमोजणीत शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाकीर सौदागर ६७९५ मते घेऊन १८९ मताने विजयी झाले. जनशक्ती नगर विकास आघाडीचे उमदेवार विश्वजीत पाटील यांना ६६०६ मते मिळाली आहेत. तर शिवसेना शिंदे गटाचे २० उमेदवारांपैकी ८ उमेदवार नगरसेवक पदाचे विजयी झाले आहेत. तर सर्वपक्षीय भाजपा, शिवसेना उबाठा गट, राष्ट्रीय काँग्रस, राष्ट्रवादी काँग्रस या जनशक्ती नगरविकास आघाडीचे २० उमेदवारांपैकी १२ नगरसेवक पदाचे उमेदवार विजयी झाले आहेत.




आघाडीचे बहुत झाले असले तरी त्यांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वजित ज्ञानेश्वर पाटील हे थोडक्या मताने पराभूत झाले आहेत. अतितटीच्या निवडणुकीत अखेर पुन्हा जाकीर सौदागर यांनी बाजी मारली आहे.

परांडा शहरातील एकूण १० प्रभागांसाठी ५ स्वतंत्र टेबल्स ची व्यवस्था करण्यात आली होती. मतमोजणीसाठी प्रत्येक टेबलवर ५ प्रशिक्षित कर्मचारी, अशा प्रकारे एकूण २५ प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. याशिवाय संगणक व सारणी कामकाजासाठी ४ कर्मचारी, तर सहाय्यक कामकाजासाठी ४ कर्मचारी नेमण्यात आले होते.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे मतमोजणी पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. नगराध्यक्ष पदासाठी जाकीर सौदागर यांचा विजय होताच त्यांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करीत मोठा जल्लोष केला.

परंडा नगरपरिषद निवडणूकीचा निकाल खालील प्रमाणे : प्रभाग १ अ रत्नमाला बनसोडे (आघाडी ९३८ मते, १७३ मतांनी विजयी) तर आदिका पालके (शिवसेना ७६५ मते), मिनाक्षी बनसोडे (अपक्ष ६७ मते), सुवर्णा बनसोडे (४३ मते).

प्रभाग १ ब श्रीकृष्ण विधाते (आघाडी ९४६ मते, १०४ मतांनी विजयी), संजय घाडगे (शिवसेना ८४२), प्रभाग २ अ रुक्सानाबेगम पठाण (आघाडी ६८१ मते, ६१ मतांनी विजयी), फर्जनाबी मुजावर (शिवसेना ६२०), प्रभाग २ ब सरफराज कुरेशी (शिवसेना ६५१ मते, ८ मतांनी विजयी), इस्माईल कुरेशी (आघाडी ६४३), प्रभाग ३ अ परवीन बासले (आघाडी ७६२ मते, १९८ मतांनी विजयी), गुलनार पठाण (शिवसेना ५६४ मते).

प्रभाग ३ ब मदनसिंह सद्दीवाल (आघाडी ७०९ मते, ९९ मतांनी विजयी), मदन दीक्षित (शिवसेना ६१०), प्रभाग ४ अ मदीनाबी पठाण (आघाडी ६४१ मते, ६४ मतांनी विजयी), जैतुनबी पठाण (शिवसेना ५७७) प्रभाग ४ ब समरजीतसिंह ठाकुर (आघाडी ६७६ मते, १४६ मतांनी विजयी), अजीम सौदागर (शिवसेना ५३०), नवनाथ कसबे (अपक्ष १६ मते), प्रभाग ५ अ शमीम तांबोळी (शिवसेना ६९१ मते, १०१ मतांनी विजयी), नंदाबाई जाधव (आघाडी ५९० मते), प्रभाग ५ ब सत्तार पठाण (शिवसेना ६६३, ५० मतांनी विजयी), रईसोद्दीन मुजावर (आघाडी ६१३), प्रभाग ६ अ अनिल शिंदे (आघाडी ७९२, ३०६ मतांनी विजयी), जयंत शिंदे (शिवसेना ४८६), प्रभाग ६ ब वैशाली अलबत्ते (आघाडी ७९२, ३१२ मतांनी विजय), मनीषा मेहेर (शिवसेना ४८०), प्रभाग ७ अ आब्बास मुजावर (आघाडी ९४३ मते, ६४ मतांनी विजय), इरफान शेख (शिवसेना ८७९ मते).

प्रभाग ७ ब रुखियाबी दहेलूस (आघाडी ९४० मते, ६९ विजय), कमल जगताप (शिवसेना ८७१), प्रभाग ८ अ साबेर सौदागर (शिवसेना ९३१ मते, ३९९ मतांनी विजयी), गुले इरम चौधरी (आघाडी ५३२), प्रभाग ८ ब आमीनाबी मुजावर शिवसेना १००२ मते (आघाडीच्या आमीनाबी मुजावर (५४६ मतांनी विजयी).

प्रभाग ९ अ मन्नाबी जिनेरी (शिवसेना ५६८ मते, १७८ मतांनी विजयी), हसीना पठाण (आघाडी ३९०).

प्रभाग ९ ब चंद्रकांत गायकवाड (शिवसेना ५२९ मते, ९६ मतांनी विजयी), उमाकांत गोरे (आघाडी ४३३), प्रभाग १० अ वनमाला रामा शिंदे (शिवसेना ५२५ मते, १४७ मतांनी विजयी), ज्योती सोनटक्के (आघाडी ३७८ मते) तर १० ब रमेशसिंह परदेशी (आघाडी ४६० मते, २३ मतांनी विजयी) व मोहसीन सौदागर (शिवसेना (४३७ मते).



### फेरमतमोजणीचा अर्ज फेटाळला...

नगराध्यक्ष पदासाठी तसेच प्रभाग क्रमांक २ मधील एका जागेसाठी फेरमतमोजणी (रिकाउंटिंग) करण्याबाबत जनशक्ती नगरविकास आघाडीचे उमेदवार विश्वजीत पाटील यांच्या वतीने अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र सादर केलेली कारणे योग्य वाटली नसल्याने निवडणूक अधिकारी तहसीलदार निलेश काकडे यांनी हा अर्ज फेटाळला असल्याची माहिती देण्यात आली.

### मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भाजपचे कमळ...

## काँग्रेसची एकहाती सत्ता कोसळली; बापुराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक विजय

**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२१ डिसेंबर -**
मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भारतीय जनता पार्टीचे कमळ फुलले असून, आजवर काँग्रेसची एकहाती सत्ता असलेला बुरुज या निवडणुकीत पूर्णपणे ढासळला आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या निकालात भाजपाने ऐतिहासिक कामगिरी करत नगरपालिकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे.




या निवडणुकीत भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापुराव पाटील यांनी स्वतः निवडणूक रिंगणात उतरून दणदणीत विजय मिळवला. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने २० पैकी १९ नगरसेवक निवडून आणत नगरपरिषदेवर एकहाती सत्ता मिळवण्यात यश मिळवले आहे.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे अजितकुमार अरविंद चौधरी यांनी नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली होती. मात्र नगराध्यक्ष पदावर त्यांना पराभव स्वीकारावा लागला असून ते नगरसेवक म्हणून विजयी झाले आहेत. निवडणूक निकाल जाहीर होताच मुरूम शहरात भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

फटाके, गुलाल व जल्लोषात हा ऐतिहासिक विजय साजरा करण्यात आला. अनेक नागरिकांनी हा कौल विकास व स्थिर प्रशासनाच्या बाजूने दिला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.



### प्रभागनिहाय विजयी उमेदवार...

**प्रभाग १ :** स्नेहा राम बंडगर भाजप, अमर धनराज भोसगे भाजप. **प्रभाग २ :** सचिन गुलाब फनेपुरे भाजप, श्रीदेवी नागप्पा दुर्गे भाजप. **प्रभाग ३ :** महादेवी बबन बनसोडे भाजप, अहमद युनूस मनियार भाजप. **प्रभाग ४ :** अंकिता राजकुमार अंबुसे भाजप, निरजानंद सच्चिदानंद अंबर भाजप. **प्रभाग ५ :** गौस रशीद शेख भाजप, निर्मला प्रकाश कंटेकुरे भाजप. **प्रभाग ६ :** रूपचंद गायकवाड भाजप, मुमताजबी मलंग ढोबळे भाजप. **प्रभाग ७ :** रमेश दत्तू चव्हाण भाजप ज्योती शेळके भाजप. **प्रभाग ८ :** सुनिता मारुती बने भाजप, राजेंद्र संभाजी बेंडकाळे भाजप. **प्रभाग ९ :** समीना मुल्ला भाजप, अजितकुमार अरविंद चौधरी उबाठा. **प्रभाग १० :** रागिनी भारत गायकवाड भाजप, सिद्राय्या सायबण्णा ख्याडे भाजप.



**धाराशिव :** नळदुर्गचे बसवराज धरणे, तुळजापूरचे विनोद उर्फ पिटु गंगणे, धाराशिवच्या नेहा राहुल काकडे व कळंबच्या सुनंदा कापसे या चार नगराध्यक्ष यांचा सत्कार करताना आमदार राणाजगजितसिंह पाटील. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, शिवाजी कापसे, नय्यर जहागीरदार, विनोद गपाट, निहाल काझी आदि उपस्थित होते.

## तुळजापूर येथे प्रवाशाची बॅग चोरीस; ४४ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**
प्रवाशाच्या बॅगमधील मौल्यवान वस्तू अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत फिर्यादी माणिक धोंडीराम डुबल (वय ५२, रा. बेलवडे बुद्रुक) यांनी तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी यांच्या ट्रॅव्हल्स क्र. एमएच ५० एन ४४१४ मधील बॅगमध्ये ठेवलेले ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, १,३०० रुपये रोख रक्कम व एक मोबाईल फोन, असा एकूण ४४,३०० रुपये किमतीचा माल दि.२० डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ३.३० ते ५.३० दरम्यान मुलींची कन्या शाळा, तुळजापूर येथून अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.

या प्रकरणी फिर्यादी माणिक डुबल यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.
- अनिल आगलावे
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

# तुळजापूर नगर परिषदेवर भाजपचे कमळ फुलले

### विनोद गंगणे विजयी भाजपचे तर काँग्रेसचे अमर मगर यांचा पराभव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**
तुळजापूर नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदाच्या लढतीत भाजपचे विनोद गंगणे यांनी काँग्रेसच्या अमर मगर यांचा १६८६ मतानी पराभव केला. तर नगरसेवक पदासाठी भाजपचे १८ तर काँग्रेसचे ५ उमेदवार निवडून आले आहेत.

तुळजाभवानी अभियांत्रिकी विद्यालयात सकाळी दहा वाजता मतमोजणीस सुरुवात झाली. पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त ठेवला होता. काही दिवसापूर्वीच झालेल्या वादामुळे मतमोजणीसाठी शहरातील सावरकर चौक ते हेलीपॅड कॉर्नर पर्यंत सकाळी आठ ते दुपारी दोन पर्यंत रस्ता बंद ठेवण्यात आला होता.

पोलीस उपविभागीय अधीक्षक डॉ. निलेश देशमुख यांनी स्वतः उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीची तपासणी करूनच त्यांना मतमोजणी कक्षाकडे प्रवेश दिला. प्रभाग क्रमांक एक अ मध्ये मंजुषा देशमाने आणि ब मध्ये पंडित जगदाळे, प्रभाग क्रमांक दोन मध्ये औदुंबर कदम ब मध्ये नीता क्षीरसागर प्रभाग क्रमांक तीन अ मध्ये अनुजा कदम या बिनविरोध आल्या होत्या. तर ब मध्ये लखन पेंदे प्रभाग क्रमांक चार अ मध्ये सुनील रोचकरी ब मध्ये श्वेता साळुंखे प्रभाग क्रमांक पाच अ महंताबाई साठे ब मध्ये माऊली भोसले, प्रभाग क्रमांक सहा अ मध्ये सागर कदम ब मध्ये सरोजा अमृतराव हे सर्व भाजपचे उमेदवार निवडून आले आहेत. तर प्रभाग क्रमांक सात अ मध्ये प्रगती लोंढे आणि ब मध्ये रणजीत इंगळे हे दोन्हीही काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. प्रभाग क्रमांक आठ मध्ये भाजपच्या ज्योती सावंत तर ब मध्ये काँग्रेसचे अक्षय कदम निवडून आले आहेत.




प्रभाग क्रमांक नऊ अ मध्ये काँग्रेसचे अमोल कुतवळ तर ब मध्ये भाजपच्या जयश्री कंदले या निवडून आले आहेत. प्रभाग क्रमांक १० मध्ये काँग्रेसचे आनंद जगताप तर ब मध्ये भाजपच्या प्रियंका गंगणे या निवडून आले आहेत. तर प्रभाग क्रमांक ११ अ मध्ये अश्विनी रोचकरी, ब मध्ये प्रिया मलकुनाईक आणि क मध्ये रामचंद्र रोचकरी हे तिन्हीही भाजपचे उमेदवार निवडून आले आहेत.

निकालानंतर भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शहरात गुलाल उधळून फटाक्यांची आतषबाजी केली.





# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## भुम येथे घरफोडी; सोन्या-चांदीचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

भुम पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत फिर्यादी रतन सोमनाथ डोके (वय ५६, रा. शिवाजीनगर, भुम, ता. भुम, जि. धाराशिव) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी हे बहिणीला भेटण्यासाठी घराबाहेर गेले असताना, दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.00 वाजता सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा तोडून आत प्रवेश केला.

चोरट्याने घरातील कपाटामधून ६0 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व एक चांदीचा सिक्का, असा एकूण १ लाख ९0 हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.

या प्रकरणी फिर्यादी रतन डोके यांनी दि.२0 डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



# धाराशिव जिल्ह्यात महायुतीचा झेंडा

**आ. राणाजगजितसिंह पाटील, आ. तानाजी सावंत, बसवराज पाटील, ज्ञानराज चौगुले यांचे वर्चस्व**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

जिल्ह्यात पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीने अभूतपूर्व यश मिळवत आठ पैकी आठही नगरपालिका आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. या निकालामुळे जिल्ह्यात महायुतीचा झेंडा फडकला असून आमदार राणाजगजितसिंह पाटील, आमदार तानाजी सावंत आणि माजी मंत्री बसवराज पाटील यांचे राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

धाराशिव नगरपालिकेत भाजपच्या नेहा काकडे यांनी विजय मिळवला. तुळजापूरमध्ये विनोद गंगणे (भाजप), नळदुर्गमध्ये बसवराज धरणे (भाजप) आणि मुरूममध्ये बापूराव पाटील (भाजप) यांनी मतदारांचा विश्वास संपादन करत दणदणीत विजय मिळवला.

शिवसेनेकडून कळंब नगरपालिकेत सुनंदा कापसे, उमरग्यात किरण गायकवाड आणि परंड्यात जाकीर सौदागर यांनी विजय मिळवत महायुतीची ताकद अधिक मजबूत केली. भूम नगरपालिकेत संयोगिता गाढवे (आलमप्रभू आघाडी) यांनी विजय मिळवला असून त्या महायुती समर्थक मानल्या जात असल्याने जिल्ह्यातील सर्वच नगरपालिका प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या महायुतीच्या ताब्यात आल्या आहेत.

### धाराशिव जिल्ह्यातील पक्षीय बल...

**धाराशिव नगरपरिषद** नगराध्यक्ष भाजपा : एकूण नगरसेवक ४१. यात शिवसेना उबाठा १0, भाजपा २२, राष्ट्रवादी ८, एमआयएम १. **तुळजापूर नगरपरिषद** नगराध्यक्ष भाजपा : एकूण नगरसेवक २३. यात भाजपा १८, काँग्रेस ५. **नळदुर्ग नगर परिषद** नगराध्यक्ष भाजपा : एकूण नगरसेवक २0. यात भाजपा १२, काँग्रेस ८. **उमरगा नगरपरिषद** नगराध्यक्ष शिवसेना शिंदे गट : नगरसेवक एकूण २५. यात शिवसेना शिंदे १२, काँग्रेस ६, भाजपा ५, राष्ट्रवादी २. **मुरूम नगर परिषद** नगराध्यक्ष भाजपा : एकूण नगरसेवक २0. यात भाजपा १९, शिवसेना उबाठा १. **कळंब नगर परिषद** नगराध्यक्ष शिवसेना शिंदे गट : एकूण नगरसेवक २१. यात भाजपा ६, शिवसेना उबाठा १0, शिवसेना शिंदे गट ४, काँग्रेस १. **परंडा नगरपरिषद** नगराध्यक्ष शिवसेना शिंदे गट नगरसेवक एकूण २0. यात जनशक्ती शहर विकासा आघाडी १२, शिवसेना शिंदे गट ८. **भूम नगर परिषद** नगराध्यक्ष शिवसेना शिंदे गट :नगरसेवक एकूण २0. यात आलम प्रभू आघाडी ६, जनशक्ती आघाडी १४.




या निवडणुकांमध्ये आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री आमदार तानाजी सावंत आणि माजी मंत्री बसवराज पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांनी केलेल्या रणनीतीपूर्ण नियोजनाचा आणि कार्यकर्त्यांच्या संघटनेचा मोठा प्रभाव दिसून आला.

युतीच्या नेत्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिका क्षेत्रात समन्वय साधत महायुतीचे उमेदवार सक्षमपणे मैदानात उतरवले.

विकासकामे, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण व नगरविकासाशी संबंधित प्रश्न हे प्रचाराचे केंद्रबिंदू ठरले. मतदारांनी स्थिर आणि विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत महायुतीला कौल दिला आहे. निकालानंतर जिल्हाभरात महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून विजयाचे जल्लोष सुरू आहेत.

या यशामुळे आगामी काळात धाराशिव जिल्ह्यातील राजकारणात महायुतीची पकड अधिक मजबूत होणार असून, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास राजकीय वर्तुळातून व्यक्त केला जात आहे.

# कळंब न.प.वर शिवसेना भाजप महायुतीचा भगवा फडकला

### दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचा सुपडा साफ



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ डिसेंबर -**

येथील नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी शिवसेना-भाजपच्या राणी उर्फ सुनंदा कापसे या २२५४ मतांनी विजयी झाल्या आहेत. त्याचबरोबर भाजप व शिवसेना गटाचे १0 नगरसेवक ही निवडून आणण्यात यश आले आहे. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व काँग्रेस यांच्या पदरात केवळ १0 नगरसेवक निवडून आले तर अजित पवार (गट) व शरद पवार (गट) राष्ट्रवादी यांच्या मात्र चांगला सुपडा साफ झाला आहे. संपूर्ण निवडणूक ही तिरंगी झाली होती, मात्र त्यांना एकाही जागेवर यश प्राप्त झाले नाही.

कळंब नगर परिषदेच्या एक नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार रिंगणात होते. त्यात शिवसेना-भाजप महायुतीचे राणी उर्फ सुनंदा शिवाजी कापसे यांना ७ हजार ६८९ मते मिळाली तर त्यांचा २२५४ मतांनी त्या विजयी झाल्या. त्यांच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे (गट) व काँग्रेस यांच्या युतीमधून रश्मी संजय मुंदडा या उभ्या होते. त्यांना ५ हजार ४३५ मते मिळाली तर तिसऱ्या नंबरवर फेकल्या गेलेल्या अजित पवार व शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या मीनाक्षी श्रीधर भवर यांना १७६0 मते मिळाली. राष्ट्रवादी गटाकडून एकही नगरसेवक मात्र खाते उघडू शकले नाहीत. कळंब नगर परिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी १0 प्रभागात २0 नगरसेवक पदासाठी झाली. यात एकूण नगराध्यक्ष पदासाठी ६ उमेदवार रिंगणात होते. तर २0 नगरसेवक पदासाठी ६७ उमेदवार रिंगणात होते. शहरात एकूण २४ मतदान केंद्रावर २0 हजार ९५८ मतदारापैकी १५ हजार २३४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला होता. तर या मतदानाची मतमोजणी २१ डिसेंबर रविवार रोजी सकाळी १0 वाजता शहराबाहेर असलेल्या श्री संत गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सकाळी १0 वाजता सुरू झाली. यात १0 टेबलवर ३ फेऱ्यात ही मतमोजणी संपन्न झाली. यात विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे प्रभाग १ (अ) मधून योजना अनंत वाघमारे ५९५ (कमळ), प्रभाग १ (ब) मधून शीतल चोंदे (कमळ) यांनी ५१५ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग २ (अ) मधून ज्योती हरकर (मशाल) यांनी ८२६ मते घेऊन तर प्रभाग २ (ब) मधून खाटीक जमील महंमद (मशाल) यांनी ७१७ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ३ (अ) मधून इंदुमती हौसलमल (मशाल) यांनी ८८६ मते घेऊन तर प्रभाग ३ (ब) मधून रोहन पारख (धनुष्यबाण) यांनी ८६१ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ४ (अ) मधून लखन गायकवाड (कमळ) ५४६ मते घेऊन तर प्रभाग ४ (ब) मधून आशा भवर (मशाल) यांनी ७२४ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ५ (अ) मधून सागर मुंडे (मशाल) यांनी ८२0 मते घेतली तर प्रभाग ५ (ब) मधून सफुरा शकील काझी (मशाल) यांनी ७७८ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ६ (अ) मधून हर्षद अंबुरे (कमळ) यांना ५८५ मते मिळाली. तर प्रभाग ६ (ब) मधून अर्चना मोरे यांनी (हात) या चिन्हावर ६५८ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ७ (अ) मधून पूजा धोकटे या (धनुष्यबाण) घेऊन यांना ८९४ मते मिळाली तर प्रभाग ७ (ब) मधून अमर चाऊस (धनुष्यबाण) यांना १0४९ मते घेऊन विजयी झाले आहेत. प्रभाग ८ (अ) मधून वनमाला वाघमारे (मशाल) यांनी ६५७ मते घेतली. तर प्रभाग ८ (ब) मधून मोसिन सलीम मिर्झा (मशाल) यांनी ७0२ मते घेऊन विजयी झाले आहेत.




प्रभाग ९ अ मधून रुकसाना बागवान (मशाल) यांना ६२७ मते मिळाली तर प्रभाग ९ ब मधून अतुल कवडे (धनुष्यबाण) यांनी ७४१ मते घेऊन विजयी झाले आहेत. तर प्रभाग १0 (अ) मधून शाला शिवा पवार (कमळ) यांनी ५0६ मते घेतली तर प्रभाग १0 (ब) मधून भूषण करंजकर (कमळ) ८१९ मते घेऊन विजयी मिळवला आहे. या निवडणुकीत भाजपाला ६ धनुष्यबाणाला ४ मशालीला ९ तर हाताला १ जागा मिळाली आहे.

तर दोन्ही पवारांच्या राष्ट्रवादीला मात्र आपले खाते उघडता आले नाही. विजयी उमेदवारांनी मात्र शहरातून गुलाल उधळत जल्लोष साजरा केला.

## वाहन धारकांकडून ९0 प्रकरणांतून ६८ हजारांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांच्या संयुक्त पथकाने शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर दि.२0 डिसेंबर रोजी विशेष मोहीम राबवून मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली.

या मोहिमेत एकूण ९0 कारवाया करण्यात आल्या असून, त्यातून ६८,000 रुपये 'तडजोड शुल्क' वसूल करण्यात आले आहे. ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.



## जी.एन.एम. परीक्षेत अनुश्री पवार यांचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२१ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील केरुर येथील अनुश्री रोहिदास पवार यांनी जी.एन.एम. (General Nursing and Midwifery) परीक्षेत विशेष गुणवत्ता यादीत स्थान मिळवत घवघवीत यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल शंभुराजे बहुउद्देशीय सामाजिक संस्था, इटकळ यांच्या वतीने केरुर येथे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

पारधी समाजावर चोरी, दरोडा व गुन्हेगारीचा असलेला सामाजिक कलंक झुगारून देत, शिक्षणाशिवाय प्रगती व विकास शक्य नाही या विचाराने अनुश्री पवार यांनी शिक्षणाचा मार्ग निवडला. बारावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी नांदेड जिल्ह्यात पूर्ण केले.

विवाहानंतरही शिक्षणाची जिद्द कायम ठेवत अनुश्री पवार यांनी धाराशिव येथील शासकीय परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय येथे जी.एन.एम.चे शिक्षण पूर्ण केले.

याप्रसंगी संस्थेचे संस्थापक दिनेश सलगरे, बालकल्याण समितीचे सदस्य व दयानंद काळुंके, नामदेव गायकवाड, केशव गायकवाड, हभप. बाळू सुरवसे, पंडितराव भोसले, सुनिता भोसले, प्रदीप भोसले, कुंदन भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

# उमरगा नगर परिषदेत शिंदेसेना-काँग्रेस आघाडीची एकहाती सत्ता

**नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत शिंदे सेनेच्या किरण गायकवाड यांचा ६,२४२ मतांनी दणदणीत विजय**




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ डिसेंबर -**

उमरगा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २0२५ च्या मतमोजणीची प्रक्रिया दि. २१ डिसेंबर रोजी येथील अंतुबळी पतंगे सभागृहात शांततेत पार पडली. या मतमोजणीत शिवसेना (शिंदे गट) व काँग्रेस आघाडीचे अधिकृत नगराध्यक्षपदाचे उमेदवार किरण रवींद्र गायकवाड यांनी ११,६६0 मते मिळवत दणदणीत विजय संपादन केला.

भारतीय जनता पक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे संयुक्त उमेदवार हर्षवर्धन शिवाजीराव चालुक्य यांना ५,३७६ मते मिळाली असून त्यांचा ६,२४२ मतांनी पराभव झाला. तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार रजाक अत्तार यांना ४,0१३ मते मिळाली.

नगरसेवक पदाच्या निकालात शिवसेना (शिंदे गट) ने जोरदार कामगिरी करत १२ जागांवर विजय मिळवला. त्यांच्या आघाडीतील काँग्रेस पक्षाने ६ जागा जिंकत आघाडीला स्पष्ट बहुमत मिळवून दिले. परिणामी शिंदेसेना-काँग्रेस आघाडीने उमरगा नगरपरिषदेत एकहाती सत्ता स्थापन केली आहे. तर भारतीय जनता पक्षाला ५ जागा, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) यांना २ जागा मिळाल्या.




निवडणूक निकाल जाहीर होताच शहरात समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. फटाके, गुलाल व घोषणाबाजी करत विजयाचा जल्लोष करण्यात आला. नवनिर्वाचित नगराध्यक्ष किरण गायकवाड यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रभागनिहाय विजयी उमेदवार पुढील प्रमाणे : **प्रभाग क्र.१ :** अ) सुप्रिया प्रदीप घोडके १३४१ (शिवसेना शिंदे), ब) राहुल राजीव शिंदे १२९७ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.२ :** अ) स्वाती किरण स्वामी ११५२ (शिवसेना शिंदे), ब) सचिन दिलीप जाधव १२७९ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.३ :** अ) अश्विनी सिद्धार्थ सोनकांबळे ८६२ (शिवसेना शिंदे), ब) धनंजय नानासाहेब मुसांडे ९७३ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.४ :** अ) यल्लाप्पा शंकर विभूते ९८४ (शिवसेना शिंदे), ब) बशीर खाशीम शेख ८२६ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.५ :** अ) दुर्गा इराप्पा धोत्रे ६३२ (भाजप), ब) पंढरीनाथ काशिनाथ कोने ५९६ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.६ :** अ) राजेश्वरी नागेश स्वामी ९९१ (भाजप), ब) हंसराज उर्फ राजू अण्णाराव गायकवाड १0५३ (भाजप). **प्रभाग क्र.७ :** अ) नम्रता कैलास शिंदे ९२९ (भाजप), ब) पृथ्वीराज उर्फ विशू व्यंकटराव साळुंके ७८६ (भाजप). **प्रभाग क्र.८ :** अ) विशाल किसनराव कानेकर ४६३ (काँग्रेस), ब) फातिमाबी हनिफ औटी ५८५ (काँग्रेस). **प्रभाग क्र.९ :** अ) विजय महादेव वाघमारे ९४४ (काँग्रेस), ब) शमशाहदबी हबिब शेख ७५९ (काँग्रेस). **प्रभाग क्र.१0 :** अ) मुस्तफा उर्फ शफी बाबूमियाँ चौधरी ९५३ (शिवसेना शिंदे), ब) प्रिया शरद पवार ११२६ (शिवसेना शिंदे). **प्रभाग क्र.११ :** अ) बाबा चंदर मस्के ६५६ (काँग्रेस), ब) ताराबाई महादेवआप्पा दळगडे ९२६ (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार). **प्रभाग क्र.१२ :** अ) अभिजीत विजयकुमार मोरे ९८१ (काँग्रेस), ब) दिपाली विक्रम बिराजदार ९७४ (राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार), अ) आरती अंकुश शिंदे ९३२ (शिवसेना शिंदे).

### नगराध्यक्ष पदाचा निकाल...

किरण रवींद्र गायकवाड ११,६६0 (शिवसेना शिंदे), हर्षवर्धन शिवाजीराव चालुक्य ५,३७६ (भाजप), रजाक अब्दुल बाबूलाल अत्तार ४,0१३ (ठाकरे शिवसेना).

**किरण गायकवाड यांनी ६,२४२ मतांची आघाडी घेत विजय मिळवला.**

# नळदुर्ग नगरपालिकेवर भाजपचा भगवा; ७0 वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच नगराध्यक्षासह स्पष्ट बहुमत

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीत नगरपालिकेच्या स्थापनेच्या ७0 वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच नगराध्यक्ष पदासह एकुण २0 पैकी १२ नगरसेवकांच्या जागा जिंकुन नगरपालिकेवर भाजपचा भगवा फडकला आहे. या निवडणुकीत भाजपचे बसवराज धरणे यांनी एम आयएमचे शहेबाज काझी यांचा ४२२ मतांनी पराभव करून इतिहास रचला आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अशोक जगदाळे यांच्यासह पाच माजी नगराध्यक्षांचा दारुण पराभव झाला आहे.





या निवडणुकीत महायुतीचे ११ व काँग्रेसचे ९ नगरसेवक निवडुन आले आहेत. त्यात प्रभाग क्रमांक १ (अ) मधुन भाजपचे छम्माबाई राठोड यांनी ४३५ मतदान घेऊन सुशीला जाधव यांचा ७४ मतांनी तर भाजपचे प्रभाग क्रमांक १ (ब) मधून भाजपचे निरंजन राठोड यांनी ४८४ मतदान घेऊन काँग्रेसचे दत्ता राठोड यांचा ४ मतांनी पराभव केला. तर प्रभाग क्रमांक २ (अ) मधून काँग्रेसचे मारुती खारवे यांनी ५६५ मतदान घेऊन सेनेचे शंकर वाघमारे यांचा १४३ मतांनी तर प्रभाग क्रमांक २(ब) मधुन सेनेच्या सुमन ठाकुर यांनी ५६९ मतदान घेऊन काँग्रेसच्या मुशेराबी शेख यांचा ५ मतांनी पराभव केला. त्याचबरोबर प्रभाग क्रमांक ३ (अ) मधुन भाजपचे दत्तात्रय दासकर यांनी ४९३ मतदान घेऊन काँग्रेसचे नितीन कासार यांचा १00 मतांनी तर प्रभाग क्रमांक ३ (ब) मधुन मीनाक्षी काळे यांनी ५९४ मतदान घेऊन सुमन जाधव यांचा ३३६ मतांनी पराभव केला. तर प्रभाग क्रमांक ४ (अ) मधुन काँग्रेसचे अपर्णा बेडगे यांनी ३६७ मतदान घेऊन भाजपच्या सुरेखा बेडगे यांचा ७५ मतांनी तर प्रभाग क्रमांक ४ (ब) मधुन काँग्रेसचे आकाश कुलकर्णी यांनी ३७६ मतदान घेऊन भाजपचे सुशांत भूमकर यांचा १२ मतांनी पराभव केला. तर प्रभाग ५ (अ) मधून भाजपचे तानाजी जाधव यांनी ४८६ मतदान घेऊन एमआयएमचे शहेबाज काझी यांचा ४५ मतानी तर प्रभाग ५ (ब) मधुन भाजपच्या राणी सुरवसे यांनी ४३९ मतदान घेऊन अपक्ष काझी इलयाज बेगम यांचा १९ मतांनी पराभव केला. प्रभाग क्रमांक ६ (अ) मधुन भाजपचे रिजवान काझी यांनी ३७९ मतदान घेऊन काँग्रेसचे सय्यद मुजतबा यांचा ४५ मतांनी तर प्रभाग ६ (ब) मधुन काँग्रेसच्या मन्नाबी कुरेशी यांनी ४0५ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तयबा कादरी यांचा १ मतांनी पराभव केला.

तर प्रभाग क्रमांक ७ (अ) मधून काँग्रेसचे गफुर कुरेशी यांनी ८२२ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुस्ताक कुरेशी यांचा ३0८ मतांनी तर ७ (ब) मधुन काँग्रेसच्या झुलेखा बेगम इनामदार यांनी ७९८ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहनाज बेगम यांचा २५५ मतांनी पराभव केला. तर प्रभाग ८ (अ) मधून काँग्रेसचे इमाम शेख यांनी ४१८ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजहर जागीरदार यांचा ४४ मतांनी पराभव केला. तर प्रभाग क्र.८ ब मधुन काँग्रेसच्या कमल गायकवाड यांनी ४४३ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संगीता गायकवाड यांचा १२३ मतांनी पराभव केला. तर प्रभाग क्रमांक ९ (अ) मधुन भाजपचे शशिकांत पुदाले यांनी ३९३ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खालीद इनामदार यांचा ७५ मतांनी तर प्रभाग क्रमांक ९ (ब) मधून काँग्रेसच्या मदिना बागवान यांनी ४0१ मतदान घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंगल सुरवसे यांचा ९२ मतांनी पराभव केला.

तर प्रभाग क्रमांक १0 (अ) मधून भाजपचे नय्यर पाशा जहागीरदार यांनी ६१0 मतदान घेऊन काँग्रेसचे शंकर पुदाले यांचा ३६७ मतांनी तर प्रभाग क्रमांक १0 (ब) मधुन साक्षी नळदुर्गकर यांनी ५२४ मतदान घेऊन काँग्रेसच्या अनिता राणे यांचा १0७ मतांनी पराभव केला.




ही निवडणुक आ. राणाजगजितसिंह पाटील आणि काँग्रेसचे अशोक जगदाळे यांच्या प्रतिष्ठेची होती. यामध्ये नगराध्यक्षासह २0 पैकी ११ नगरसेवक निवडुन आणून राणाजगजितसिंह पाटील यांनी आपली राजकीय ताकद दाखवुन दिली आहे. या निकालामुळे नळदुर्ग शहर वासियांनी विकासाला मतदान केल्याचे दिसुन येत आहे. या निवडणुकीत कांही जणांनी ही निवडणुक जातीवादावर घेऊन गेली होती.

मात्र मतदारांनी त्यांना तोंडावर पाडले आहे. या निवडणुकीत ५ माजी नगराध्यशांसह चार माजी नगरसेकांचा दारुण पराभव झाला आहे. नितीन कासार, मुश्ताक कुरेशी, मंगल सुरवसे, मुनवर सुलताना कुरेशी आणि शहेबाज काझी या माजी नगरध्यक्षांसह संजय बताले, कमलाकर चव्हाण यांच्यासह कांही माजी नगरसेकांचा यामध्ये पराभव झाला आहे.

निवडणुक निकालानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची अतिषबाजी करुन तसेच गुलालाची मोठ्या प्रमाणात उधळुन करुन मोठा जल्लोष केला आहे. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, युवानेते सुनिल चव्हाण, भाजचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य नितीन काळे व भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी विजयी उमेदवारांचे स्वागत करण्याबरोबरच या विजयी मिरवणुकीत सहभागी झाले होते.

मतमोजणी केंद्रावर नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सचिन यादव यांनी अतिशय कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवला होता. त्यामुळे निवडणुक निकालानंतरही वातावरण कमालीचे शांत होते.